

# मी वाकविले दैवाते

प्रा. लक्ष्मण भोळे

# मी वाकविले दैवाते

प्राध्यापक लक्ष्मण भोळे

प्रकाशक

इसाहित्य.कॉम

जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,
शिर्डी-कोपरगाव मार्ग आणि त्यांच्या शाखा
यांनी जे आध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक
देदीप्यमान कार्य केले आहे
ते ह्या कादंबरीच्या
एका भागामधील प्रेरणास्रोत आहे.
त्याबद्दल कृतज्ञता म्हणून
ही कादंबरी 'सद्गुरू आत्मा मालिक'
यांच्या चरणी भक्तीभावाने अर्पण


**मी वाकविले दैवाते**

**लेखकाचा पत्ता**
सी/२२, गणाधीराज सोसायटी, मीठागर रोड,
मुलुंड पूर्व ४०० ०८१

**पहिली ebook आवृत्ती : सप्टेंबर २०२०**

**प्रकाशक : इसाहित्य.कॉम**

**अक्षरजुळणी** : दीपक फडके, ठाणे * संपर्क : ९९८७०५१५२९

**मुखपृष्ठ** : विकास फडके, ठाणे

# मनोगत

'मी वाकविले दैवाते' ह्या माझ्या कादंबरीसाठी जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण- शिर्डी-कोपरगाव मार्ग येथील गेली पंचवीस वर्षे प.पू. गुरुदेव माउली, संत परमानंद महाराज, योगानंद महाराज यांच्याशी झालेले संवाद, आश्रमातील ध्यानाकरता मार्गदर्शन व सुविधा, सेवा व भव्य शैक्षणिक सुविधा, तेथील शिक्षक व आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांशी चर्चा, खेड्यातील व शहरातून आलेले सर्व थरांतील हजारो लोकांचे वागणे-बोलणे इत्यादी बीजरूप ठरले. जंगली महाराज आश्रमातील संत परमानंद महाराज यांनी आश्रमाच्या मासिकातील ध्यानासंबंधी मजकूर वापरण्यास मला परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे आभार. जळगाव येथे श्री. प्रकाश झोपे यांच्याकडील वास्तव्यात मेहरूण तलावाच्या पूर्वेकडील भागात फिरणे, तेथील खेड्यातून आलेल्या व श्रीमंत झालेल्या लोकांचे व इतरांचे निरीक्षण करतांना ह्या कादंबरीचे स्वरूप मनाच्या क्षितीजावर आकार घेऊ लागले. अमेरिकेतील वास्तव्यामध्ये शॉमबर्ग (शिकागो) येथील वाचनालयातील 'लेखक भेट' (Scribes Meet)चा मी सदस्य असल्याने त्यांच्या बैठकांमध्ये सप्टेंबर व ऑक्टोबर २०१८ मध्ये मी ही कादंबरी 'Path of True Love' या नावाने लिहायला सुरूवात करून काही प्रकरणे पूर्ण केली. त्या बैठकीमध्ये अमेरिकन सदस्यांना विषयाची आवड भावली व मांडणी आवडली आणि त्यांनी काही सूचनाही केल्या. पण भारतात परत आल्यावर मी ही कादंबरी मराठीत लिहायचे ठरविले. २०१९ या वर्षात काहीच लिहून झाले नाही. फक्त कथानक, पात्रे, स्थान यासंबंधी निश्चिती तसेच दृष्टिकोन मंथन यातच वेळ गेला. २३ मार्च २0२0 या दिवशी कोरोनाच्या जागतिक महासंकटामुळे झालेल्या संचारबंदीमुळे मनात घर करून राहिलेले कथाविश्व प्रत्यक्षात येण्याचा योग आला. एप्रिल, मे, जून, जुलै या महिन्यांमध्ये मधूनमधून लिहिणे झाले.

प्रा. प्रज्ञा जोशी यांच्याशी फोनवर संभाषण केल्यामुळे काही कल्पना स्पष्ट झाल्या. त्यांच्या सूचना उपयुक्त ठरल्या, त्यांचे मी आभार मानतो. श्री. दीपक फडके यांनी अक्षरजुळणीचे काम व्यवस्थित केले व श्री. विकास फडके यांनी समर्पक मुखपृष्ठ दिले. या दोघांचा मी आभारी आहे.

इ-साहित्यचे प्रवर्तक श्री. सुनील सामंत यांनी उत्साहाने ही कादंबरी त्यांच्या इ-साहित्यमध्ये सामावून घेतली त्यांचा मी ऋणी आहे.

दिनांक ०२-०२-२०२१ प्रा. लक्ष्मण भोळे

# १

१५ नोव्हेंबर २०१५

मी योगिनी नथू राणे. १५ नोव्हेंबर २०१५ हा दिवस मला, माझ्या कुटुंबीयांना, जळगावातील आमच्या राणेनगरवासीयांना अविस्मरणीय राहील. जळगावच्या मेहरूण तलावाच्या दक्षिणेकडील पठारावर वसलेले राणेनगर त्या दिवशी आनंदाने आणि अभिमानाने बहरले होते. राणेचौकातील मंडप, सजावट, शोभेच्या झाडांच्या कुंड्याच्या रांगा, फुलांची व रंगीत पताकांची तोरणे आणि मंडपात शेकडो लोकांनी केलेल्या टाळ्यांच्या गजरात पालकमंत्री विद्याधर फालक, माझे बाबा, मी व इतर मान्यवर रंगमंचावर स्थानापन्न झालो; तेव्हा मला स्वप्नपूर्तीचा आनंद झाला. पालकमंत्र्यांनी जळगावच्या सौंदर्यस्थळाच्या संदर्भाने त्यांच्या भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, शिरसोली रस्त्यावरून डावीकडे सेंट टेरिझा स्कूलच्या गल्लीतून आल्यावर मेहरूण तलावाचे दृश्य पाहून मी गाडी थांबवायला सांगितली. काच खाली करून तेथील फलकावर लिहिलेल्या बहिणाबाईंच्या कवितेतील ओळी मी वाचल्या, मधूनमधून त्या ओळी वाचतो, पण मेहरूण तलावाकाठी त्या ओळीतील जिवंतपणाने हृदयाला स्पर्श केला.

मेहरूणचा तलाव, नाही लहान सहान
अरे त्यानं भागवली, जळगावची तहान!

मेहरूण म्हटलं की मेहरूणची बोरं आठवतात. सोपानदेवांनी आईला एकदा प्रश्न विचारला, फक्त मेहरूणच्या परिसरातच कीड लागलेली, अळी पडलेली बोरे नसतातच. त्याच बोरांची कलमे दुसरीकडे लावली तर अळी पडते असे का?

बहिणाबाईंनी त्या प्रश्नाचे हृद्य उत्तर दिले, वनवासी रामाला त्याच ठिकाणी शबरी भिल्लीण रामनाम जपत असताना भेटली असेल. त्याच्या स्वागतार्थ तिने जी बोरे रामाला खायला दिली होती आणि रामाच्या तोंडातून ज्या ओठल्या (आठोळ्या) जमिनीवर पडल्या तिथेच त्यातून उगवलेली ही बोराची झाडं. त्याच बोरीची ही पाली (वंशावळ). दुसऱ्या ठिकाणी फरक पडणारच. बहिणाबाईंचे हे स्वतःपुरते संशोधन.

अशा जळगाव जिल्ह्याच्या मेहरूण येथे विहंगम दृश्याचे उद्‌घाटन करताना मला आनंद होत आहे.

माझ्या बाबांच्या लोकप्रियतेची व कर्तृत्वाची दखल जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी घेतली. तेच मला हवे होते. माझ्या स्वप्नातील ‘जळगाव जिल्हा विहंगम दृश्य’ (Bird's Eye View) राणे चौकातील १००० चौरस फुटांच्या चौकोनात साकारले गेले. पालकमंत्र्यांनी उद्‌घाटनासाठी यायचे मान्य केल्यामुळे त्याची प्रसिद्धी खूप मोठ्या प्रमाणात झाली. वर्तमानपत्रात दृश्याचे फोटो व वर्णन छापले गेले.

पालकमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात दृश्याच्या कलाकृतीचे गुणगान केले, माझी स्तुती केली, मुख्य म्हणजे माझ्या बाबांनी आमदार म्हणून उत्तम काम केल्याचे सांगून, सत्तेला सेवा, कल्पकता आणि नम्रता यांची जोड मिळाल्यास समाजात समृद्धी कशी येऊ शकते, याचे उदाहरण म्हणजे ‘नथूभाऊ’ असे जेव्हा ते म्हणाले, तेव्हा मंत्र्यांनी माझेच विचार व्यक्त केले असे वाटले. त्यांनी जळगाव जिल्हा मिनिएचर हा भौगोलिक मूल्यवान दागिना आज जळगावच्या इच्छादेवीच्या गळ्यात शोभून दिसत आहे, असे म्हटल्यावर टाळ्यांचा गजर झाला. त्या गजराने, मंत्रीसाहेबांच्या त्या उपमेमुळे माझ्या हृदयाच्या तारा छेडल्या गेल्या. मी जणू मंतरले गेले. त्याच वेळी मी मनोमन ठरविले की, बाबांना राजकारणात, दिल्ली सरकारमध्ये स्थान मिळवून देईन.

मग बाबांनी त्या दृश्याबद्दल माहिती दिली.

ऑक्टोबर २०१५च्या दुसऱ्या पंधरवड्यातील घटना आहे. कॉलेजला दिवाळीची सुट्टी होती. माझी कन्या योगिनी एक समस्या घेऊन मला म्हणाली, बाबा, आमच्या कॉलेजमधील भूगोल अभ्यास मंडळाला मी एक प्रस्ताव सुचविला. तो असा की जळगाव जिल्ह्याचा मोठा king size नकाशा जमिनीवर साकारावा. त्यात तापी नदी, तिला मिळणाऱ्या उपनद्या दाखवायच्या, जिल्ह्याच्या सीमा पांढऱ्या दगडांनी दाखवायच्या. मुख्य गावांची नावे व वृक्ष, औषधी वनस्पती इत्यादी चित्रांद्वारे प्रदर्शित कराव्या. त्या प्रस्तावाला कॉलेजमधून हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. पण भूगोलाच्या प्राध्यापकांनी– प्रा. अनिलकुमार गुप्ता– यांनी मदत करायची तयारी दर्शवली.

मी योगिनीला म्हटले, बेटा, राणे चौकात भरपूर मोकळी जागा आहे. सांग तुझ्या सरांना की राणेनगर चौकात हा प्रस्ताव साकारला जाऊ शकतो. एक महिना योगिनी, फातिमा, त्यांचे मित्रमैत्रिणी गुप्ता सरांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत होते. आपण सर्वांनी जिल्ह्याचे हे चित्रमय दर्शन पाहिले आहे.

तापी नदी जळगाव जिल्ह्यात प्रवेश करते, त्या अजनाड गावापासून ती १३० कि.मी. लांबीच्या मार्गानंतर धुळे जिल्ह्यात प्रवेश करते. सातपुड्यातील गुळी, हरकी, मोर, सुकी, भोकर या नद्यांचा उतार शीघ्र असल्याने त्या वेगाने दक्षिणेकडे वाहत तापीला उत्तर बाजूला जाऊन मिळतात. त्यांचा उतार व प्रवाहाचा वेग जिवंत असल्यासारखा चित्रित केला आहे.

पूर्णा नदी पूर्वेकडून वाहत येऊन जळगाव जिल्ह्यात प्रवेश करते आणि सुमारे २५ कि.मी. लांबीचा प्रवास करून तापीला मिळते. वाघूर नदी सातमाळा डोंगरामध्ये उगम पावून दक्षिणेकडून वाहत जाऊन सुमारे चाळीस कि.मी. लांबीचा प्रवास करून पूर्णेच्या संगमाच्या पश्चिमेस ३२ कि.मी.वर तापीस मिळते. ह्या नद्यांचे तसेच बोरी नदी, पांझरा नदी, अंजनी नदी यांचे मार्ग निळ्या रंगात दाखविले आहेत.

अनेर नदीची गोष्टच वेगळी. ती सातपुड्याच्या डोंगरमाथ्यावर उगम पावून सरळ पश्चिमेकडे वाहते. अनेरचा हा मार्ग सुमारे ८० कि.मी. लांब आहे. पुढे ती धुळे-जळगाव सीमेवर दिशा बदलते आणि दक्षिणेला सुमारे ३० कि.मी. वाहत जाऊन पिलोद गावाच्या दक्षिणेला तापीला मिळते.

या सगळ्याचे विहंगम दृश्य गुप्ता सर म्हणतात तसे Bird's Eye View मध्ये साकारले गेले. हा देखावा इतका सुंदर व शिकण्यास उपयुक्त ठरला की वर्तमानपत्रात त्याला प्रसिद्धी मिळाली. मग शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी व शिक्षक, प्राध्यापक यांच्या रांगा, त्यांची स्तुतिसुमने असा भरघोस प्रतिसाद मिळाला. जळगाव महानगर पालिकेने प्रा. अनिलकुमार गुप्ता व योगिनी यांचा सत्कार केला. बक्षीस दिले. त्यामुळे जळगावातील लोक हे दृश्य बघायला गटागटाने येऊ लागले. मी फक्त आर्थिक मदत केली. साहित्य उपलब्ध करून दिले, म्हणून लोक मला सदिच्छा देतात. राणे चौकात वर्दळ वाढली.'

कार्यक्रम संपला. मी पालकमंत्र्यांना निरोप देऊन परत आल्यावर फातिमाने मला मिठीच मारली व म्हणाली, ये हुअी न बात, मेरे दोस्त।

तेथील स्त्री-पुरुष आमच्याकडे बघत होते.

फातिमाने माझा मुका घेतला व म्हणाली, 'मै आज बहुत खुश हूँ, योगिनी की माँ, आंटी, आज योगिनी की नजर उतारो. देखो कितनी सुंदर लगती है मेरी सहेली. तेरी प्यारीप्यारी सुरतको नजर ना लगे, शबीर Congratulate her, Gupta Sir, you too are very happy. No doubt. आपने कामही ऐसा किया है Exceptionally beautiful.' शबीर म्हणाला, Congratulations Yogini. We made it. I am very happy.

गुप्तासर म्हणाले, This is the fruit of our hard work. Yogini's ingenius idea and our team work has paid off.

दामूकाका सरबत घेऊन आले व म्हणाले, आधी सरबत घ्या. प्रोग्रॅम Best झाला. अभिनंदन योगिनीबाई!

मी सरबताचा ग्लास घेत म्हणाले, काका मला 'बाई' म्हणू नका फक्त योगिनी म्हणा. आम्ही सरबत पीत होतो, तेव्हा जवळच बसत असलेल्या दोन स्त्रियांचे कौतुकाने चाललेले बोलणे ऐकू आले, मायव, किती मोहक आहे ती योगिनी. उंच, सडपातळ बांधा, गव्हाळ्या रंगात जनू हळदच्या रंगाची छटा. डोळ्यांत तेज. लांब केस. दुसरी स्त्री म्हणाली, कोन्हीबी मोठ्या घरचा तिले सून म्हनून करीन.'

ते ऐकून आम्ही सगळे हसलो. मला लाजलेली पाहून फातिमा म्हणाली,'लाजू नको, लाजू नको.'

माझा निरोप घेताना फातिमा, शबीर आणि गुप्ता सर भावुक झाले. एक महिना टीम वर्क करताना शबीर, फातिमा, गुप्ता सर व मी मैत्रीच्या भावनेने अधिक जवळ आलो होतो. जळगाव जिल्ह्याच्या प्रतिकृतीत नद्या, रेल्वे, डोंगर, रस्ते, गावे साकारलेले बघून, अनेक अडचणींवर आम्ही कशी मात केली ते आठवत होते. नद्यांचे झुळझुळ वाहणारे पाणी, फुलांचे ताटवे, वृक्षांची शोभा, तापीला मिळणाऱ्या उपनद्यांना अंगाखांद्यावर घेतलेल्या प्रेमळ आईप्रमाणे दिसणारे दृश्य, सर्वकाही प्रशंसेला योग्य होते.

शबीर म्हणाला, आगे क्या? पिताजी के लिये क्या सोचा है?

मी म्हणाले, बहुत कुछ, दिल्ली सरकारमे पिताजी जाना चाहिये ये मेरा संकल्प है।

गुप्तासर म्हणाले, ये तो शिवधनुष्य उठाने जैसा है। फातिमा म्हणाली, योगिनी, we are with you.'

शबीर म्हणाला,'आसान नही है।'

मी म्हणाले, In the laboratory of life, we can experiment. Quiet confidence, patience, continuous team work, selfless and sincere service to people. These will be our assets.

गुप्तासर म्हणाले, एक भूगोल प्रकल्प साकार हुआ अब इतिहास की ओर चले।

मी म्हणाले, भूगोल, इतिहास आणि राजकारण They attract me as the Himalayan peaks to the mountaineers.

फातिमा म्हणाली, रंगमंचावर तू छान अभिनय करतेस. आता खऱ्या जीवनात तुला कर्तव्यपूर्ती करायची आहे मुझे शेक्सपिअरके As You Like It नाटक मे से शब्द याद आते है, "All the world is a Stage."

* * *

# २

मे महिन्याची सुट्टी असल्यामुळे मी उशिरा उठले. सकाळी नऊच्या सुमारास आमच्या बागेत उमललेल्या फुलांचा सुगंध पसरविणाऱ्या वाऱ्याला अंगावर घेत मी फिरत होते. त्या वेळी मला मोबाइलवर कॉल आला, मी द सॅमॅरिटन्स संस्थेतर्फे बोलतो आहे. आमचे काम संकटग्रस्त लोकांना सूचना देण्याचे आहे. नीट ऐका व मी सांगतो ते गुप्त ठेवा. आज संध्याकाळी सहा वाजता तुमच्या शिरसोली रस्त्यावरील केळीच्या बागेत एक स्त्री येणार आहे. तुमच्या वडिलांना बदनाम करण्याचे कारस्थान असून ती त्यासाठी वापरली जात आहे. तुम्ही तसे होऊ देऊ नका. आमदार राणे सद्गृहस्थ आहेत म्हणून तुम्हांला ही सूचना. काळजी घ्या.

मोबाइलवरील त्या सूचनेने माझा थरकापच झाला. त्या सॅमॅरिटनने त्याचे नाव सांगितले नाही, पण त्याच्या बोलण्यात सत्य असल्याचे मला जाणवले. मी शबीर किंवा फातिमा यांचे साहाय्य घ्यायचे नाही असे ठरविले. माझेच शहाणपण वापरायचे म्हणून मी हिंगोण्याच्या माझ्या काकांना फोन केला व सांगितले, काका, एक तातडीचे काम आहे असे सांगून आज पाच वाजता बाबांना हिंगोण्याला बोलावून घ्या. कुणाजवळ काहीही बोलू नका. ते तिथे पोचल्यावर आपल्या सर्व राणे कुटुंबाच्या जमिनीचे दस्तऐवज त्यांना दाखवा. आपल्या जमिनी आहेत तिथल्या

शेजारच्यांनापण बोलवा. कुणी कुणाच्या शेतात बांध सरकवला आहे त्यावर चर्चा करा. अतिमहत्त्वाचे समजा. बाबांनी कामाचे स्वरूप विचारल्यास भेट झाल्यावर सांगतो असे म्हणा.

बाबा हिंगोण्याला जायला निघाल्यावर मी मारुती सुझुकी घेऊन मळ्यात गेले व केळीच्या बागेत बाबा नेहमी बसतात तिथून थोड्या अंतरावर लपून बसले. सहा वाजता पैंजण-बांगड्यांचा आवाज मी ऐकला. बाबांच्या खुर्चीवर ती बसली व त्यांची वाट बघत राहिली. तिच्या मागे कुणी नाही, याची खात्री केल्यावर मी पर्समधून पिस्तूल काढले व तिच्याकडे रोखून म्हटले, बोल, इथे का आलीस? माझ्या बाबांना बदनाम करायला तुला कुणी पाठवले?

ती पळायला लागल्यावर मी हवेत गोळी मारली. त्या आवाजाने ती खाली बसली व तोंड लपवीत म्हणाली, माफ करा. मला पाच हजार रुपये एकाने दिले व साहेबांशी लगट कर म्हणून सांगितले.

मी मोबाइलवर तिचे फोटो काढले. एका कागदावर तिची जबानी तिलाच लिहायला लावून तिची सही, नाव, पत्ता घेतले. त्याच वेळी कुणीतरी येतांनाचा आवाज झाला. मी त्या दिशेने गोळी मारली पण तो पळून गेला. मी तिला विचारले, सांग, कोण होता तो. नाहीतर पोलिसांना बोलावते.

ती म्हणाली, खासदाराचा माणूस. फोटो घेणार होता. राणे साहेबांना बदनाम करण्यासाठी.

मी तिला त्वेषाने म्हटले, तू स्त्री आहेस. याचा तुझ्या चारित्र्यावर काय परिणाम होईल ठाऊक आहे का? तुझाही फोटो पेपरमध्ये आला असता, नाव छापले गेले असते. तुझा नवरा, मुले, नातेवाईक यांना तू कसे तोंड दाखवणार होतीस. कोण आहेस तू? हे नाव खरे आहे का? आण तुझी पर्स मी तपासून बघते.

ती म्हणाली, मी शेजारच्या गावातली आहे. माझे कर्ज माफ करून मला पाच हजार रुपये मिळणार होते. मी तसं काही करणार नव्हते. माफ करा. फक्त नाटक करणार होते.

तिच्या पर्समधले पाच हजार रुपये मी तिला परत केले आणि म्हणाले, तू माझ्या वडिलांची बदनामी करणार होतीस, पण मी तुझी बदनामी करणार नाही. पोलीस, वर्तमानपत्र यांना सांगणार नाही.

ती घाबरून पळालीच. अश्रू पुसत होती. रस्त्यावर कोणत्या मनःस्थितीत गेली सांगता येत नाही. पण लगेच ट्रकखाली सापडली. तिच्या मृत्यूमुळे मला धक्का बसला. मी विमनस्क झाले. माझा तिला सुधारण्याचा हेतू होता, पण झाले भलतेच.

पोलीस आले, पंचनामा झाला. अपघाताने मृत्यू अशी नोंद झाली. मी बाबांना याबद्दल काहीही सांगितले नाही. ते गुपितच राहिले. अर्थात खासदार लोमटे हादरला होता असे सॅमॅरिटनने फोनवर सांगितले होते. तुम्ही सावध राहा असे तो म्हणाला.

* * *

# ३

२० एप्रिल २०१६ला बी.ए.च्या पहिल्या वर्षाचा निकाल लागला. ३० एप्रिलपर्यंत दुसऱ्या वर्षाच्या प्रवेशाचे काम पूर्ण झाले. शबीरचे तिसऱ्या वर्षाच्या व फातिमाचे दुसऱ्या वर्षाच्या प्रवेशाचेसुद्धा आटपले. १ मे रोजी आम्ही तिघे आमच्या जॅसमिन बंगल्याच्या गच्चीवर एक योजना आखण्यात गर्क झालो होतो. चमचमणारे तारे आणि प्रकाशमान चंद्र. चांदण्याची चादर पांघरलेला परिसर, मेहरूण तलावातील चंद्राची प्रतिमा ह्या नेहमीच्या देखाव्याकडे आमचे फारसे लक्ष नव्हते.

मी म्हणाले, माझे वडीलच केंद्रसरकारमध्ये असावेत असे मला वाटण्याचे कारण म्हणजे त्यांची प्रामाणिकपणे व कळकळीने समाजसेवा करण्याची वृत्ती. त्यांची इच्छा वरच्या स्तरावर राजकारण करायची नसली, तर तशा वृत्तीच्या दुसऱ्या कुणालाही मी मदत करीन. पण विद्यमान खासदार यांना या पदावरून खाली खेचण्यासाठी काम करणे हेसुद्धा समाजसेवा करण्यासारखेच आहे, असे मला वाटते.

शबीर म्हणाला, ये काम आसान नही है, फिर भी तुम्हारा खयाल अच्छा है, इसलिये मै मदद करूंगा। हम decide करेंगे वो रास्ता मुझे मंजूर है।

फातिमा म्हणाली, खासदार ने कुछ अच्छा काम किया ही नही और उसकी स्वतंत्र पार्टी उसको कुछ position या scheme देती नही। He is just retaining his position.

मी म्हणाले, मग पुढच्या निवडणुकीत त्यांना पाडायचे, हे आपले ध्येय. माझ्या वडिलांना ह्या लोकसभा मतदार संघातून निवडून आणायचे. जनता पार्टीचे तिकीट त्यांना मिळेल असे वाटते.

शबीर म्हणाला, Let us decide now how to plan exposing the misdeeds of this Member of Parliament.

मी म्हणाले, Excess of wealth over income is my charge against him. इतना पैसा उसके पास कैसा आया? Let us collect proofs.

फातिमा म्हणाली, मैने सुना है की उसकी जो वखार है उधर सातपुडासे सागवान लकडी मे ट्रक लोड बेकायदा लाये जाते है। ये लकडी बहुत किमती होती है। एक तरकीब मेरे ध्यान मे आयी है। शबीर ने मजदूर बनके लकडी तोडने जाना, फोटो निकालना, कॉन्ट्रॅक्टर के नाम, पता, फोन नंबर हासील करना।

शबीर म्हणाला, 'मै ये काम करुंगा। मौका मिलतेही हो जायेगा।'

मी म्हणाले,'शाबास शबीर, Good beginning!'

त्याचा पैशाचा दुसरा काही स्रोत आहे का याची मी चौकशी करीन.

फातिमा म्हणाली, आसान है, पार्टी फंड पर हात मारता है और सावकारी, Money lending मे कमाता है।

मी म्हणाले, आपल्याला वेळ भरपूर आहे. पण आत्तापासून कामाला लागायला हवे. और एक बात, खासदार के कार्यकर्ता अपने Group मे आयेंगे तो try करना, लेकीन उनका मतपरिवर्तन शांती से और reasoning से होना चाहीए।

शबीर म्हणाला, Let us keep our plan secret. Your suggestion is risky. किसीने double cross किया तो दिक्कत हो जाएगी।

मी म्हणाले, OK. We will be cautious.

शबीर म्हणाला, Thank you for the delicious dinner.

मी म्हणाले, पण vegetarianच शेवटी.

फातिमा म्हणाली, तू मला आणि माझ्या ह्या चुलत भावाला हिंदू संस्कृतीची ओढ लावलीच आहेस. मग शाकाहारीचा प्रभाव येणारच. आणि आम्ही मुस्लीम नेहमीच मांसाहार घेत नाही. और ये तो रमझान का महिना है। फिर भी तुम्हारे घर खाना खाया।

मी म्हणाले, ते तुझ्या मराठी बोलण्यावरूनही दिसतेच आहे. धर्मांतर करायला मी तुम्हांला सांगणार नाही. जो तो आपल्या धर्मात सुखी असो. 'सर्वे सन्तु सुखिनः'

मी म्हणाले, शबीर, स्कूटर जपून चालव. खड्डे चुकवून जा, फातिमा म्हणाली, रस्त्यावरचे खड्डे त्याला सहज चुकवता येतील. प्रेमाचा खड्डा मात्र चुकवणे सोपे नाही.

मी म्हणाले, तुला म्हणायचे काय आहे, कोणत्या प्रेमाचा खड्डा?

फातिमा मिस्कील हसत म्हणाली, समझने वाले समझ गये, ना समझे वो अनाडी है।

मी बाय बाय करीत म्हणाले, चल, चावट कुठली.

शबीर आणि फातिमा मोटरबाईकवर घरी गेले तेव्हाचे फातिमाचे शब्द त्याने प्रेमाचा खड्डा चुकवला आहे. त्याला रस्त्यावरचे खड्डे सहज चुकवता येतील माझ्या मनात घोळत राहिले. शबीरची ओळख फातिमाचा चुलतभाऊ म्हणून झाली होती, पण त्याच्याविषयी मित्रत्वाची भावना मला नव्हती. एक देखणा व extra-curricular activities मध्ये चांगले काम करणारा, असे त्याचे व्यक्तिमत्त्व कॉलेजमध्ये जाणवत होते. त्याच्या सूचनेनुसार प्राचार्यांनी CO-existence and Value Education (शांततामय सहजीवन आणि मूल्य शिक्षण) असा उपक्रम चालू केला होता. त्या समितीचा अध्यक्ष

त्यालाच केले होते. त्यामुळे नोटीस बोर्डावर त्याची सही Chairman, Committee for Co-existence and Value Education अशी पाहून त्याचे एका कार्यक्रमात भाषण ऐकून त्याच्याविषयी वेगळेपण वाटले. त्याच्या भाषणात त्याने शांततामय सहजीवनासाठी वैश्विक मूल्ये आवश्यक आहेत व ती मूल्ये विचारात व वागणुकीत आणण्यासाठी त्या दिवशी आमंत्रित केलेल्या वक्त्यांसारखे पाहुणे नेहमी आमंत्रित करायला पाहिजे, असे सांगितले होते. जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे माणुसकीचा संदेश देणारी ही मूल्ये हवीत यावर आवाज चढवून तो म्हणाला होता, नोकरी धंदा यांच्या मर्यादा ओलांडून शिक्षण, न्याय, शांततामय सहजीवन व दयाळू समाजनिर्मिती होणे; हे शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे, असे म्हणून श्रोत्यांना उद्देशून त्याने विचारले होते, हो की नाही? Do you agree?

अशा दोन-तीन कार्यक्रमांस मी हजर होते. एके दिवशी मी त्याला म्हटलं, मराठी चांगलं लिहिलं आहे. कुणी लिहून दिलं?

तो म्हणाला, मराठी मुलीने लिहिले, पण विचार माझे आहेत.

मी म्हणाले, तू वर्णन करतो तसा समाज प्रत्यक्षात असला तर एक स्वप्नपूर्तीच होईल.

फातिमा म्हणाली, ऐसे लोग है। कम है। लेकीन है।

मी म्हणाले, उदाहरणार्थ, हा शबीरच इथे आहे. May your tribe increase. Good luck.

फातिमा म्हणाली, उसके पिताजीका याने मेरे चाचाका फल बेचनेका धंदा है। मिठास स्वभाव मे भी है।

मी म्हणाले, विचारांचीपण गोडी आहे. I am fond of sweets.

फातिमा म्हणाली, तो चलो, आइसक्रीम खायेंगे।

मग आम्ही तिघांनी कॅन्टीनमध्ये आइसक्रीम खाल्लं.

मी बाय बाय म्हटल्यावर फातिमाचा मिस्कीलपणा तिला आवरता आला नाही. ती म्हणाली, योगिनी आदतसे मजबूर हूं। गाने की पंक्ती याद आ गयी, हम बने, तुम बने एक दुजे के लिये

मी तिच्या पाठीवर थाप मारीत म्हटले, you mischievous. How can you say this?

शबीर म्हणाला, ये फातिमा कुछ भी बोलती है। As a smoker has to smoke frequently, she needs to quote from songs.

मी त्याच्या बोलण्याकडे लक्ष न दिल्यासारखे दाखवले व विषय बदलून म्हणाले, Values for co-existence, हे ध्येय उच्च आहेच पण मला वाटते आपण आपल्या संस्कृतीतील मुळे घट्ट ठेवली पाहिजेत. तसेच त्याचा अतिरेक करून हिंसापण नको.

शबीर म्हणाला, पाकिस्तानी अतिरेक्यांविरुद्ध मानसिकता प्रखर झाली पाहिजे. Values for co-existence चा तो एक भाग आहेच.

मला शेरा दिल्यावाचून राहवले नाही, you deserve admiration for this.

* * *

# ४

२० जून २०१६ हा दिवस उजाडला. आज कॉलेज सुरू होणार. हवेतील उष्णता थंड वाऱ्याला जणू आत्मसात करीत होती. ढगांनी पाडलेल्या सावलीमुळे हृदयाला जणू अनामिक संदेश मिळत होते. पडून गेलेला पाऊस आणि येणारा पाऊस यांच्यामधील ह्या काळात मन पक्ष्यासारखे फांद्यांवर ऊठबैस करते. नवीन कार्य हाती घेतल्याची माझी उभारी, इच्छाशक्ती आणि वडिलांच्या उज्ज्वल भविष्याचे चित्र यांत का कोण जाणे कॉलेज जीवनातील मैत्री, गप्पा, हसणे-खिदळणे, नाटकात काम करण्याची इच्छा अशा मोहमयी गोष्टी मिसळत होत्या.

कॉलेज सुरू झाल्यावर महिनाभरातच माझी केतनशी ओळख झाली. पुढे मैत्री झाली. त्याने जेव्हा सांगितले की, तो सुभाष लोमटे खासदारांच्या कार्यालयात संध्याकाळी जनसंपर्कासाठी बसतो; तेव्हा मला शबीरच्या सावध राहण्याचा सल्ला आठवला. पण तरीही मी

बेसावधच राहिले. केतनची बोलण्याची शैली आकर्षक होती. वागणूक नम्रतेची. व्यक्तिमत्त्व मोहक. त्यात कृत्रिमपणा असण्याची केव्हातरी शंका यायची. तारुण्याचा उन्माद मी मैत्रीच्या बंधातच ठेवला.

आमच्या मैत्रीतील काही प्रसंग व त्याचे शब्द चेहेऱ्यावर मोरपीस फिरवत राहताना वाटते तसे मनाला वाटले.

फातिमा व मी मधल्या सुटीत कॉलेजच्या बाहेर शिरसोली रस्त्यावर विरंगुळा म्हणून चालत होतो. मी तिला म्हटले, थांब गं जरा. ह्या अरणीच्या फुलांचा सुगंध मला आमच्या हिंगोण्याच्या रस्त्यावरील त्या फुलांच्या सुगंधाची आठवण करून देतो. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला केतन मोटरबाईकवर येऊन थांबला. फातिमा म्हणाली, तो केतन बघ, तू फुलांकडे बघते आहेस आणि तो तुझ्याकडे.

मी म्हणाले, चल चावट कुठली.

फातिमाने त्याला विचारले, इकडे कुठे? आणि थांबलास का?

तो म्हणाला, हम भी आपके दोस्त है, घुमने बुलाते तो हम भी आते।

मी म्हणाले, आमचं गुपित आहे. तुला कशाला सांगू. आमच्या मागेमागे येतोस काय? काय विचार आहे.

तो म्हणाला, दुसरा काय असणार, मैत्री.

मी म्हणाले, फिर कभी, आज टाइम नही।

तो म्हणाला, स्टेजपे तो नाटक करती है। असल मे भी शुरू किया क्या?

फातिमा म्हणाली, आम्ही आमच्या खासगी गोष्टी बोलतोय.

OK. फिर कभी, असे म्हणून तो परत फिरला.

एके दिवशी कॉलेजमधील वाचनालयात जिन्यावरून मी जात होते आणि वरून केतन आणि त्याचे मित्र येत होते. त्यांनी पायरीवर रस्ता अडवला. केतन म्हणाला, अरे पांडू मॅडमला जाऊ दे, मध्येच का थांबला?

पांडू म्हणाला, अर्थात, आपण आपली पायरी बघून राहावे. यांचं इंग्लिश माध्यम, आपलं मराठी. वर जाणाऱ्याला अडवू नये. पण तुम्हां दोघांची रास एकच बरं का. ज आणि क मुळाक्षरातही जवळ.

केतन हसून म्हणाला,वाचनाची आवड, पुस्तकप्रेम नंतर, आधी डोळ्यात वाच माझ्या गीत भावनांचे.

मलाही प्रत्युत्तराचा मोह झाला, मी म्हणाले, भावनाच नाही तर गीत कसले. मी बघा हे तर्कशास्त्राचे पुस्तक परत करायला आले. तुम्हां सर्वांच्या बोलण्यात तर्क कुठेच नाही. तुमचे शब्द म्हणजे बेडकाच्या उड्या.

रमेशने तिच्या शब्दांच्या उपमेचा राग येऊन म्हटले, यांचे शब्द जणू मधमाशांप्रमाणे चावतात. आम्ही निघालो, चला रे. केतनजवळ प्रेमाचं पांघरूण आहे. तो सुरक्षित राहील.

मी म्हणाले, मधमाशांपासून वाचायला पाण्यात जायला हवे.

चला गंमत पुरे झाली.

जाता जाता केतन म्हणाला, प्रेमसागर माझ्या डोळ्यात आहे. माझं काळीज त्यात सैरावैरा फिरते आहे. ते काठावर आले तर तडफडून मरेल.

मी शांतपणे निःशब्द होऊन पुढे निघाले. गमतीच्या संवादात केतनचे शब्द अत्तरासारखे वाटले आणि त्या धुंदीत मी थोडा वेळ ग्रंथालयात बसून राहिले. तर्कशास्त्राचे पुस्तक समोर होते. भावनांच्या अतर्क्य झंझावातात माझे मन पतंगाचा मांजा कापल्याप्रमाणे असहाय झाले होते.

एकदा कॅन्टीनमध्ये चहा घेतल्यावर मी घाईने पुस्तके घेऊन निघाले. सरिता माझ्यापुढे आधी निघाली. मी घाईत पर्स तिथेच विसरले. केतन जवळपास असणार. त्याने ती पर्स घेतली. मला पर्सची आठवण झाल्यावर मी माघारी आले. तेव्हा तो म्हणाला, तुझी पर्स माझ्याकडे आहे. मला सापडली. परंतु घ्यायची असेल तर आम्हांला पार्टी द्यावी लागेल. त्याचे मित्रपण पार्टी-पार्टी म्हणाले. मी, हो उद्या देईन असे म्हणून त्याच्याकडून पर्स घेऊन निघाले. त्यानंतर तो आणि त्याचे दोन मित्र, सरिता, भाग्यश्री व मी आम्ही कँटीनमध्ये

लेक्चर्सनंतर नाश्ता व चहा घेतला. त्या वेळी केतन म्हणाला, अशीच पर्स विसरत जा आणि आम्हांला पार्टी देत जा.

मी म्हटले, आठवण ठेवण्याचा शहाणपणा विकत घेतला असे म्हणायला पाहिजे.

कॉलेजची पहिली टर्म संपायला आली. १५ ऑक्टोबर शेवटचा दिवस. सकाळी ९च्या सुमारास मला एकटीला नोटीस वाचताना पाहून केतन आला व म्हणाला, योगिनी आपण बाहेर फिरायला जाऊ या. आपण दोघेच. तासाभरात परत येऊ.

मी 'हो' म्हटलं, कारण मलाही त्याचा सहवास हवासा वाटायला लागला होता. आमच्या मैत्रीमुळे जीवनवृक्षाला मोहोर आल्यासारखे वाटत होते. शिरसोली रस्त्याने जात असताना आश्विन महिन्यातील सृष्टीचे रूप मी मनात साठवीत होते. वड, पिंपळ, कडूनिंब, बकूळ, गुलमोहर या वृक्षांचे आपापले व्यक्तिमत्त्व त्यांच्या पानाफुलांतून शोभून दिसत होते. तो देखावा म्हणजे त्या वृक्षांची सभा भासली. पानगळ सुरू झाल्याने ऋतुचक्राची चाहूल स्पष्ट जाणवत होती. आकाशातले तुरळक पांढरे ढग भाद्रपद संपल्याचे जाहीर करीत होते. पक्षी उल्हसित होऊन पावसाळ्यानंतरच्या उंच उडण्याची ऊर्जा अनुभवीत होते. केतन व मी संभाषण कोणत्या विषयावर करावे याचा विचार करीत हळूहळू चालत होतो. मी म्हटले, सैराट सिनेमा पाहिलास का? मला तर कलाकृती म्हणून आवडला पण सामाजिक प्रतिष्ठा आणि त्यामुळे स्वतःच्या मुलीचे honour killing याचे धक्कादायक वास्तव सुन्न करणारे वाटते. खालच्या वर्गातील गरीब कुटुंबातील मुलाशी लग्न केल्यामुळे बापाने मुलीचा व जावयाचा खून करायचा यात जीवनातील भयानक मानसिकता उद्वेग वाटणारी, खिन्न करणारी आहे.

केतन म्हणाला, तू म्हणतेस ते खरं आहे शोकांतिका म्हणून सैराट सिनेमा गाजतो आहे. पण तुझे व माझे वडील त्या प्रकारचे नाहीत. तुला भीती वाटायला नको. मी फार पुढचे बोलतो असे तुला वाटेल.

मी म्हणाले, केतन, तू असे बोलू शकतोस हे एक आश्चर्य आहे. अरे आपली मैत्रीसुद्धा पक्की नाही. आणि तू लग्नाची गोष्ट करतोस. पुन्हा हा विषय काढू नको. माझ्या वडिलांची इच्छा आहे मी खूप शिकावे.

केतन म्हणाला, पण तुझी इच्छा काय आहे?

मी म्हटले, अर्थात मला उच्च शिक्षण घ्यायची महत्त्वाकांक्षा आहेच. पण माझ्या वडिलांनी आमच्यासाठी घेतलेले परिश्रम म्हणजे एक प्रेरणादायक सत्यकथा आहे. त्यांच्या इच्छेचा मी आदर करते.

परत येताना कॉलेजच्या हिरवळीजवळ आम्ही थांबलो. सभोवतालच्या वृक्षांच्या रांगा व कोवळ्या उन्हात चमकणारी हिरवळ शांतीचा संदेश देत होती. ते सौंदर्य बाहेर फिरण्याच्या निमित्ताने जवळून बघता आले. म्हणून मी म्हणाले, केतन, या सुंदर ठिकाणी आपण आलोच नव्हतो, पण तू फिरायला इथे आणलेस म्हणून तुझे आभार.

केतन म्हणाला, मला आता आठवले, देशपांडे सर As You Like It शिकवत असताना त्यांनी या हिरवळीचा संदर्भ दिला होता. त्या नाटकात नायक ऑरलँडो व त्याचा प्रतिस्पर्धी यांच्यात जी कुस्ती होते ती राजवाड्याबाहेरील अशाच हिरवळीवर होते. सरांनी त्या वेळी उदाहरण म्हणून कॉलेजची इमारत जणू राजवाडा व त्याला लागून हिरवळीचे हे मैदान (लॉन) असे म्हणून कल्पना करा असे म्हटले होते.

मी म्हणाले, मला तो सीन चांगला आठवतो. नायिका रोझॅलींड व नायक ऑरलॅन्डो प्रथम भेटीतच एकमेकांच्या प्रेमात पडतात.

केतन म्हणाला, Love at first sight प्रत्यक्षात असू शकतं

मी म्हणाले, मला वाटतं ती फसवणूक असू शकते. दोन्ही बाजूने तसे प्रेम नसल्यास ते अर्थहीनच म्हणायला पाहिजे. कथांमध्ये त्याबद्दल लिहिणे कलेच्या क्षेत्रात अर्थपूर्ण करता येते, पण वास्तवात स्वभावांचा मेळ, कुटुंबाची भूमिका आणि इतर अनेक गोष्टींचा यात सहभाग असतो. एकाएकी वाटणारे जबरदस्त आकर्षण धबधब्याचे

पाणी खडकांवर आदळण्यासारखे आहे. दिसायला सुंदर पण खडकांशी गाठ असते. केतन म्हणाला, नकारार्थी दृष्टिकोन असल्यास तू म्हणते ते खरे समजता येते. पण पॉझिटिव्ह दृष्टिकोनानेच आपण सुखी होतो.

ऑरलँडोचा प्रवेश होण्याआधी व नायिका रोझॅलिंड त्याच्या प्रेमात पडायच्या आधीचा प्रसंग यातील नाट्य कलात्मकदृष्ट्या ऊनसावलीच्या खेळाप्रमाणे आकर्षक वाटते.

राजकन्या रोझॅलिंड निराश असते. कारण तिच्या वडिलांना, Duke ला धाकट्या भावाने कपटाने हद्दपार केलेले असते पण स्वतःची मुलगी सिलाय हिला सोबत म्हणून पुतणी रोझॅलिंडला राजवाड्यात राहण्याचे योजिलेले असते. रोझॅलिंड निराश असते व सिलाय तिला उत्साही करण्यासाठी प्रयत्न करते. तेव्हा रोझॅलिंड म्हणते, ठीक आहे. आपण दोघी आनंदी होण्यासाठी खेळ खेळू या. मी शोधते की प्रेमात पडायच्या खेळाबद्दल तुला काय वाटते?

सिलाय त्यावर म्हणते, प्रेमात पडायचा खेळ म्हणजे खेळच बरं का. पण कुणाही पुरुषाच्या प्रेमात खरंच पडू नको.

रोझॅलिंड म्हणते, मग कोणता खेळ खेळायचा बरे?

आणि प्रेमात गुंतून जाऊ नकोस. तसेच प्रेमाच्या खेळातसुद्धा मर्यादा सांभाळ. तुझ्या निष्पाप व नितिमान मनावर वडिलांच्या हद्दपारीमुळे जो आघात झाला आहे त्यातून सावरणारे प्रेम असले, तर ठीक.

सिलाय म्हणते, दंतकथेतील दैवाचे चाक फिरविणाऱ्या अंधळ्या स्त्रीची आपण टवाळी करू या, म्हणजे तिचे देणे यापुढे समसमान तरी असेल.

रोझॅलिंड म्हणते, तसे करता यावे अशी माझी इच्छा आहे.

कारण तिची कृपा चुकीने दिली जाते. एवढेच नव्हे तर ही उदार अंधळी स्त्री तिच्या देणग्या स्त्रियांना देताना तर फारच चुका करते.

केतन म्हणाला, म्हणजे राजकन्येची चुलत बहीण तिला पुरुषांवर विश्वास ठेवू नकोस आणि प्रेमात पडण्याआधी खबरदारी घे असे सांगते. दंतकथेतील अंध स्त्री नशिबाचे चाक फिरवते व स्त्रियांवर जास्त अन्याय

होतो, हे देशपांडे सरांनी सांगितले होते. पण ती अंध असल्यामुळे व तिच्या हाती दैव चक्राला गती देण्याचे काम सोपविलेले असते, त्यात तिचा काय दोष? उलट प्रेमच आंधळे असते असे म्हणणे अधिक सयुक्तिक नाही का? माझा अनुभव मी सांगतो.

प्रथम दर्शनी प्रेमात माझे तसेच झाले होते. कॉलेजच्या पहिल्याच दिवशी तू मारुती सुझुकीमधून उतरलीस, तेव्हाच मी तुझ्या प्रेमात पडलो. बरेच दिवस मी स्वतःशीच विश्लेषण केले. भावनांना बांध घातला. मग मैत्रीचा बुरखा वापरला आणि आता खरे तेच सांगतो, माझे तुझ्यावर प्रेम आहे. As You Like It मधला नायक झाडांच्या बुंध्यावर नाव कोरून लिहितो असे सीन आहेत. मी तेच केले आहे. ही चेष्टामस्करी नाही. उतावळा नवरा गुढघ्याला बाशिंग! पण प्रत्यक्ष प्रेम मी अनुभवीत आहे.

मी म्हणाले, तुझ्या भावनांचा मी आदर करते. पण हे सर्व मला अनपेक्षित आहे. शारीरिक आकर्षणाला मैत्रीत स्थान नाही.

मी म्हणाले, वेलीवर फुले फुलावीत, आसमंत चांदण्याने भरून जावा, तसा भावनेचा हा अनुभव घेत असताना हे नाते पवित्र असावे असे मी ठरविले आहे. शारीरिक आकर्षणापुरते ते राहिले तर पाप होईल. हे विवाहानेच शक्य होईल. आणि आई-वडिलांच्या संमतीशिवाय मी त्याचा विचार करू शकत नाही. पदवीधर होईपर्यंत तर त्याचा विचारही मी करणार नाही.

केतन वकिलीच्या आविर्भावाने म्हणाला, तुझे बाबा उदारमतवादी आहेत. अहंकार व प्रतिष्ठा यांच्यावर त्यांनी विजय मिळवला आहे असे तूच सांगतेस ना. मग सैराट चित्रपटाचे भूत तुला का सतावीत आहे?

त्याचा वकिली बाणा पाहून मला हसू आलं व मी म्हणाले, मी स्वतः तसे ठरविले आहे. पदवी किंवा त्याहून अधिक शिक्षण घ्यावे असा माझा निश्चय आहे. माझ्या वडिलांचीही तीच इच्छा आहे.

तो म्हणाला, पण हे सर्व लग्नानंतरही होऊ शकते.

मी नकार दिला, नाही, ते मला मान्य नाही. संयम ठेवायला पाहिजे. लग्नाआधी शरीरसुखाचा मी विचारही करू शकत नाही.

तो आगीत होरपळून आत्महत्येचा अविचार आहे. प्रेम हे गोंडस नाव त्याला देणे योग्य नाही.

त्याने विचारले, मग प्रेम म्हणजे आहे तरी काय?

मी म्हणाले, प्रेम हे पंख आहेत. त्यांच्या सहाय्याने उंच भरारी घ्यावी. ते पंख छाटून वासनेच्या दलदलीत पडायचे नाही.

तो म्हणाला, ही स्वतःची फसवणूक आहे. या वासनेला विवाह प्रतिष्ठेचे रूप देतो. पवित्र करतो. पण शेवटी त्याच शिखरावर नेतो.

आपली फक्त मैत्री आहे. माझ्या आई-वडिलांचे माझ्या भावी जीवनाबद्दल वेगळेच चित्र आहे. कृपाया मला विसरून जा.

पुढे स्पष्ट नकार देत मी म्हणाले, तुझी विचार करायची पद्धत चुकीची आहे. समाजाच्या चौकटीत संरक्षण आणि नीती आहे. ते बंधन नव्हे तर कर्तव्य, सुख, शांती, समृद्धी यांच्यासाठी आवश्यक असा springboard आहे. त्यावरून उडी मारून झेप घेता येते. माझ्या बाबांनी घर व शेती विकून इथे आमच्यासाठी शहरी जीवनाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या प्रतिष्ठेला मी धक्का लागू देणार नाही. माझ्या अंगावरील शहारे जाऊन मला शहाणपणाची वाट दिसते आहे. त्या मार्गाने प्रवास करून योग्य वेळी आपले मीलन होईल.

तो निराशेच्या स्वरात म्हणाला, ठीक आहे, मी निघतो.

मी एकटी कॉलेजच्या गेटजवळ आले. काही मिनिटांतच दामू काका गाडी घेऊन आले. मैत्रीच्या कड्यावरून शारीरिक आकर्षणाच्या दगडधोंड्यात पडल्याने माझ्या मनाला झालेल्या जखमांवर मी आई-वडिलांच्या प्रेमाचं मलम लावत होते. लेक प्राईड जवळून गाडी वळली व सूर्यप्रकाशाने चमकणाऱ्या मेहरूण तलावाच्या पाण्याचे दृश्य पाहून केतनने निर्देशित केलेल्या वासनेच्या दलदलीला मी दूर लोटले. मला त्याची कीव आली. मैत्रीच्या निसटत्या जागेवर मी त्याला अजाणता आणले, ही माझी चूक होती. एकतर्फी प्रेम म्हणजे स्वतःची फसवणूकच.

त्या घटनेनंतर मी केतनला दुसऱ्या एका मुलीबरोबर फिरताना पाहिले तेव्हा माझ्या हृदयात कट्यार खुपसल्याप्रमाणे झाले. मी कशीबशी कॉलेजच्या बाहेर झाडाखाली थांबले. त्याच झाडाच्या खोडावर त्यानेच माझे नाव कोरून लिहिले होते, ते बघून मी विद्ध झाले. कॉलेजमधील विद्यार्थ्यांना आमच्या मैत्रीबद्दल माहीत होते. त्यांच्या आता बदललेल्या प्रतिक्रियेला सामोरे जाण्याचे धाडस माझ्यात नव्हते. दामूकाका गाडी घेऊन आले. मी घरी आल्यावर स्वतःला खोलीत कोंडून घेतले. त्या धक्क्याने आजारी पडले. माझे बी.पी. वाढले, डोकेदुखी सुरू झाली. जेवण कमी झाले. अभ्यास तर दूरच राहिला. जीवनच अर्थहीन वाटत होते. मी कुणाशी काही बोलतच नव्हते. शबीर-फातिमाला ते कारण कळले होते. पण त्याचा उच्चार त्यांनी केला नाही. माझ्या आई-वडिलांना कारण कळले असेल, पण तेही मला वाईट वाटेल म्हणून त्याविषयी प्रत्यक्ष काही बोलत नव्हते.

माझी आई म्हणायची, बेटा, आपल्याला काय कमी आहे? तुझं व्यक्तिमत्त्वच असं उठावदार आहे की मोठ्या घरचा मुलगा तुला पसंत करील. शिकायचं नसेल तर शिकू नकोस.

बाबा म्हणायचे, झाले गेले विसर. लोकापवादात ह्याचे स्वरूप होऊ नये म्हणून मी गप्प आहे. दगडूलापण शांत राहायला सांगितले आहे. अब्रू हाही आपल्या घराण्याच्या कीर्तीचा, श्रीमंतीचा भाग असतो.

मी तर अभ्यास करायचे सोडूनच दिले होते. बाबा मला आमच्या उपप्राचार्यांकडे घेऊन गेले व म्हणाले, योगिनीला समजवा. तिचे अभ्यासात लक्षच नाही. ती परीक्षेला बसायला तयार नाही.

उपप्राचार्यांनी बराच वेळ माझी समजूत काढली. माझा निराश चेहरा, काही न बोलणे, केवळ 'अभ्यास लक्षात राहत नाही' हेच पुन्हापुन्हा सांगणे, यामुळे त्यांना मला काय सांगावे सुचत नव्हते. शेवटी ते म्हणाले,'योगिनी बरेच दिवसांत कॉलेजमध्ये आली नाही.

पण आजारपण ह्या कारणामुळे तिची गैरहजेरी माफ होईल. तिची परीक्षेला बसायची स्वतंत्र व्यवस्था मी करीन, कारण इतर मुलामुलींसोबत तिला संबंध नको आहे. कॉलेज सर्व प्रकारे तिला मदत करेल. पास होण्यापुरता अभ्यास तिने करायला हवा.'

दोन-तीन वेळा बाबांनी उपप्राचार्यांबरोबर माझ्या समस्येबद्दल बोलायला मला नेले. मी काहीच बोलेना. त्यांना कारण कळले असेल हे मी जाणले. त्यांनी एका शब्दानेही त्याचा संदर्भ मला दिला नाही. त्यांच्या आपुलकीने, मदत करण्याच्या तयारीने व एका मुलीचे करिअर आणि स्वास्थ्य यांचा प्रश्न असल्यामुळे त्यांना दुःख झाले होते.

शेवटी ते म्हणाले, नथूभाऊ, योगिनीने परीक्षेला न बसलेले चांगले. आधी तिची प्रकृती सुधारू द्या. मला वाटते, डॉक्टरी इलाजाबरोबरच तिला मानसिक आरोग्यासाठी आत्मानंद आश्रमात काही दिवस राहू द्या. वेगळे वातावरण व ध्यान यामुळे तिला बरे वाटेल.

बाबांनी उपप्राचार्यांचे आभार मानले व म्हणाले, मला तुमची सूचना आवडली. योगिनी आश्रमात राहील काही दिवस.

* * *

# ५

२० मार्च २०१७ या दिवशी आई व मी आत्मानंद आश्रमात जाण्यासाठी सकाळी ७ वाजता निघालो. आमच्या जॅसमीन बंगल्यातून आईबाबांनी मला आधार देत बाहेर आणले. वसंतातली सकाळ आल्हाददायक होती. आमच्या बागेतील मोगरा, गुलाब, अनंत या फुलांचा सुगंध व मंद वारा यांमुळे बागेत थांबावेसे वाटत होते. मेहरूण तलावातील पाण्याचा साठा कमी झाला होता, तरीपण जलाशयाचे वैभव पाहताना सुखदायक वाटत होते.

बाबा मला म्हणाले, बेटा, आज तुझ्याबरोबर मी आश्रमात येत नाही. मुंबईला निवडणूक समितीची बैठक आहे.

आई म्हणाली, मुलगी इतकी दुःखी आहे, तरी तुमचे निवडणुकीचे काम तुम्हांला सोडता येणार नाही?

मी म्हणाले, आई, बाबा खासदार होणार आहेत. बाबा, दगडू काकांना चिथावणीखोर बोलू देऊ नका. निवडणुकीची धुरा त्यांना सोपविण्यात चूक झाली की काय याची मला शंका येते.

बाबा म्हणाले, ठीक आहे, तू काळजी करू नकोस.

आई म्हणाली, बघा कशी शहाण्यासारखी बोलते आहे माझी लेक.

मी म्हणाले, तशी मी ठीक आहे गं. औषधे आणि थेरपी यांचा बराच उपयोग झाला आहे. बाबांचा व तुझा आग्रह आहे म्हणून मनःशांतीसाठी आश्रमात जायला मी तयार झाले.

जयंतची १०वीची परीक्षा संपली होती. त्याला दुःखी बघून मला अपराध्यासारखे वाटले. आम्ही मायलेकी मारुती सुझुकीमध्ये बसलो. ड्रायव्हर दामूकाकाने गाडी सुरू केली. माझी नजर रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या वृक्षांकडे गेली. नवीन पालवीने सुशोभित अशा त्यांच्या फांद्या कमान करून गळाभेट घेत असल्याचा भास होत होता. तलावातील पाण्याचा देखावा, लहान मुलाच्या हसण्यासारखा कोवळा सूर्यप्रकाश, रस्त्याच्या बाजूंनी व्यायामासाठी चालणारे तरुण व मध्यम वयाचे लोक यामुळे मेहरूण तलाव आकर्षण ठरले आहे व त्या भागात आमचा बंगला आहे ही जाणीव नव्याने होत आहे की काय असे मला वाटले.

रस्त्याच्या कडेने चालणाऱ्या लोकांमध्ये मी त्याला पाहिले व मी आईला मिठी मारली. लांडग्यांच्या कळपाप्रमाणे आठवणींनी माझ्या मनाचे लचके तोडायला सुरुवात केली. शिरसोली रोडवर गाडी आली. जैन बंगल्यासमोरील रस्त्याच्या पश्चिमेकडे चिमुकले गणपतीचे मंदिर दिसताच मी हात जोडले. थोडे पुढे आल्यावर साईलीला मॅरेज हॉलजवळ पुन्हा आठवणीच्या डंखाने माझ्या हृदयाला जखमी केले.

मी न बोलता साई लीला मॅरेज हॉलकडे बोट केले. आई समजली. त्याच हॉलमध्ये एका लग्नाच्या वेळी तो मला प्रथम भेटला होता.

जळगाव-भुसावळ रस्त्यावर इच्छादेवीच्या देवळाजवळ आल्यावर दामूकाकांनी गाडी थांबवली. ते म्हणाले, देवीचे दर्शन घ्यायचे असल्यास जा. करणी केली असेल, तर बेबीने देवीचे दर्शन घेणे चांगले. आई आणि मी देवळात गेलो. जाताना माझ्या कॉलेजच्या मुली परीक्षेला जाताना दिसल्या. त्यांनी कीव आल्याप्रमाणे माझ्याकडे बघितले. देवळात एक स्त्री म्हणाली, आमदाराची मुलगी आहे ही.

दुसरी स्त्री म्हणाली, पण कॉलेजची परीक्षा चालू आहे आणि ही इथे कशी? आम्ही काही न बोलता देवळातून बाहेर पडलो. कोकिळाचे मंजूळ स्वर हेटाळणी करीत आहेत व रस्त्याच्या कडेची रानफुले कुचेष्टेने हसत आहेत असे मला वाटत होते.

नशिराबादजवळ गाडी आल्यावर मला आठवले. मी माझ्या आत्याकडे गेले होते. तिने माझे लाड केले होते. आत्या व मामा देवाघरी गेले. आतेभाऊ व वहिनी कधीतरी भेटतात. भुसावळच्या आधी माजी खासदार उल्हास पाटील यांचे मेडिकल कॉलेज व त्यास संलग्नित प्रसिद्ध हॉस्पिटलची जिल्ह्यात उल्लेखनीय रुग्णसेवा म्हणजे नंदादीपाचा माझ्या मनातील निराशेचा अंधार दूर करीत होता. नंतर भुसावळ शहराजवळ आल्यावर माझ्या नाना-नानीची आठवण झाली. त्या वेळचे मोठे वृक्ष तोडून रस्ता रुंद केला होता, तो मला विध्वंसच वाटला. त्या वृक्षांच्या दाट छायेत नाना-नानीबरोबर जातानाचा आनंद ही पर्वणीच होती. तापी नदी पाहायला आम्ही नेहमीच उत्सुक असायचो. तिचा निमुळता प्रवाह व त्यामुळे दिसणारे खडक जीवनदर्शन व्हायला निमित्त होतात. दुःखाचे दगड आनंदाला ओहोटी लागल्यावर विदारक, भयानक व भकास जीवनदर्शन देतात. कपटाने असीरगड घेऊन नसीर खानाच्या शिपायांनी बहुगुणी अहीर राजाचा सुखाचा जीवनप्रवाह रक्ताचा केला होता याची आठवण झाली.

पाडळशाला आल्यावर मोर नदीकाठी कलिंगड खाल्ल्याची व भाऊ, चुलत भाऊ यांच्या संगतीची रसाळ मधुर स्मृती ताजी आहे. पुढे भालोद गावाबाहेरील रस्त्यावर हायस्कूलच्या अलीकडच्या रस्त्याने

जाताना माझ्या बाबांनी त्यांच्या शाळेत शिकत असतानाचे प्रसंग व मित्र यांविषयी सांगितलेले आठवून जीवनप्रवाहाला अनपेक्षित वळणे कशी लागतात, त्याचे नवल वाटले. आमच्या हिंगोणे गावाबाहेरून गाडीसाठी रस्ता आहे. पण मी दामूकाकांना गावातून जायची इच्छा दर्शविली. आमच्या घराजवळ त्यांनी गाडी थांबवली. काका-काकू शेतात गेले होते. चुलत भाऊ-बहिणी शाळेत गेले होते. उन्हाळ्यात शेतकाम सकाळीच करायचे असल्याने बरेच लोक घरी नव्हते. आम्ही गाडीतून बाहेर आल्यावर वयस्कर मंडळी आमच्या भोवती जमली. सुशीला आजीने माझ्या डोक्यावर हात ठेवून म्हटले, योगिनी ना तू? केवढी उच्ची झालीस. अढी होती तव्हाची लहानी मिनी याद आहे.

आई त्या जुन्या शेजाऱ्यांशी बोलली. चहासाठी थांबायला वेळ नाही असे सांगितले. शाळेजवळून जाताना हरवलेला दागिना सापडावा तसे मला वाटले. पुढे स्मशानभूमीत माझ्या आजोबांना अग्नी दिला होता त्या भागाकडे मी पाहिले. माझे आजोबा माझ्या डोक्यावर हात ठेवून मला आशीर्वाद देत असल्याचा भास मला झाला. अर्धजागृत मनातील पूर्वजांच्या जाणिवेने माझ्याभोवती संरक्षण कवच निर्माण होईल अशी आशा मला वाटली.

पुढे आल्यावर सातपुडा पर्वताचे दर्शन म्हणजे एखाद्या योगिपुरुषाचे दर्शन वाटले. निरगुडीच्या पानांचा वास अगदी गाडीबाहेर येताच सातपुडा जवळ असल्याचा निरोप मिळाला. आईने दामूकाकांना गाडी थांबवायला सांगितले कारण आमचे मोहगण नावाचे शेत तिथे होते. आई म्हणाली, दामू थांबव. मला आमचे जळगावाला जाण्याआधीचे शेत पाहू दे.

त्या शेताचा नवीन मालक आईला बघून पाणी घेऊन आला व म्हणाला, मी देवराम कुरकुरे. हे तुमचं शेत मी घेतलं. ह्या शेतामुळे मला भरपूर फायदा झाला. देवराम खिर्डीला शाळामास्तर होते. निवृत्त झाल्यानंतर ते हिंगोण्याला जुन्या घरी राहायला आले होते, तेव्हा आम्ही हिंगोणे सोडून जळगावला स्थायिक व्हायला गेलो.

मी गाडीतून उतरले. आत्मानंद आश्रमातील शाळा-कॉलेजमध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना प्रवास करण्यासाठी रस्ता रुंद केला होता. राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत कार्यक्रमाचा भाग म्हणून स्वयंसेवकांनी लावलेले वृक्ष माळरानात शोभून दिसत होते. मध्यम प्रकल्प धरणाचे पाणी उपलब्ध झाल्याने काही ठिकाणी केळीचे बाग माळरानाच्या कोऱ्या कागदावर श्रमशक्ती आणि संपन्नता यांच्या रूपाने जाणवणाऱ्या कविता पल्लवीत होऊन निसर्गभाषेत मनाला ऐकू येत होत्या.

पुढे आल्यावर मारुतीच्या देवळाजवळ गाडी थांबली. आई, मी व दामू काका दर्शनासाठी गेलो. आईला मी निरखून पाहत होते. तिने फुलांचा हार मूर्तीला घातला. हळद-कुंकवाचा टिळा लावला. नारळ मूर्तीच्या जवळील दगडावर फोडले, आणि हात जोडून नमस्कार केला. पायाजवळ माथा टेकला व म्हणाली, देवा, मुलीला बरे वाटू दे.

आम्ही मारुतीच्या देवळापुढे अर्धा किलोमीटर आल्यावर डावीकडे एक मोठे वर्तुळाकार काटेरी कुंपण होते. त्यातून गाई व बैल आणि गोऱ्हे चरायला नेण्यासाठी मंग्या भिल्ल बाहेर आणीत होता. त्याच्या काठीचा आवाज व शब्द 'हट् हट् चल' ऐकू येत होते. थोडे पुढे आल्यावर वृक्षवेलींनी सुशोभित प्रवेशद्वाराच्या कमानीवर 'आत्मानंद ट्रस्ट, बारी, सातपुडा' असे निळ्या रंगातील आश्रमाचे नाव दिसले.

त्या दिवशी ११.३० वाजता आत्मानंद महाराजांच्या कुटीजवळ आई व मी गेलो. आत्मप्रेमी हाइट्स ह्या इमारतीशेजारी २० फूट अंतरावर २०० लोक ध्यानासाठी बसतील एवढी ध्यानवाटिका आहे. मधल्या २० फूट रुंद १०० फूट लांब वृक्षाच्छादित जागेत खुर्च्या आहेत. वाटिकेच्या पूर्व बाजूला गुरुदेवांची कुटी आहे. पहिले ध्यानसत्र संपले होते. गुरुदेवांना भेटण्यासाठी खेड्यांमधून आलेले स्त्री-पुरुष व मुले-मुली कुटीबाहेरील पडवीत बसले होते. आम्ही त्यांच्याजवळ बसलो.

गुरुदेव आल्यावर सर्व जण उभे राहिले व स्वागतपर म्हणाले, अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगिराज परब्रह्म सच्चिदानंद श्रीसद्गुरू विश्वात्मक गुरुदेव की जय.

गुरुदेवांजवळ पहिल्या रांगेतील दर्शनोत्सुक मंडळींना त्यांनी नाव, गाव, येण्याचे कारण विचारले. प्रत्येक जण त्यांना आपले दुःख, समस्या सांगून त्यांच्या उपदेशाची आतुरतेने बाट बघत. गुरुदेव काही क्षण विचारमग्न होऊन प्रत्येकाला उपदेश करीत होते. मी गुरुदेवांच्या व्यक्तिमत्त्वाने व त्याहूनही त्यांच्या करुणामय आवाजाने व प्रत्येकाची अडचण काळजीपूर्वक समजून घेऊन ममतेने उपदेश करण्याच्या पद्धतीने भारावून गेले. मध्यम उंचीचे, दाढीमिशा व डोक्यावर लांब केस, त्यातील अर्धेअधिक केस पांढरे, कमरेपासून धोतर खांद्यावर घेतलेले हेच ते आत्माराम महाराज. त्यांच्यासमोर भक्तांनी ओतलेली फुले, फळे व मिठाई यांच्या टोपल्या होत्या. गुरुदेवांचे शब्द लोक भक्तिभावाने ऐकत होते. ज्याचे शंकासमाधान झाले त्यांना फुले व एकेक फळ ते देत होते, जाताना नमस्कार करीत होते. मध्येच चार जण आले त्यांनी द्राक्षांचा मोठा खोका त्यांच्यापुढे ठेवला व नमस्कार केला. गुरुदेव त्यांच्याजवळ बसलेल्या नवख्या साधूला म्हणाले, ही द्राक्षे व फळे स्टाफला वाटून द्या. त्यांनी फळांच्या टोपल्यांना व खोक्यांना उजव्या हाताने स्पर्श केला.

मग ते आम्हांला म्हणाले, नथूभाऊंशी माझे फोनवर बोलणे झाले. खोली मिळाली ना? बरं. आज ४ वाजता इथे या तुम्ही.

त्यानंतर एका स्त्रीला ते म्हणाले, तुम्ही परवा आला होतात. मुलाला चूर्ण दिलेत?

ती स्त्री म्हणाली, दिले, पण उतार नाही. ताप मध्येच येतो.

गुरुदेव म्हणाले, त्याला आश्रमाच्या हॉस्पिटलमध्ये ठेवू, उद्या घेऊन या.

मग एका तरुण मुलाला त्यांनी विचारले, कुठून आलास? काय झाले? अस्वस्थ दिसतोस.

तो मुलगा म्हणाला,गुरुदेव, घरातील भांडणांमुळे अभ्यासात लक्ष लागत नाही. पुढच्या महिन्यात एम.बी.ए.ची प्रवेश परीक्षा आहे.

गुरुदेव म्हणाले, घरात भांडण असो, कलह असो, तू त्याकडे अजिबात लक्ष देऊ नको. ध्यान कर. सकाळ, दुपार, संध्याकाळ कमीत कमी १० मिनिटे ध्यान कर. इष्टदेवता हृदयात बघून ध्यान कर. आणि तुला वाटले, तर परीक्षा होईपर्यंत आश्रमात राहा. गुरुदेवांनी त्याला फुले व षट्चक्रे ठळक दिसणारा आत्म्याचा रूपदर्शक मानवी शरीराचा फोटो दिला.

मग गुरुदेव सर्वांना उद्देशून 'प्रसाद घ्या' असे म्हणाले व कुटीत गेले.

आम्ही प्रसादालयाकडे निघालो. आश्रमातील परिसर बघून गुरुदेवांच्या कर्तृत्वाचे मनोमन कौतुक केले. कुटीच्या पुढे तीन इमारतींमध्ये संतांचा निवास होता. आम्ही ध्यानमंदिराच्या बाजूने गेलो. मंदिरासमोर एका बाजूला हिरवळीचा विस्तार व दुसऱ्या बाजूला एका वेळी ५००० लोक ध्यान करायला बसू शकतील एवढे सभागृह. त्यानंतर गुरुदेवांची जुनी कुटी, त्याजवळ मुलींचे वसतिगृह. पिंपळाच्या वृक्षाभोवतीचा पार, त्यावर बसलेले व घरगुती गोष्टींचे संभाषण करणारे स्त्रीपुरुष, मध्येच एखादा साधू आल्यास त्यांना गुरुदेवांबद्दल विचारणे. या सर्व वास्तूमध्ये अध्यात्माच्या सुगंधाचा विलक्षण अनुभव होता. प्रसादालयात १००० विद्यार्थी किंवा दर्शनोत्सुक एकदम बसू शकतील अशी यंत्रणा. आम्ही जेवून बाहेर आल्यावर दोन जणांचा संवाद कानी पडला.

एकजण म्हणाला, काय म्हणावे या भव्य दिव्य कार्याला? शब्द अपुरे पडतात. ८००० विद्यार्थी, त्यातले अर्धे निवासी, मराठी, इंग्रजी, सेमी-इंग्रजी, शाळा, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजेस आणि आज सकाळी पाहिला तो इंटरनॅशनल स्कूलचा ५० एकरांवरील परिसर.'

दुसरी व्यक्ती म्हणाली, अजून प्रकल्प चालूच आहेत. यापेक्षाही मोठे प्रसादालय बांधले जाते आहे. गुरुदेवांना रिद्धी-सिद्धी प्रसन्न आहेत. नाहीतर हे एका व्यक्तीने करणे अशक्यच.

त्यांचे संभाषण ऐकून गुरुदेवांच्या शक्तीवर माझा विश्वास बसला.

चार वाजता आम्ही गुरुदेवांना भेटलो. मला लांब बसायला सांगून गुरुदेव आईशी बोलले. मग मला बोलाविले व म्हणाले, संकटकाळी माणसाची परीक्षा होते व त्यातून आपण शिकायचे असते. आपल्या फायद्यासाठी दुःख साधन बनते. सांग तुला काय हवे आहे?

मी म्हणाले, माझ्या मनावरचा आघात मी विसरू शकत नाही. माझी परीक्षा बुडाली. मी माझ्या वर्गातील मुलामुलींना तोंड दाखवू शकत नाही.

गुरुदेव म्हणाले, काळ हे औषध आहेच पण तो काळ अत्यल्प करून दुःखावर मात कशी करायची, तो मार्ग इथे आश्रमात तुला कळेल.

मी म्हणाले, तेच मला हवे आहे.

गुरुदेव म्हणाले, उद्या नवीन साधकांची या कुटीमध्ये ध्यानाची सुरुवात आहे. तू तिथे १० वाजता जा. ध्यान करायचे. ध्यानामुळे स्वतःला मनःशांती मिळते. ध्यानाची शक्ती अमोघ आहे. तुझ्या उत्कट इच्छा साकार होऊ शकतात. तू दूरान्वये का होईना पण तुझ्या बाबांच्या उज्ज्वल यशासाठी मदत करू शकशील. स्थानिक अदृश्य शक्तींचा तुझ्या ध्यानामुळे तुला प्रतिसाद मिळेल.

मी माझा आनंद न लपवता म्हणाले, खरंच गुरुदेव?

गुरुदेव म्हणाले, आश्रमात तीन दिवसांचे प्रशिक्षण आहे. नंतर घरी सराव करायचा.

आम्ही नमस्कार करून खोलीवर परत आलो.

* * *

# ६

दुसऱ्या दिवशी (२१-३-१७) सकाळी ७ वाजता हिरवळीवर ५०० स्त्री-पुरुष व मुलेमुली योग करण्यासाठी रांगा करून आसनात बसले होते.

जुने मंदिर, त्या भोवतालची भक्तनिवास इमारत आणि नवीन ध्यानमंदिर यांच्यामध्ये पसरलेली व काळजीपूर्वक निगा ठेवलेली हिरवळ आणि तिन्ही बाजूला डोलणारी फुलझाडे व वृक्ष सामूहिक योग सराव करायला उत्साहवर्धक होती. ते रम्य वातावरण 'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णुः.., सर्वे सुखिनः सन्तु..., ओम सहनाववतू..., ॐ भुर्भूवः..., ह्या श्लोकांच्या उच्चारांनी मंगलमय झाले. योगशिक्षक सतीशचंद्र यांनी प्राणायाम व आसने यांची तांत्रिक बाजू विषद करून त्यांचे महत्त्व पटवून दिले. प्रात्यक्षिक करून दाखवून ते करवून घेतले. रांगांमध्ये फिरून चुकलेल्या व्यक्तीजवळ जाऊन दुरुस्त करण्यास सांगितले. शेवटी 'ॐ असतो मासद् गमय्, तमसो मा ज्योतिर्गमय, मत्युर्मा अमृतम् गमयः, ॐ शान्तिः, शान्तिः हा श्लोक म्हणून योग सत्र संपले.

त्यानंतर नाश्त्यासाठी सर्वजण प्रसादालयाकडे आश्रमाबाहेर रस्ता ओलांडून जाण्यासाठी निघाले.

आई व मी जात असताना त्या गर्दीत पाठीमागून हसत, खिदळत, मस्करी करीत तीन मुली मागून आमच्या बाजूला आल्या. त्यातली एक मुलगी म्हणाली, ''अग सायली, तुला आठवते का इंग्रजीचे कुलकर्णीसर  वसंतातल्या सकाळबद्दल काय म्हणाले होते.

सायली म्हणाली, शेक्सपिअर काय म्हणाला होता ते कुलकर्णी सरांनी सांगितले, आणि त्या सॉनेटमध्ये प्रेयसीबद्दल वर्णन आहे.

आभा म्हणाली, Shall I compare thee to a summer's day? Thou art more lovely and temperate इत्यादी.

हे शब्द ऐकताच त्यांचे बाण होऊन माझ्या ह्रदयाला त्यांनी जखमी केले व मी म्हणाले Please stop it.

आई ओरडली, अगं सांभाळ स्वतःला, काय झाले असे अचानक?

त्या वेळी त्या तिघी मुलींनी मला विचारले, काय झाले?

आभा म्हणाली, आई, तुम्ही व योगिनी खोलीवर जा, आम्ही तुम्हांला चहा नाश्ता घेऊन येतो.

आई म्हणाली, ठीक आहे.

त्यानंतर ५-१० मिनिटे मी डोळे मिटून पडून होते. काल गुरुदेवांनी केलेल्या उपदेशाचा काही उपयोग झाला नव्हता. माझ्या उत्साही मनःस्थितीला सायलीने उधृत केलेल्या शेक्सपिअरच्या सॉनेटने सुरुंग लावला होता. केतनने माझी स्तुती करताना तेच सॉनेट म्हटले होते. त्या वेळी मला ते सुखाचे वाटले आणि आता विषाप्रमाणे वाटते.

त्या तिघी नाश्ता व चहा घेऊन आल्या. मग आईने त्यांना त्यांची नावे विचारली. आभा म्हणाली, ''मी आभा, ही खोडकर सायली आणि ही लता. आईने विचारले आश्रमात शिक्षणासाठी आला आहात वाटत? सायली म्हणाली, आम्ही तिघी बी.ए.च्या तिसऱ्या वर्षात आहोत.

आई म्हणाली काय योगायोग पहा. योगिनी स्वतःच्या विचारात बोलली. ती तुम्हांला बोलली नव्हती.

लता म्हणाली, खरंच योग सत्र संपल्यावर हा भेटीचा योग.

आभाने विचारले, तुम्ही कुठून आलात? पहिल्यांदाच आलात का?

मी म्हणाले, आम्ही जळगावहून आलो. आश्रमात पहिल्यांदाच आलो. कल्पना नव्हती एवढा मोठा आणि सुंदर आश्रम असल्याची.

लता म्हणाली ८००० विद्यार्थी पूर्व प्राथमिक ते ग्रॅज्युएशनपर्यंत इथे शिकतात. मराठी, इंग्रजी, सेमी इंग्रजी, इंटरनॅशनल स्कूल, कॉलेजेस आणि जवळजवळ ४००० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे. आम्ही तिघी आर्ट्स कॉलेज हॉस्टेलमध्ये.

सायलीने विचारले, योगिनी तू कोणत्या शाखेत आहेस?

मी म्हणाले, मी आर्ट्सचे पहिले वर्ष पास झाले. दुसऱ्या वर्षाची परीक्षा चालू आहे आणि मी इथे दुर्दैव म्हणून आले आहे. काय सांगू?

आभा म्हणाली, दुर्दैवाकडून सुदैवाकडे जाण्याचा मार्ग इथे गुरुदेव व त्यांचा ध्यानमार्ग.

सायली म्हणाली, आदिवासी कुटुंबातली ६०० विद्यार्थिसंख्या आहे. महाराष्ट्रातील खेड्यांमधून आलेले. गरिबी त्यांच्या पाचवीला पुजलेली. पण इथे राज्य व राष्ट्रीय स्तरावर परीक्षांमध्ये, खेळांमध्ये व कलेमध्ये त्यांनी प्रावीण्य मिळविले आहे.

आभा म्हणाली, आज संध्याकाळी आम्ही येऊ. तुम्हाला पूर्ण आश्रम दाखवू.

आई म्हणाली, पहिल्या भेटीतच तुम्ही तिघी आपुलकीने सहकार्य करीत आहात. बरे वाटते. बाहेरच्या समाजात अशी मदत मिळत नाही. आपुलकी तर सोडाच.

आभा म्हणाली, आश्रमात सौहार्द हा एक समाधानकारक अनुभव आहे. अनोळखी लोक इथे भेटल्यावर त्यांना आंब्याला मोहोर यावा तसे मदत, मित्रत्व, विचारपूस यांचा माणसांच्या मनाला बहर येतो. आम्ही या वातावरणात ३ वर्षांपासून आहोत. ध्यानाचा साईड इफेक्ट असेल.

मी म्हणाले, तुम्ही तिघीजणी जळगावला या. उन्हाळ्याची सुटी जवळच आहे.

सायली म्हणाली, तू पण आमच्या गावी यायचं बरं का. जळगाव जिल्ह्यात प्रवेश करताना व जिल्ह्यातून बाहेर वाहताना तापी नदी बघण्यात मजा येते.

मी म्हणाले, त्याचा देखावा आमच्या कॉलनीतील नकाशात आहे. मला खात्री आहे तुम्हांला आवडेल. आभा म्हणाली, अच्छा तो देखावा. त्याबद्दल मी पेपरात वाचले होते. छान फोटोपण पाहिला. तुझी कामगिरी दिसते.

मी म्हणाले, आमच्या भूगोल विषयाचे प्राध्यापक, माझी कल्पना आणि माझ्या मित्रांचे श्रम.

सायली म्हणाली, मग तर ती कलाकृती बघायलाच पाहिजे.

लता म्हणाली, त्याचे वर्तमानपत्रातील कात्रण माझ्या संग्रहात आहे.

मी म्हणाले, Oh, really? I am so glad to know it.

आई म्हणाली, मैत्रीचे बंध निर्माण होताना मी बघते आहे.

मी म्हणाले, मला शेक्सपिअरच्या As You Like It ह्या नाटकाची आठवण झाली. त्यात Forest of Arden नावाचे magic forest आहे. त्या अरण्यात ताटातूट झालेले प्रियकर-प्रेयसी, वडील-मुलगी, मित्र भेटतात. शुभ घटना घडतात.

सायली म्हणाली, फर्स्ट इयरला हे नाटक अभ्यासाला होतं. All the world is a stage ही ओळ त्यातलीच आहे.

आभा म्हणाली, चला निघू या.

त्या तिघी bye bye करीत निघाल्या. आई व मी ध्यानासाठी गुरुदेवांच्या कुटीजवळील ध्यानकुटीत गेलो.

* * *

# ७

२२ मार्चला (२२ मार्च २०१७) सकाळच्या ध्यान सत्रानंतर सभागृहाबाहेर आल्यावर आभा, सायली आणि लता भेटल्या.

आभा म्हणाली, आम्ही उशिरा आल्याने मागे बसलो होतो. तुला पुढच्या रांगेत बसलेली पाहिले. आई कुठे आहे, दिसत नाही.

मी म्हणाले, आई तिच्या नवीन ओळख झालेल्या मैत्रिणीबरोबर मध्ये बसली असेल. त्या दोघी सकाळपासून बरोबर आहेत.

सायली म्हणाली, चला फिरायला जाऊ.

मी म्हणाले, आपण आश्रमाबाहेरचा परिसर बघू या.

लता म्हणाली, वनात भटकायची इच्छा झाली वाटतं.

मग आम्ही मुख्य दरवाजातून बाहेर पडलो. अंजन वृक्ष ठिकठिकाणी संरक्षणासाठी उभे असलेल्या हिरव्या गणवेशधारी शिपायांप्रमाणे वाटले. जवळ गेल्यावर पाहिले तर चार-पाच भिल्लिणी त्या वृक्षांवर चढून पाला तोडीत होत्या. ते बघून ते वृक्ष शिपायांप्रमाणे नसून सेवाभावाने मदतीस उभे असलेले ऋषितुल्य निसर्गपुरुष वाटले.

पुढे गेल्यावर मंग्या भिल्लाची झोपडी व गायी, बैल, वासरे यांचे काटेरी कुंपणातील निवासस्थान दिसले.

मंग्या गुरांना घेऊन लांब चांगले गवत असेल तेथे गेला होता. सागाची झाडे आपल्या हत्तीच्या कानासारख्या पानांनी डौलदार वाटली. बोरी वृक्ष नवीन पालवी धारण करून बोराच्या निर्मितीसाठी नवा जोम साठवत होता. गवत गुरांनी फस्त केल्यामुळे वातावरण निराश दिसत होते. अजून आत गेल्यावर मोहाच्या फुलांचा सुवास व रोहीस गवताचा (रोशा गवत) सुगंध एकमेकांशी स्पर्धा करीत असतानाचा अनोखा सामना बघायला मिळाला.

खैर, टेंभुर्णी, पळस, हिवर ही वनांना तळहातावरील रेषांच्या उभ्या आडव्या रेषांप्रमाणे आपले लहान स्थान स्वीकारून नकळत वनवैभवाची शोभा वाढवत होते. आपल्या औषधी गुणांचा नम्रपणे स्वाभिमान बाळगणाऱ्या ऐन, बेहडा, हिरडा, जांभूळ, शामलता, वनजाई यांच्या दाटीवाटीने वनाची समृद्धी वाढली होती. सातपुडा एकूणच परोपकाराचा आयकॉन (icon) वाटला. माझे मन प्रसन्न झाले. त्यातून माझ्या बाबांबरोबर लहानपणी इथे आल्याच्या आठवणी लांब लावलेल्या दिव्याप्रमाणे सुखावत होत्या.

सायली म्हणाली, ‘‘आपण सगळ्या जणी गप्प का? मनाशीच संवाद की ह्या वनाशी?

मी म्हणाले, मला इथे एका उच्च भावनेने भारावून टाकले आहे. सुप्त शक्तीचा सातपुड्यातील हा आविष्कार माझ्या मनाला मोहून टाकत आहे. बोला तुम्हांला काय वाटते?

आभा म्हणाली, तुझ्या शब्दांत मी माझ्या भावना पाहत आहे.

लता म्हणाली, मलापण तसेच वाटत आहे.

आभा म्हणाली, रंगमंचावरील ह्या सुपरनाट्यात सीन जरा बदलवू या का?

मी म्हणाले, You are welcome.

आभा म्हणाली, मी आमच्या कॉलेजमधील कबड्डी टीमबरोबर जळगावच्या नॅशनल कॉलेजमध्ये स्पर्धेत खेळायला गेले होते. सायली म्हणाली, त्याचे नाव बरे आठवते तुला. फार आवडला होता असे वाटते.

आभा म्हणाली, त्याचे आकर्षक व्यक्तिमत्त्व लक्षात राहण्यासारखे आहे. कबड्डी खेळण्यातील प्राविण्य त्याच्या स्वभावातील killing instinct दर्शवते. ह्या वर्षी तो टीममध्ये नव्हता. पण conspicuous by absence अशी जाणीव होत होती.

लता म्हणाली, त्यानेच आपल्या संघाला मेजवानी दिली होती. मी पण त्या वेळी होते. ही आभा केतनकडे कौतुकाने बघायची.

आभा म्हणाली, sportive spirit असेच असते.

सायली म्हणाली, समजा आभा आणि केतन या दोघांची मैत्री झाली असती तर पुढे काय होऊ शकले असते, अंदाज करा.

लता म्हणाली, मग तो इथे आश्रमात आला असता.

सायली म्हणाली, आभाला propose करायला. दुसरे काय?

लता म्हणाली, त्याचे लक्ष आभाकडे खास असे नव्हते. विशेष प्राविण्य असलेली मुले स्वकेंद्रीत असतात.

सायली म्हणाली, त्याने लताला पण नजरेचा नजराणा दिला नव्हता असे दिसते. म्हणून त्याला ती Narcissus trait देऊन आपखुष म्हणून शिक्षा देत आहे.

आभा म्हणाली, खरंच, केतनसारख्या तरुणाच्या प्रेमात पडलेल्या तरुणीची काय दशा होईल याचा अंदाज करता येतो.

त्यांचे संभाषण चालू असताना मी गप्प राहिले. मी मागेच चालत राहिले. त्यांचे हसण्यावारी बोलणे मला जिव्हारी लागले.

मी म्हणाले, अगं चला परत. पाय घसरून मी पडले. आईने व त्या तिघींनी माझ्या साडीतील काटे काढले.

सायली मिस्कीलपणे म्हणाली, पडायला काटेरी वाटच मिळाली हिला. पडायचे झाले तर हिरवळीवर पडणे मला आवडेल. योगिनी

चांगल्या न्यूरो सर्जनकडे तपासून घे. आई, तुम्ही हिला मुंबईला हिंदुजा हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. अगदी अर्जंट.

मी म्हणाले, ठीक आहे आजीबाई. तुमचा सल्ला मोलाचा आहे. तुम्हां तिघींच्या सहवासामुळे माझे दुःख कमी झाले आहे. चला जेवायची वेळ झाली.

त्या दिवशी तीन वाजता आई व मी पुन्हा गुरुदेवांना भेटायला गेलो.

गुरुदेव म्हणाले, आज योगिनीवर ध्यान करण्याचा चांगला परिणाम दिसतो आहे. खरं ना?

मी म्हणाले, हो, ध्यानामुळे मन स्थिर झाल्यासारखे वाटते.

आई म्हणाली, पण मधूनच केव्हातरी तिला स्वतःला सावरता येत नाही. आज सकाळीच ती फिरायला गेली तेव्हा मूर्च्छा येऊन पडली.

गुरुदेव म्हणाले, कुणी काही बोलले का?

मी म्हणाले, माझ्या इथल्या मैत्रिणी माझ्याबरोबर होत्या. वनश्रीच्या सुजलाम्, सुफलाम् देखाव्याने मला लहानपणाच्या माझ्या बाबांबरोबर इथे आल्याच्या आठवणी आल्या. एका मैत्रिणीने जळगावच्या कॉलेजमधील एका प्रसंगाविषयी सांगितले व मला मूर्च्छा आली.

गुरुदेव आईला म्हणाले, योगिनीला विचारा तो कोणता प्रसंग होता. योगिनी, मला सांगू नकोस पण घरी गेल्यावर आईला मोकळेपणाने सर्व काही सांग. काहीही गुपित मनात गाडून ठेवू नको. त्यांची भुते वर येऊन तुला त्रास देतील. शिवाय त्यांचा परिणाम एखादी व्याधी किंवा शारीरिक दुर्बलता होऊ शकतो. त्यांची विध्वंसक शक्ती नाहीशी करायची असल्यास त्याबद्दल स्पष्टपणे विश्वासू माणसाला कथन करायला हवे.

मी म्हणाले, होय आलं लक्षात.

गुरुदेव म्हणाले, काळ हे तर औषध आहेच आणि ध्यानामुळे दुःखाला दूर लोटता येते. ध्यान सोडू नको. तुला तुझ्या बाबांना

मोठा पुढारी होण्यात स्वारस्य आहे. मग त्यासाठी तुझ्या मदतीची गरज आहे.

मी म्हणाले, फक्त स्वारस्य नव्हे, ते माझे ध्येय आहे.

गुरुदेव म्हणाले, मग आत्मचिंतन कर. शक्ती मिळेल. मनःशांतीचा अनुभव येईल व तुला योग्य निर्णय घेता येतील.

आम्ही गुरुदेवांना नमस्कार करून कुटीच्या बाहेर आत्मप्रेमी हाइट्सच्या बाजूने सभागृहाच्या वऱ्हांड्यावर बसलो. पाच वाजताचे ध्यान शिबिर सुरू होण्याच्या वेळेआधी जमलेल्या लोकांचे भावुक चेहेरे मी पाहत होते. आपुलकीचे बोलणे, तेही नातेसंबंध नसूनही; त्यांच्या मनातील आशा, आकांक्षांचा वेध घेत मी विचारात मग्न झाले. आपापल्या आयुष्यातील चुका, दुष्कर्म, परिस्थितीजन्य दुःख यांचे भार कमी करण्यासाठी पश्चात्ताप, मनोमन क्षमायाचना, मानसिक प्रदूषणाचे शुद्धीकरण यासाठी ते येत असावेत असे मला वाटले. गुरुदेवांचे सांनिध्य, आध्यात्मिक वातावरण व ध्यान यासाठी पापामुळे शिक्षा स्वीकारून ते माझ्याप्रमाणे इथे ध्यान करण्यासाठी येत असावेत असा अंदाज मी केला.

अपघाताने भेटलेल्या त्या तिघी मुलींबद्दल आई व मी त्या गेल्यानंतर बोललो.

आई म्हणाली, त्या आभाचा चेहरा अनंताच्या फुलासारखा अर्धोन्मीलित वाटतो. थोडी स्थूल, हळू चालणारी आणि आपल्याच विचारात रमलेली. आवाज थोडा घोगरा वाटतो, नाही?

मी म्हणाले, तू म्हणतेस ते खरे आहे. सायली आभाला विरोधाभास वाटते. बारीक, उंच, नीटनेटकी केशभूषा, आश्रमात बॉबकट असणारी ती एकटीच दिसते. मधूनमधून केस कानामागे करीत असते. बोलायला व चालायला तुरुतुरु. खेळकर आणि थोडी खोडकर दिसते. नजर भिरभिरत असते. आवाजात गोडवा आहे. गव्हाळी रंगातील देखणेपणा आकर्षक दिसतो. चापून चोपून नेसलेल्या साडीत ती छान दिसते. आई म्हणाली, आणि ती लता.

तिची तऱ्हा वेगळीच. एम.बी.ए.चे वेध लागलेले तिच्या बोलण्यात आणि वागण्यात आत्ताच दिसते. आश्रमातल्या मॅनेजमेंटचे कौतुक करीत असते. उच्चभ्रू होण्याची स्वप्ने पाहत आहे. मितभाषी, अभ्यासू आणि चौकस. चांगले सौष्ठव असल्याने तिला पॅन्ट आणि टी शर्ट शोभतात. मोकळे लांब केस तिच्या सौंदर्यात भर घालतात. मी फातिमाची आठवण काढून म्हटले, आपली फातिमा अर्धे हिंदी, अर्धे मराठी बोलून शब्दांवर जोर देऊन, हिंदी सिनेमातील गाण्यांच्या ओळी म्हणून वेगळीच पण जवळची मैत्रीण आहे. मदत करायला तत्पर, परकेपणा झटकून टाकणारी. कुर्ता सलवारमध्ये चैतन्यमूर्तीच आहे. तिचे मानेवर स्थिरावलेले कुरळे केस, सरळ नाक, सावळा रंग हे सर्व मला आवडते.

आई म्हणाली, तो शबीर तुमच्यातला लाजरा तरुण. शांत, धीरगंभीर, दाढीमिशा मिरवीत मनातलं क्वचितच सांगणारा आहे.

मी म्हणाले, विश्वासू आहे. भरीव काम करून श्रेय न घेणारा आहे. त्या दिवशी मी निराशेने रस्त्यावर उभी होते तेव्हा अचानक आला व मला घरी पोचवले. आतासुद्धा त्याला फातिमाने व मी एक जबाबदारीचे काम दिले आहे.

आईने विचारले ते कोणते काम?

मी म्हणाले, ते आमचं गुपित आहे. तुला नंतर कळेलच.

* * *

## ८

पाच वाजता नवीन साधकांचे ध्यानसत्र संपल्यावर मी माझ्या नवीन मैत्रिणींची वाट बघत महादेवी सभागृहाच्या व्हरांड्यावर बसले.

त्या व्हरांड्यावर खेड्यातून आलेले स्त्री-पुरुषही बसले होते. नऊवारी लुगडे व चोळी, गळ्यात मंगळसूत्र, कानात रिंग, कपाळावर कुंकू, काही तरुण स्त्रिया साडी नेसलेल्या, कपाळावर

टिकली अशा वेषात व पुरुष धोतर, शर्ट किंवा पॅन्ट, टी शर्ट घालून संभाषण करीत होते.

''माह्या नवरा दारू पेये- गुरुदेवांची किरपा. त्यानं दारू सोळ्ळी. मी सुखी झाली.''

''अन् याह्यलेबी गंजीपत्त्याचा नाद व्हता. गुरुदेवचा सल्ला. त्याहीन तव्हापासून गंजापत्त्याचं नावजनी काहाळलं''

आश्रमात पुष्कळ जोडप्यांची लग्न लावून देतात. गरीब लोकांना खर्च जमत नाही. चांगली व्यवस्था असते. माझंपण लग्न इथेच झालं होतं''

शाळा सुटल्यावर युनिफॉर्ममधली मुले मुली रांगेने वसतीगृहाकडे जात होती. काही मुले खेळत होती. एका बाजूला मुली खेळत होत्या. प्रसादालयातून चहा आल्यावर तिथे गर्दी जमली.

त्या तिघी आल्या. आभा म्हणाली, ''योगिनी तुला चहा आणते. आमचा घेऊन झालाय.''

सातपुड्याच्या पायथ्याशी शाळा कॉलेजच्या इमारती, तेथील स्वच्छता, बागेला मेंदीचे कुंपण आणि मुलामुलींची हसत खेळत नेमून दिलेले काम करण्यामुळे परिसराला जिवंतपणा आला होता.

''ए वासू, बघ माझे जास्वंद किती फुलांनी शोभून दिसते. मी प्रेमाने पाणी घालतो ना म्हणून.''

''अनंता, तूच एकटा प्रेमाने पाणी घालतो? आणि मी काय नुसतेच पाणी देतो. ही मेंदी बघ हिरव्या पानांनी बागेचा पदर झाली आहे.''

''अगं शालिनी, मला पाइप दे ना. किती वेळ तूच पाइप वापरतेस. माझे गुलाब बघ तान्हेले झालेत.''

''संध्या, चल, आटप लवकर, ध्यानासाठी जायचे आहे.''

''अरुणा, आज नाटकाच्या रिहर्सलला आली नव्हती काय? बरं नाही का तुला?''

''हो जरा डोकं दुखत होतं.''

''खुशाल, आज कोणती भाजी असेल?''

''तुला कारली फार आवडते ना? तीच भाजी असेल.''

''एवढे कुठले नशीब, तुझी आवडती बटाट्याची असेल.''

असे संभाषणाचे नमुने ऐकत आम्ही शाळेच्या इमारतीत गेलो. पहिले तीन मजले शाळा व वरील दोन मजले होस्टेल. अशाच दोन शाळा पाहिल्या मग इंटरनॅशनल स्कूल व कॉलेज कँपस.

सायली म्हणाली, ह्या पुढच्या भागात नेहमी बसेस पार्क केलेल्या असतात. मग चारही बाजूची ही अत्याधुनिक इमारत. मध्ये हिरवळ. आवडला परिसर?

मी म्हणाले, Grand. हे तर विद्यानगरच आहे.

वरच्या मजल्यावर गेल्यावर लता म्हणाली, ही म्युझिक रूम, पलीकडे Drama Hall, त्या बाजूला प्रयोगशाळा, जिमखाना तळमजल्यावर आहे. स्कॉलर, कलाकार, खेळाडू या शाळांतून तयार होतात. बक्षिसे, ट्रॉफीज मिळवतात.

त्यानंतर गोशाळा व फळबाग पाहिली. परत येताना मराठी शाळेचे हेडमास्तर चव्हाण सर भेटले. ते म्हणाले, तुम्ही उशिरा आलात. आमच्या विद्यार्थ्यांशी संवाद केला असता तर त्यांनाही बरे वाटले असते. शहरातून व खेड्यातून विद्यार्थी येतात.

आईने विचारले, वसतिगृहात राहत नसलेल्या विद्यार्थ्यांना ध्यान करायला मिळत नसेल.

चव्हाण सर म्हणाले, ध्यानाची सवय हे तर गुरुकुलाचे महत्त्वाचे अंग. त्यांच्यासाठी स्वतंत्र वेळ असते. मला एक खंत आहे.

आईने विचारले, कोणती?

सर म्हणाले, मी स्वतः शिक्षक आहे. तुम्हांला वाटेल मी शिक्षणाविरुद्ध का बोलतो. पण हजारो विद्यार्थी शेतकरी समाजातून शिक्षण घेतात. मग त्यांना शहरात जाऊन नोकरी हवी असते. इथे शेतमजूर मिळत नाही. अन्नधान्य महत्त्वाचे नाही का?

मी म्हटले, सर, शिक्षण घेऊनही शेती करता येते. तसे संस्कार तरुण पिढीवर व्हायला पाहिजेत.

सर म्हणाले, वास्तव फार वेगळे आहे. तुम्ही कॉलेज शिकल्यावर शेतकरी नवरा करणार का?

मी म्हणाले, पण त्यासाठी शिक्षणासारखे श्रेष्ठ मूल्य शेतकऱ्यांच्या मुलांना मिळायला नको का?

सर म्हणाले, शेतीकाम अधिक मूल्यवान आहे.

मूल्य श्रेष्ठ की कनिष्ठ हे कोणी ठरवले? तुम्ही अजून लहान आहात. मी शिक्षक असून असे म्हणतो यामागे माझा अभ्यास आहे. शेतकऱ्यांच्या काही हुशार मुलांनी अवश्य उच्च शिक्षण घ्यावे पण इतरांनी १०-१२वी नंतर शेती करावी असे माझे मत आहे.

मी म्हणाले, १०-१२वी नंतरही तंत्रज्ञानाचे कोर्सेस आहेत. शेतीचे महत्त्व कमी नाही. पण शिक्षणामुळे, नोकरीमुळे प्रतिष्ठा, पैसा अधिक मिळतात हे सत्य आहे. ती समाजाची चूक आहे.

आई म्हणाली, चला. उशीर झाला आहे. सर, आभारी आहे.

त्या दिवशी रात्री ध्यानाच्यावेळी मी अस्वस्थ झाले. चव्हाण सरांच्या दृष्टिकोनामुळे मी व्यथित झाले. बऱ्याचशा शेतकऱ्यांच्या मुलांनी शेती करावी, उच्च शिक्षण घेऊ नये या त्यांच्या मतामुळे मी गोंधळले. विचाराअंती मला वाटले व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य माणसाला असायला पाहिजे.

आश्रमाचा परिसर घाईतच पाहिला. त्यात चव्हाण सरांच्या मतांनी मी अस्वस्थ झाले. बराच वेळ विचार केल्यावर मी ठरविले की जेव्हा शक्य होईल तेव्हा एखादा गरजू तरुण शेती करायला उद्युक्त झाला तर त्याला आर्थिक साहाय्य करायचे.

* * *

# ९

आत्मानंद आश्रमातील मुक्काम संपला. तिसऱ्या दिवशी संध्याकाळी शबीर व फातिमा मला भेटायला आले. माझ्या बाबांनीच त्यांना पाठविले होते. त्या दोघांना भेटून मला आनंद झाला.

फातिमाने मला मिठीच मारली.

मी म्हणाले आप आए बहार आई। हम खूश हो गये।

फातिमाची गाण्यातून बोलायची शैली तिच्या स्वभावाचा भागच झाली होती. ती म्हणाली,

बहारो फूल बरसाओ, मेरी सहेली मिली है। मुझे मिले बिना तू इधर चली आयी. मै भी आती तुम्हारे साथ। आवाज देकर हमे तो बुलाती। दोस्ती मे इतना ना सताओ।

मी म्हणाले, सॉरी, लेकिन एक अनुभव तुम्हे न बुलानेसे हुआ।

फातिमाने विचारले, क्या चीज? बोलो जल्दी बोलो।

मी म्हटले, तुम्हे कितना मिस करती हूँ ये मालूम हुआ।

फातिमा म्हणाली, ग्रेट, हम खूष हो गये। Sorry! forgot to introduce my cousin, Shabeer to aunty.

फातिमाचा आग्रह म्हणून मी आलो. तिला आश्रम बघायचा होतो. तुम्हांला भेटायचे होते, आणि ड्रायव्हर तर हवाच. फातिमाचा ड्रायव्हर मी बरं का!

मी म्हणाले, फातिमाचा तू कझीन. ड्रायव्हर काय म्हणतोस. बहिणीसाठी एवढे तर करायला हवेच. जळगाव जिल्हा चित्र साकारण्यात तुमचे महत्त्वाचे सहकार्य मिळाले होते.

माझ्या वडिलांच्या भावी यशासाठी तुम्ही उपयुक्त सूचना केल्यात. प्रतिभा, तुम्ही व मी आपली योजना कार्यान्वित करण्यासाठी मधून-मधून भेटायला हवे.

तेवढ्यात आभा, सायली व लता आल्या.

आभा म्हणाली, ''तू सकाळी लवकर जाशील म्हणून तुला निरोप द्यायला आम्ही आलो.''

मी म्हणाले, Thanks. Let me introduce my friend Fatima and this young gentleman is her cousin Shabeer. Fatima, these are my new friends, Abha, Sayali and Lata. They too are in T.Y.B.A.

फातिमा म्हणाली, नमस्कार, Birds of the same feather flock together. All Arts faculty students. Nice.

सायली म्हणाली, आम्ही इंटरनॅशनल स्कूल कँपसमधील आत्मबोध कॉलेजमध्ये आहोत. आमची व योगिनीची ओळख इथेच परवा by chance झाली.

लता म्हणाली, आश्रमातील वातावरणच असे आहे की सहृदयतेने सर्व inmates एकमेकाला मदत करतात. Gurudev Bond असं म्हणायला हरकत नाही.

सायली म्हणाली, इथे होस्टेलमध्ये राहणारे ४००० विद्यार्थी आहेत. त्यांचे आईवडील त्यांना भेटायला शनिवार-रविवार येतात. भक्तमंडळी तर नेहमी येतातच. जळगाव जिल्ह्यातील बरेच लोक त्यांचे प्रश्न घेऊन येतात. गुरुदेवांचा सल्ला घेतात. चार हजार विद्यार्थी बसेसने येतात. सत्संग मधून मधून चालू असतो. ध्यान करणे केंद्रबिंदू आहे. गुरुदेवांवरील श्रद्धा जखमेवरील मलम आहे. माणुसकी, सामाजिक बंध, अध्यात्माची जाणीव या सर्वांमुळे इथे मुलेमुली, पालक, भक्त संत निवासातील कुटुंबे आश्रमात शांततेचा भंग न करता असतात.

लता म्हणाली, इथून गेल्यावरसुद्धा सहजीवनाचा impact समाजात पसरतो.

शबीर म्हणाला, तू impact हा शब्द वापरल्यामुळे मला बरट्रांड रसेलच्या पुस्तकाची 'Impact of Science on Society' आठवण झाली. विज्ञान समाजाला वरदान ठरले आहे याचा उहापोह या पुस्तकात आहे. भारतातील अध्यात्माची प्रगती आणि पाश्चिमात्त्य विज्ञानाची प्रगती यांचा संगम झाल्यावर जीवन किती सुंदर होईल याची उदाहरणे आहेत.

आभा म्हणाली, कालच आम्ही असे बोललो. सातपुड्याच्या मांडीवर बसलेल्या आमच्या आश्रमाचे असे वर्णन कल्पकतेने शब्द फुलाचा हार घालून त्याचा गौरव करण्यासारखे आहे. शबीर थँक्स!

फातिमा म्हणाली, भाई किसका है।

माझ्या आईने आभा, लता व सायली या तिघींना उद्याच आमच्याबरोबर जळगावला यायचे सुचविले. तसा आग्रहच तिने केला. ती म्हणाली, मी बघितले की आभा, सायली व लता यांचा स्वभाव योगिनीला आवडला. फातिमाप्रमाणेच ह्या तिघींमुळेही ती आनंदी राहते. परीक्षाही संपली आहे.

मी म्हणाले, आईने माझ्या मनातलेच सांगितले. खरंच आपण सगळ्याजणी आमच्या घरी मजा करू.

त्या तिघींनी जळगावला येण्यास होकार दिला. घाईघाईने रेक्टरकडून संमती मिळवली व २४ मार्चला सकाळी आम्ही आश्रम सोडला.

संध्याकाळी आम्ही तिघी फिरायला गेलो. जळगाव शहराच्या एका भागाचे दर्शन झाले. जळगाव स्टेशनच्या बाहेर तिकीट कार्यालयाच्या हॉलजवळ १० फुटांवरच डॉ. भीमराव आंबेडकरांचा भारताची राज्यघटना हाती घेतलेला भव्य पुतळा प्रेरणादायक वाटला. रस्त्याच्या दोन्ही बाजूची मिठाईची दुकाने, हॉटेल, लॉजिंग व चहाच्या लोटगाड्या, पानपट्टीची दुकाने आपल्याला लगेच विचार-भावनांच्या उंचीवरून जमिनीवरील वास्तवात आणतात. अर्थात डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वाचे वलय मनात राहतेच. थोडे पुढे आल्यावर जवाहरलाल नेहरूंचा पुतळा नेहरू चौकात शांत, धीरगंभीर व एक पाऊल पुढे असा भाव निर्माण करतो. पुतळ्याच्या उंच फाउंडेशनवर संगमरवरी दगडांवर स्वातंत्र्य लढ्याची चित्रे कोरलेली असल्यामुळे स्वातंत्र्य लढ्यानंतरच्या पहिल्या पंतप्रधानांचा हा पुतळा औचित्यपूर्ण वाटतो. राज्यघटना व ती राबविणारा यांचे सान्निध्य शहराच्या प्रवेशद्वाराजवळ नवयुगाची नांदी ब्रॉन्झ व मार्बलमध्ये अखंड ऐकू येते.

स्टेशन रोडने उजवीकडे वळल्यावर म्युनिसिपालटीची उंच इमारत आधुनिकतेचा झेंडा असल्यासारखी भासते. थोडे पुढे गेल्यावर शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, तलवार पोलादी मनगटांत उगारलेली आणि दमदार घोड्याची धावतानाची प्रतिकृती स्फूर्तीच्या लाटा मनात निर्माण

करतात. शौर्य, पराक्रम, धैर्य, जाणतेपण आणि उत्तुंग महत्त्वाकांक्षा लोकांच्या संरक्षणासाठी, कल्याणासाठी, परकी आक्रमणाला आव्हान देणारी असे शब्द आणि कल्पना यांची साकार मूर्ती त्या परिसराला भारून टाकते. बस स्टँडच्या पुढे गेल्यावर महात्मा गांधी उद्यानाचे बुद्धाची आठवण करून देणारे प्रवेशद्वार व उद्यानाच्या मधोमध महात्मा गांधींचा शांतिदूत, सत्य, अहिंसा, करुणा यांचा सुखद सुगंध पसरविणारा बुद्धकाळ व गांधीयुग यांच्या आठवणी अदृश्य फुलापानांप्रमाणे त्या बागेत जागवतात. आणखी पुढे आल्यावर चौकाच्या डाव्या बाजूला असलेला आणि ब्रिटीश सत्तेला चालते व्हा असे ठणकावून सांगत तलवारसदृश हात उगारलेला स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुतळा अंगावर शहारे आणतो. ह्याच हमरस्त्याने पुढे उजव्या बाजूस तापी व्हॅली कॉर्पोरेशनची कार्यालये व वनातील वनसंरक्षकांचा बंगला, तर डावीकडे कलेक्टर कार्यालयाचा भव्य परिसर, त्यानंतर आकाशवाणी चौक, थोडे पुढे गेल्यावर सागर पार्क मैदानाच्या सुरुवातीला प्रसिद्ध वकील श्री. उज्ज्वल निकम यांच्या नावाचा ‘बॅरिस्टर निकम चौक’ आहे. सागर मैदान, कलेक्टर निवास, पोलीस अधिकारी निवास, उजवीकडे हॉटेल पॅलेस व डावीकडे हॉटेल कॉटेजेस यामुळे शहराची सुबत्ता दिसते. मग येतो तो काव्यरत्नावली चौक. चारी बाजूस मार्बल. कॉलमवरील काव्याचा अवतार व मध्यभागी जैन उद्योग समुहाने सांभाळ केलेली हिरवीगार झुडपे, गवत व फुले यामुळे हे सुशोभित निसर्गपूजनच वाटते. डावीकडे गेल्यावर आ.टी.ओ. कार्यालय, आधुनिक पद्धतीची घरे व मग आदर्शनगरचे प्रवेशद्वार आणि डी मार्टचा गजबजलेला मॉल, शहरीकरणाचे दर्शन घडवितात. मग शिरसोली रोडवर हिंगोणेकर फालक यांचे हॉटेल, मग शास्त्रीनगर, गुंजन मंगल कार्यालय, राहुल झोपे यांचे रॉयल एंटरप्रायझेस आणि साईलीला मॅरेज हॉल, त्याजवळील मेहरूण तलावाकडे गल्लीतील जैन बंगला व त्याला लागून देवीचे देऊळ आणि मग मेहरूण तलावापुढे गेल्यावर उत्तम बंगले पुन्हा जळगावच्या श्रीमंतीची आठवण करून देतात. मग डावीकडे पुन्हा मेहरूण तलावाकडे रस्ता.

ह्याच रस्त्याने योगिनीची गाडी त्यांच्या बंगल्यापर्यंत जाते. राणेनगरातील लोक हा रस्ता व जैन बंगल्याजवळील रस्ता दोन्ही वापरतात. आभाने जवळच्या एका भागातील दृश्य मला वर्णन केले तेव्हा मी म्हणाले, आम्हांला नेहमीच्या रहिवाशांना या रस्त्याची अर्थपूर्ण व प्रेरणादायक शक्ती जाणवत नाही किंवा आम्ही ती गृहीत धरतो. बरे झाले, आभा तू मला जळगावदर्शनाची ही झलक दाखवली. उद्या आपण गायत्री नगरातील प्रगती संकुल बघायला जाऊ.

आभा म्हणाली, अगं, जीवनपथावरसुद्धा भावभावनांच्या फुलांचे सौंदर्य बघायला हवे. वास्तवातले सौंदर्य शोधण्याची दृष्टी हवी.

सायली म्हणाली, आता कळले की आभा नेहमीपेक्षाही हळू का चालत होती. अर्थात तिच्या बोलण्यातून हे वर्णन आम्हांलापण एक चांगला अनुभव देतच होते.

संध्याकाळी बागेत आम्ही सर्व जण गप्पा करीत बसलो होतो. आभा माझ्या बाबांना म्हणाली, तुमचे प्रगती संकुल आज आम्ही पाहिले. तुमच्या कार्याचे स्वरूप किती समजोपयोगी आहे. त्याची कल्पना आली. प्रगतीशील असा तुमचा नावलौकिक तुम्हाला शोभतो. सप्तशृंगी बाल आधारगृह आणि खंडोबा सहकारी बँक यांच्या कल्पना तुम्हाला कशा सुचल्या?

बाबा म्हणाले, माझे अनुभव आणि विचारमंथन यातून त्या साकारल्या. १५ वर्षांपूर्वी मी रिक्षाने जात असताना रिक्षा चालकाचा ५/६ वर्षांचा मुलगा त्याच्याजवळ उभा होता. रिक्षा चालवीत असतानाच तो मुलाशी बोलत होता, रमेश, शाळेत आज काय शिकलास?

रमेश म्हणाला, 'ए.बी.सी.डी.'चं गाणं आणि 'लंडन ब्रिज इज फॉलिंग डाऊन' हे गाणं. मग खेळ.

रिक्षा चालकाने विचारले, डबा खाल्ला का? तुझ्या आईला यायला बराच वेळ आहे. तू घरी एकटा राहणार?

रमेश म्हणाला, नाही. मी तुमच्याजवळ रिक्षातच थांबतो.

रिक्षाचालक म्हणाला, बेटा तुला दुपारची झोप मिळत नाही. त्याचं मला वाईट वाटतं.

रमेश म्हणाला, तुम्ही आणि आई फारच काळजी करता. मला आवडतं तुमच्याबरोबर रिक्षात उभं राहून तुमच्याशी बोलायला.

माझे बाबा म्हणाले, त्या प्रसंगाने माझे मन करुणेने भरून आले. त्यातून सप्तशृंगी बाल आधारगृहाची निर्मिती झाली. पुष्कळ पालक त्यांच्या मुलामुलींना ९ ते ५ या वेळेत तिथे ठेवतात. त्यांच्या संगोपनासाठी आम्ही अत्यल्प मूल्य घेतो.

फातिमा म्हणाली, शबीर आणि मी काकांच्या बाल आधार गृहात राहिलो होतो.

सायलीने विचारले, आणि खंडोबा सहकारी बँकेची कल्पना कशी सुचली?

बाबा म्हणाले, आमच्या शेतमजुराला, रामदास तायडेला, त्याच्या मुलाला शिक्षणासाठी पुण्याला पाठवायचे होते. मी त्याला कर्ज दिले. मग मी विचार केला की रामदाससारखे गरजू लोक अनेक असतील. त्यांच्या गरजा भागविण्यासाठी सुलभ कर्ज देता यावे अशी बँक हवी. मग खंडोबा सहकारी बँक सुरू केली. मोठ्या शहरात किंवा परदेशात शिक्षण घेण्यासाठी कमी व्याजाने कर्ज दिले. समुपदेशन केंद्रही सुरू केले. कर्जबुडीचे प्रमाण फार कमी आहे. योग्य वेळी मदत करण्याचे समाधान आहे.

फातिमा म्हणाली, जळगावकरांवर काकांचे फार उपकार आहेत.

बाबा म्हणाले, उपकार नव्हे. मला सेवेची संधी मिळाली असे मी समजतो.

आई हे सर्व ऐकत होती. ती म्हणाली, बाल आधार केंद्र सुरू करण्यासाठी माझे दागिने गहाण ठेवले होते. शेतीचे येणारे उत्पन्न मशागत व बी-बियाणे यासाठीच खर्च व्हायचे. ते कठीण दिवस होते.

बाबा म्हणाले, परमेश्वराने नंतर भरपूर दिले. मी समाधानी आहे. आमदार निधीतून बाल आधार केंद्राची शाखा जुन्या जळगावात सुरू

केली. शेतात काम करायला जाणाऱ्या स्त्रिया लहान बाळांना हाऱ्यात (बांबूच्या काड्यांनी विणलेली मोठी टोपली) ठेवून नेत होत्या. त्यांना सुविधा मिळाली. दिवसभर बालकांना त्या आधार केंद्रात ठेवतात.

लता म्हणाली, काकांची कामगिरी खरोखर बहुमूल्य आहे. माझ्या मैत्रिणीच्या शेतात हाऱ्यात ठेवलेले बाळ पाहिल्यावर मला गहिवरून आले होते. काकांनी माणुसकीचा गहिवर मूर्त स्वरूपात आणला.

बाबा म्हणाले, अजून पुष्पळ काम करायचे आहे. राजकीय सत्ता लोककल्याणासाठी जास्त प्रमाणात वापरता आली पाहिजे.

आई म्हणाली, चला जेवायची वेळ झाली आहे.

ताईच्या मैत्रिणी आल्यामुळे जयंतला नेहमीच्या दैनंदिन जीवनात break झाल्याचे जाणवले. तो उत्साही झाला. सुटी होती म्हणून त्याचे मित्र नातेवाईकांकडे गेल्याने तो एकटाच वाचन व बॅडमिंटन खेळण्यात वेळ घालवत होता. बाबांचे कार्यकर्ते व पुढारी येत असत. पण त्यांच्याशी बोलणे नव्हते, फक्त त्यांचे संभाषण ऐकायचे. आभा, सायली, लता आणि फातिमा मुक्कामी राहणार. यामुळे घरातले वातावरणच बदलून गेले. आईने व त्याने जेवणाच्या टेबलावर मध्यभागी फुलदाणीत फुले कलात्मक दृष्टीने ठेवली. चांदीची ताटे, चमचे, वाट्या व पेले ठेवल्यावर टेबलावर त्यांची प्रभा पसरली. आईने स्वत: स्वयंपाक केला होता. शुभ्र बाऊल्समध्ये श्रीखंड, भाजी, आमटी, कोशिंबीर, चटणी व लोणचे ठेवल्यावर अन्नपूर्णेचा प्रसाद शोभून दिसला व भूक वाढविणारा सुगंध टेबलाभोवती जणू पाहुण्यांचे स्वागत करायला सज्ज झाला. आईने व जयंतने जेवण वाढले व तेसुद्धा भोजनास बसले.

फातिमा म्हणाली, खाना तो बहुत बढिया है. चाची तुमने खुद खाना बनाया है?

सायली म्हणाली, आमच्यासाठी तर ही great feast आहे. ही फुलांची मांडणी जयंतची का?

जयंत म्हणाला, हो. आवडली का?

सायली म्हणाली, सुंदर. आज आमचा लकी दिवस. जयंत, सुट्टीत काय करतोस?

जयंत म्हणाला, बॅडमिंटन खेळतो, वाचन करतो आणि टी.व्ही. आहेच.

वरणभाताने जेवणास सुरुवात झाली. बाबा म्हणाले, वरणभातावर तूप घ्या आणि लिंबू पिळा. महाराष्ट्रीयन जेवणातला वरणभात सर्वांना आवडणारा पदार्थ.

लता म्हणाली, श्रीखंडपुरी मला फार आवडते.

आभा म्हणाली, वरणभात जणू स्वागतपर गाणे. श्रीखंड सिंहासनावर बसलेला राजा, पुऱ्या मित्रांसारख्या, फ्लॉवर-वाटाणा भाजी, मटकी आमटी, कोशिंबीर यांचा लवाजमा. या सर्वांच्या चवीच्या स्पर्धा. भिन्न रुची, भिन्न रूपे, जशी भारतातील भिन्न लोकसमुहांचे अस्तित्व आणि त्यांची अभिन्न देशबांधिलकी.

आई म्हणाली, आणि आभाचे सुंदर वर्णन.

सायली म्हणाली, यामुळेच तिचे वजन वाढले आहे. आभा, तू आता पदव्युत्तर केटरिंग कोर्सला जा.

आभा म्हणाली, नाही. मी बी.एड. करणार. Food for thought वाटणार.

बाबा म्हणाले, आभा, आमच्या संकुलात आम्ही वसंत व्याख्यानमाला आयोजित करतो. रविवार ते रविवार आठ दिवस नामवंत विद्वानांची भाषणे व प्रश्नोत्तरांनी तू म्हणतेस तसं भरपूर Food for thought दिले जाते.

लता म्हणाली, काका, आम्ही वसंत व्याख्यानमालेच्या वेळी तुम्हाला सर्व व्यवस्था करून देऊ.

योगिनी म्हणाली, आज घर भरल्यासारखे वाटते. रूचकर जेवणाला सुंदर संभाषणांची साथ आहे.

फातिमा म्हणाली, शबीर की कमी रह गयी. उसके बिना कोरम पुरा नही होता.

योगिनी म्हणाली, मी त्याला आमंत्रण दिले होते. पण तो आज मुंबईला जाणार आहे.

आभाने बाबांना विचारले, काका, नवीन कोणता उपक्रम घेणार आहात?

बाबा म्हणाले, काही गावांमध्ये संस्कारकेंद्र सुरू करायची योजना विचाराधीन आहे. दुसरा एक उपक्रम घ्यायची तयारी केली आहे. जळगाव ते शिरसोली रस्त्यावर दुतर्फा वृक्षारोपण करायचे आहे.

जेवण झाल्यावर बाबा त्यांच्या खोलीत गेले. आम्ही गच्चीवर अंथरूणं टाकली.

अशा प्रकारे ती संध्याकाळ बाबांच्या कार्याचा आढावा आणि आपुलकीचा एक सोहळा होती.

* * *

# १०

२४ मार्च २०१७.

फातिमा रात्री योगिनीकडेच राहिली. आभा, लता, फातिमा आणि योगिनी बंगल्यावरील गच्चीवर झोपायला गेल्या. चौघींच्या मैत्रीबंधनातून जणू चांदणे झिरपत होते. त्यातच नवमीचा चंद्र आपल्या प्रकाशाने मनात स्नेहलाटा निर्माण करायला लागला. निळे आकाश, चांदण्यांची सोबत, दिवसभराच्या उष्णतेनंतर शरीरमनाला सुखावणारा शीतल वारा हे सर्व निसर्गप्रेमाचे दृश्य त्या मैत्रिणींच्या गप्पांना कळ्यांची फुले झाल्याप्रमाणे रंगमंचावरील नेपथ्य भासत होते.

फातिमा म्हणाली, यार, क्या समा है। मै तो आज खुशीसे पागल हो जाऊंगी। खुदा का शुकर है ऐसी घडी मेरे जीवन मे आयी। ये सब योगिनी की वजहसे। अमर रहे हमारी दोस्ती, अमर रहे।

मी म्हणाले, अग फातिमा, तुम्ही चौघींनी आज माझ्या आनंदात भर घातली. तुमचे आभार.

आभा म्हणाली, अचानक, अनपेक्षित अशी आपली मैत्री मला तर मनाची मेजवानीच वाटते.

सायली म्हणाली, हिला खाण्याची भारी हौस. मैत्रीत हिला मेजवानीच दिसते. किती स्वादिष्ट भोजन होते तरी ही तृप्त होत नाही हे दिसते.

आभा म्हणाली, सायली, तू सांग योगिनीच्या बंगल्याच्या गच्चीवर आपण पाच जणी आणि हे प्रसन्न वातावरण. ह्या घटनेला तू काय म्हणशील?

सायली म्हणाली, मैत्रीचा पूर असे म्हणू या का? तापीला पूर आल्यावर सगळा कचरा वाहून जातो. आपल्या जीवनातील हा मैत्रीचा पूर का गं? पण मग कोणता कचरा वाहून जातो म्हणायचे?

लता म्हणाली, अर्थात दुःखाचा. योगिनीच्या दुःखाचा.

फातिमा म्हणाली, अशा मैत्रीचा अभाव म्हणजे नदीचे रिकामे पात्र पूर आल्यावर कसे भरून जाते! Friendship fills the emptiness in our life.

मी म्हणाले, You mean loneliness?

फातिमा म्हणाली, It's the same... But isn't it true Yogini?

मी म्हणाले होय. आणि सुरक्षित वाटतं. मला तर जीवनातली असुरक्षितता भेडसावते. It's traumatic.

आभा म्हणाली, हे धोक्याचे बरं का? श्रीमंती, प्रतिष्ठा, घराण्याचा लौकिक, बुद्धीची देणगी, प्रेमळ आईबाप व भाऊ. आणि तरी तुला असुरक्षितच वाटतं?

फातिमा म्हणाली एखादा माणूस, एखादा प्रसंग भयावह असतात. पण Exception proves the rule. चांगले लोक, चांगले प्रसंग नेहमीच आपण अनुभवतो. देखो, हम सब और हमारा मिलना Blessing, count you blessings.

सायली म्हणाली, तरीपण योगिनीने आपल्याला सांगायला हवे तिला कसला आघात झाला आहे?

ही एक मनोविश्लेषणात्मक बाब आहे.

लता म्हणाली, नक्कीच. तू फक्त आम्हांला ह्या तुझ्या असुरक्षिततेचे उगमस्थान सांग. त्याची वाढ कशी झाली ते सांग. तुला मनोवैज्ञानिकाकडे न नेता, मी त्यांचा सल्ला घेईन. ते तुला नंतर बोलावतील तेव्हा आपण त्यांना भेटू.

फातिमा योगिनीचे मुखकमल दोन्ही हातांच्या ओंजळीत घेऊन म्हणाली, आधा है चंद्रमा रात आधी

रहे न जाए तेरी मेरी बात आधी, मुलाकात आधी।

मी म्हणाले, Thanks for the concern. You are sharp. का कुणास ठाऊक मी आत्तापर्यंत मनात कोंडून ठेवले होते ते तुम्हांला सांगावेसे वाटते.

फातिमा म्हणाली अगं मग लवकर सांग. This is communication therapy. It can lead to good results. इंशा अल्ला. तुम्हे ऐसा फील होता है यही तो मैत्रीकी सफलता है।

मी म्हणाले, मी ६ वर्षांची होते. माझ्या व जयंतच्या योग्य गुणवत्तेच्या शिक्षणासाठी व शहरी वातावरणाचा आमच्या व्यक्तिमत्त्वाला फायदा व्हावा म्हणून माझ्या वडिलांनी हिंगोण्याची जमीन व घर विकले आणि जळगावला भाड्याने घर घेतले. शिरसोलीला ५० एकर जमीन घेतली. शेती करण्यासाठी सर्व म्हणजे विहीर खोदणे, पंप बसवणे वगैरे तयारी केली. मग आम्ही हिंगोणे सोडून ट्रकभर सामान घेऊन जळगावला भाड्याच्या घरात आलो. पोहोचलो तेव्हा संध्याकाळचे सात वाजले होते. आईने आणलेल्या भाकऱ्या व चटणी वाढली. आणि बाबा एकाएकी ढसाढसा रडायला लागले. रडायचे थांबत नव्हते, त्यांना रडताना बघून मला धक्का बसला. आई व मीपण रडायला लागलो. छोटा ३ वर्षांचा जयंतपण आम्हांला बघून रडला. आधी आईने धीर दिला. बाबा रडायचे थांबले व म्हणाले, सॉरी. हिंगोण्याचे घर सोडले. जमीन विकली. वाडवडिलांशी असलेली नाड तुटल्यासारखे वाटले. इथे नवीन ठिकाणी

आल्यावर एकाकी वाटते. अजून इथे मी जोडला गेलो नाही. जळगावला २ वर्षे राहिलो आहे. पण लहानपणी निर्माण झालेले बंध, आईवडील, भाऊ, बहिणी, शाळा, मित्र, शेतमळे यांच्या सहवासाचे धागे किती बलवान असतात, ते मला आता कळले. नव्हे मनात खोलवर साचलेले दुःख आता अश्रुरूपाने बाहेर पडले. मी धीर सोडला नाही. सर्व ठीक होईल. चला जेवून घेऊ.

इतक्या वर्षांनंतर तो प्रसंग म्हणजे आयुष्य किती असुरक्षित आहे याचे द्योतक बनून अर्धवट विझवलेल्या विस्तवासारखा मला चटके देतो.

आभा म्हणाली, नंतर तर सर्व भरभराट झाली असे फातिमा म्हणाली.

मी म्हणाले, मी तुम्हाला माझ्या मनाला हादरे देणाऱ्या घटना सांगते. बारावीत असताना इतिहासाच्या पुस्तकात मी फारुकी राजवटीबद्दल (१३८२ ते १३९९) वाचले. त्या घराण्यातील नसीर खानाने अहीर अधिपती आसा अहीर याच्याकडून असीरगड कपटनीतीने हस्तगत केला. तो प्रसंग एकांकिकेद्वारे रंगमंचावर कॉलेजच्या मुलामुलींना दाखवावा असे मी प्रा. देशपांडे यांना सुचविले. त्यांनी होकार दिला व मलाच नसीरखानाच्या बेगमची भूमिका करायला त्यांनी सांगितले. आसा गवळी राजा उदार होता. त्याची राणीपण उदार होती. दुष्काळ पीडितांना काम मिळावे म्हणून राणीने सुचविले; त्याप्रमाणे आसाने शहराच्या जुन्या भिंती पाडून टाकल्या आणि शहराभोवती मजबूत दगडी भिंती बांधून एका किल्ल्याची उभारणी केली. या दगडी कामाला आसाअहीर असे नाव पडले. पुढे त्याचा अपभ्रंश होऊन असीर असे नाव पडले. आसाने नसीरखानला खूप मदत केली. आसा शांतताप्रिय गवळी राजा होता. त्याच्यावर स्वारी करण्यासाठी नसीर खानला निमित्त मिळत नव्हते. शेवटी त्याच्या (नसीरच्या) जनानखान्याला धोका आहे म्हणून तुझ्या किल्ल्यात त्यांना आश्रय द्यावा अशी विनंती त्याने केली व आसाने ती मान्य करून असीरगडवर नसीरखानच्या जनानखान्यासाठी चोख

व्यवस्था केली. पहिल्या दिवशी स्त्रियांनी भरलेल्या पुष्कळ डोल्या गडावर आल्या. दुसऱ्या दिवशी खबर आली की, नसीरची पत्नी, आई आणि इतर जनाना घेऊन २०० डोल्या येत आहेत. त्यांचे स्वागत करण्यासाठी आसाने गडाचे दरवाजे उघडून त्यांना भेटण्यासाठी आपल्या सर्व मुलांसह तो सामोरा गेला. पण या डोल्यांमध्ये स्त्रियांऐवजी सशस्त्र शिपाई भरलेले पाहिल्याबरोबर त्याच्या दुःखाला पारावर उरला नाही. या शिपायांनी डोल्यांमधून पटापट उड्या मारल्या आणि आसाला त्याच्या सर्व कुटुंबीयांसह ठार मारले. आपला बेत सिद्धीस गेल्याचे कळताच नसीर लळिंग गडाहून असीरगडावर आला.

या घटनेचे नाट्यमय कथन नसीरच्या खबऱ्याने द्यायच्या आधी व त्या बातम्या देत असताना मी नसीरची पत्नी म्हणून रंगमंचावर त्याच्याशी वाद घालीत होते. तो लळिंग गडावरून असीरगडासाठी निघाला. मी त्याच्याबरोबर जायला नकार दिला. आणि त्याच क्षणी मला भोवळ येऊन मी पडले. मला भोवळ येण्याचा व पडण्याचा प्रसंग एकांकिकेत नव्हता. पण त्यामुळे प्रेक्षकांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. माझ्यासाठी ते नाटक नव्हते तर कपटाने सात्त्विक राजाचा व त्याच्या घराण्यातील सर्वांची कत्तल झाल्यामुळे माझे हृदय पिळवटून काढणारा तो प्रसंग होता. तो पीळ अजून जात नाही.

आभाने माझ्या पाठीवर आपुलकीने हात फिरवीत म्हटले, अगं, इतिहासात अशा घटनांची मालिकाच आहे. तू रंगमंचावर अभिनय करताना स्वतःच त्यातील क्रौर्य जिव्हारी लावून घेतले.

सायली म्हणाली, अभिनय आणि खरोखरचे दुःख यात गल्लत केलीस.

मी म्हणाले, ते कळलं मला, पण वळत नाही.

नंतर त्याच वर्षी मी इतिहासातील मोगल व मराठे यांच्या काळात खान्देशातील धनसंपत्ती लुटण्यासाठी झालेल्या लढायांबद्दल वाचले. राजकीय संघर्षामुळे खान्देश प्रदेश फारच उद्ध्वस्त झाला. त्या विध्वंसाचे वर्णन वाचून माझे मानसिक स्वास्थ्य बिघडले.

लता म्हणाली, पुष्कळ चांगल्या घटनांची इतिहासात नोंद आहे. शिवाजी महाराजांच्या मराठी स्वराज्य स्थापनेचा आपल्याला अभिमान आहे.

मी म्हटले, हो. त्यांच्यासारखे महापुरुष वंदनीयच आहेत. त्यांच्या महान कार्यामुळे मला धीर येतो. पण सामान्य माणसेसुद्धा धोका देतात आणि माझ्या जीवनातील त्या कटू अनुभवांमुळे कशात स्वारस्य वाटत नाही.

फातिमा म्हणाली, काकांचे कर्तृत्व त्यांना राजकारणात अधिक यश आणील. ये तो शुरुआत है।

मी शेवटी त्या माझ्या मनावरील आघाताचा संदर्भ दिला, ज्याच्यावर मी विश्वास ठेवला, प्रेम केले त्यानेच विश्वासघात केला, प्रेमाचे नाटक केले. इतिहास व सामान्य जीवन ह्या दोन रुळावरून दुःखाची, क्रौर्याची रेल्वेगाडी चालूच राहणार का? अलीकडेच मी प्राचार्य अ. द. ओक यांचे जनसंहारावरील पुस्तक वाचले. गेल्या शेकडो वर्षांत झालेल्या जनसंहाराची मीमांसा त्यात आहे. माझ्या स्वप्नात मी रक्ताचे पाट वाहताना पाहिले. हिटलरची सैतानी कृत्ये पाहिली. मला depression येते की काय असे वाटत होते. एवढ्या प्रचंड प्रमाणात जनसंहार व तोही वर्णद्वेष, वंशद्वेष, सत्ता मिळविणे यासाठी.

फातिमा तुझे नमाजाचे पुण्य असूनही असे का होते?

फातिमा सांत्वनपर म्हणाली, अल्लाताला और परमेश्वर का ये गुपित है। हिंसा क्यों? वजह मालुम है, लेकिन उस वजहकी वजह मालूम नही।

माझी आई गच्चीवर आली व आम्हाला म्हणाली, आता झोपा, अजून दोनतीन दिवस इथेच मुक्काम आहे. गप्पांना भरपूर वेळ मिळेल.

मी म्हणाले, हो गं आई

आभा म्हणाली, सावर बाई स्वतःला.

मी म्हणाले, तो प्रयत्न चालू आहे. शतकानुशतके झालेला हिंसाचार निराशाजनक आहे. पण माझ्या वडिलांच्या उज्ज्वल भविष्याचे व त्याचा उपयोग हालअपेष्टा, विध्वंस कमी होण्याचे स्वप्न मी पाहते. त्यामुळे मला उभारी येते. शक्ती येते.

* * *

# ११

बाबांच्या खंडोबा सहकारी बँकेला जिल्ह्यातील सहकारी बँकांमध्ये उत्कृष्ट बँक म्हणून पारितोषिक मिळाले. मग दुसऱ्या दिवशी (२५ मार्च २०१७) सकाळी ९ वाजता शामराव पाटील, त्यांचा मुलगा केतन आणि दोन सहकारी यांच्या बरोबर बाबांचे अभिनंदन करायला आले. केतनने फुलांचा हार त्याच्या वडिलांकडे दिला. शामराव पाटीलने नथूभाऊला हार घातला. नमस्कार केला व ते म्हणाले, अभिनंदन. चांगली बाजी मारली. तुमची अशीच प्रगती होईल. अहो, पैसा आहे, कार्यकर्ते आहेत. मग विजय होणारच.

केतनने बाबांना गुच्छ दिला व खाली पाहत अभिनंदन असे म्हटले.

बाबा म्हणाले, बसा, चहा नाश्ता घ्या.

शामराव म्हणाले, आत्ताच नाश्ता झाला. नंतर येणे होईलच. आता निघतो. आमचं काही चुकलं असलं तर माफ करा. बरं निघतो.

असे म्हणून ते परत जायला निघाले. बाबा त्यांना निरोप द्यायला त्यांच्या मागे गेले. केतनने चौफेर नजर फिरवली. माझ्या मैत्रिणींकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकला व जाताना माझ्याजवळ येऊन म्हणाला, तुझ्या बाबांनी आमदार राहिलेलं बेस्ट. खासदार होण्याची स्वप्ने पाहू नका. रामराम.

तापलेले तेल कानात टाकल्याप्रमाणे केतन पाटीलचे शब्द माझ्या अंगाची लाही लाही करीत होते. अंगाचा तीळपापड होत होता.

तुझ्या बाबांनी आमदार राहिलेलेच बेस्ट. खासदार होण्याची स्वप्ने पाहू नका'' हे त्याचे शब्द 'राम राम' म्हणून घमेंडीचा दुर्गंध सोडीत त्याचे तडकाफडकी निघून जाणे म्हणजे मला आव्हान देण्यासारखे होते. मी म्हटले, तुम्ही सगळ्या जणी आईला स्वयंपाकाला मदत करा. मी माझ्या खोलीत आहे.

फातिमा म्हणाली, मी आता घरी जाते. अम्मी वाट बघत असेल. रात्री झोपायला येईन.

मी माझ्या खोलीचा दरवाजा बंद करून खुर्चीत बसले, म्हणजे कोलमडलेच. काळ्या ढगांनी राक्षसी आविर्भावाने सूर्याला झाकून टाकावे तसे माझ्या मनाचे झाले. माझ्या बाबांच्या कर्तृत्वाच्या, समाजसेवेच्या, प्रामाणिकपणाने लोकसंग्रह करण्याच्या प्रकाशाला शामराव पाटीलच्या 'पैसा आहे' असे कुत्सित बोलण्यामुळे व त्याच्या मुलाच्या धमकीच्या बेसूरामुळे माझ्या स्वप्नांना जबरदस्त धक्का बसला. मी विचारमग्न अवस्थेत 'सारे जहांसे अच्छा' या माझ्या देशाच्या आणि शेकडो वर्षांच्या गुलामगिरीनंतर लोकशाहीच्या वरदानाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण काय करू शकतो ते मनात घोळत होते. त्याच भारताच्या आमच्या ह्या मतदार संघात रचनात्मक कार्यकर्त्याची माझ्या वडिलांनी भूमिका पार पाडली होती व त्यांचे कार्य उत्तरोत्तर वृद्धिंगत होताना पाहण्याची माझी आशा पल्लवीत होत असताना त्या आशेच्या वेलीला कीड लागेल अशा भीतीने मी घाबरून गेले होते.

गुरुदेवांच्या उपदेशाची आठवण झाली. मी ध्यानस्थ बसले. हळूहळू विचार व भावना यांचे वादळ ध्यानाने शांत झाले. शरीर, मन, बुद्धी यांना शक्तिदात्या आत्म्याचे चिंतन केल्याने Meditation is the art of loving your soul हे पटते आणि हेच आश्रमातील एक ब्रीदवाक्य सहजपणे आठवले.

त्या दिवशी रात्री गच्चीवर आभा, सायली, लता, फातिमा व मी अंधारात चांदण्यांनी नटलेल्या आकाशात शीतल तेज

पसरविणाऱ्या तारांगणाची शोभा पाहत थोडा वेळ मंत्रमुग्ध झाल्यासारख्या स्तब्ध होतो.

मग मी म्हणाले, सूर्याने तप्त झालेल्या पृथ्वीचा निःश्वास असलेला हा वारा आता अनेक सुवासांचे मिश्रण आणून सुखावतो आहे. आपण मैत्रिणी एकत्र आल्याने आपल्या अंतर्मनात मैत्रीचा सुगंध अनुभवीत आहोत.

फातिमाला तिच्या शैलीत बोलल्यावाचून राहवले नाही. ती म्हणाली, ये मौसम, ये हवा, ये मेहरूणतलाव का किनारा, ये चंचल हवा।

आभा म्हणाली, मला माझ्या अजनाड गावच्या देखाव्याची आठवण झाली. तापी नदी जळगाव जिल्ह्यात प्रवेश करतानाचा तो देखावा विलोभनीय आहे. किनाऱ्यावर वनश्री, तापीचा रुंद, स्वच्छ प्रवाह, सकाळ-संध्याकाळ तिथे फिरायला जाणे म्हणजे आनंदात न्हात होतो.

सायली म्हणाली, आणि माझे पिलोदगाव, जळगाव जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर जिथे तापी धुळे जिल्ह्यात प्रवेश करते ते. तिथेच अनेर नदी तापीस मिळते. तो संगम अद्भुत सौंदर्याने भरलेला आहे.

लता म्हणाली, माझे भुसावळ शहर मध्ये आहे. काय योगायोग पहा. आभा जळगाव जिल्ह्याच्या पूर्व सीमेवरील गावची, सायली जळगाव जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवरची आणि मी मधल्या भागातली.

फातिमा म्हणाली योगिनीचं व माझं जळगाव शहरच.

मी म्हणाले, नाही हं, माझं मूळ गाव हिंगोणे बर कां.

फातिमा म्हणाली, ठीक. तू हिंगोणेकर. मी जळगावकर. पण आपली एकमेकींची ओळख एवढीच कशी? अपनी फॅमिलीज के बारे मे तो कुछ कहो। इरादे क्या है? सपने क्या है?

आभा म्हणाली, खरंच की, आपण भूगोलातच स्वतःला शोधतो आहोत. आपला परिचय वैयक्तिक जीवनाचे उभे आडवे धागे, त्यांची वीण, पोत यांच्यामुळेही व्हायला हवा. ठीक, मी सुरुवात करते. माझी

आई मालती धोंगडे. अजनाडला राहते. तिची फारकत झाल्याने ती मामा प्रकाश देशपांडे यांच्याकडे राहते. फारकत का झाली ते मात्र मला विचारू नको. स्वतःपुरती कमाई तिला मिळालेल्या शेतीतून होते.

मी विचारले, मग तू इथे आश्रमाच्या कॉलेजमध्ये कशी?

आभाने उत्तर दिले, पेपरमध्ये कॉलेजची जाहिरात वाचली. आईने अधिक माहिती मिळवली. गुरुकुलाचे तिला आकर्षण. १२वी नंतर आले तिथे.

सायली म्हणाली, पिलोद गावी १०वी पर्यंतच शाळा आहे. आश्रम शाळेतले एक शिक्षक पिलोदचे. त्यांनी माझ्या आईला-शालिनीला तिथे पाठविण्यास सांगितले. माझे वडील लीलाधर साळुंके कुष्ठरोगी. आता बरे झालेत. पण अजून बाबा आमट्यांच्या आनंदवन वस्तीतच राहतात. आई शेतमजूर. कारण आमची दोन एकर कोरडवाहू जमीन. पुरेसे उत्पन्न नाही. माझी इच्छा आहे शिक्षिकेची किंवा क्लार्कची नोकरी मिळावी व आईने मजुरी करणे थांबवावे.

लता म्हणाली, माझे आई-वडील भुसावळला असतात. आईचं नाव मीरा आणि वडिलांचं नाव गोविंद कोष्टी. वडील हायस्कूल टीचर आहेत. भुसावळला कॉलेज आहे. तरी बाबांना ह्या गुरुकुलाचे महत्त्व फार. म्हणून मी तिथे. मला एम.बी.ए. व्हायचे आहे.

फातिमा म्हणाली, मेरा तो इरादा आपको शॉकिंग लगेगा। मुझे हिंदू लडकेसे शादी करनी है। हमारे मे मर्द दुसरी, तिसरी शादी कर सकता है। ये मुझे पसंद नही। वो करेगाच ये बात नही। फिर भी मुझे नही पसंद।

मै तो पंतप्रधान मोदीजी की फॅन हूँ। क्योंकी उन्होने तीन तलाक विरुद्ध कानून करके मुसलमान स्त्रियोंपरका जुल्म हटाया है।

मी म्हणाले, चौथी शादी भी मर्दकी हो सकती है। फातिमा तू तो हिंदूही लगती है। मराठी अच्छी बोलती है। साडी पेहनती है।

फातिमा म्हणाली, वो तो ठीक है। लेकिन नसीबमे क्या है देखेंगे। मै तुम्हे ये जिम्मेदारी देती हूँ।

लता म्हणाली, ओ आज आया था। केतन कैसा है? पसंद है?

फातिमा म्हणाली, साला हॅन्डसम है, लेकिन दिल से खराब है।

आभा म्हणाली, तूने कब उसका दिल देखा? त्याने मला ओळखदेखील दाखवली नाही.

फातिमा म्हणाली, हंसी मजेकी बात छोड। अरे यार, जो योगिनी का दुश्मन, वो मेरा दुश्मन।

मी म्हणाले, ठीक है। मै तेरे लिये अच्छा लडका ढूंढूगी। लेकिन अच्छी पढाई कर। खाली छोकरी खुबसुरत नही चाहिये। उसने नोकरी भी करनी चाहिये। हिंदू मिडल क्लास मे ये सब है। और हिंदू-मुस्लीम अॅरेंज मॅरेज नही होगा। लव्ह मॅरेज होना चाहिए। मै तो तुम्हारी तरफसे प्यार नही कर सकती। तुमको ही करना पडेगा।

फातिमा म्हणाली, हसो। मेरे इरादे पे तुम हसती हो, लेकिन मेरी योगिनी किसी हिंदू लडकेको मेरे जाल में फसा देगी।

मी म्हणाले, जाळं सुंदर, मन सुंदर. फीश नक्कीच अडकणार.

सायली म्हणाली, तुम्ही एकमेकींला मदत करा. फातिमा योगिनीसाठी मुलगा शोधेल आणि योगिनी फातिमासाठी.

फातिमा म्हणाली, योगिनी की तो बातही अलग है। कोईभी लडका योगिनीको बोलेगा

''तन भी सुंदर, मन भी सुंदर<br>
तू सुंदरता की मुरत हो<br>
मुझे दोष न देना जगवालो<br>
हो जाऊँ अगर मै दीवाना''

असे म्हणून फातिमाने माझा मुका घेतला.

सगळ्या जणी मनसोक्त हसल्या.

मी सुचवले, आता मला एक सुचवावेसे वाटते

आभा, सायली व लता तुम्ही तिघीजणी जळगावलाच राहायला या. इथेच नोकरी बघा. माझे बाबा तुम्हांला मदत करतील. मला व फातिमाला तीन मैत्रिणी मिळतील. काय मजा येईल.

आभा म्हणाली, Good idea.

सायली म्हणाली, मलापण ही सूचना एकदम पसंत.

लता म्हणाली, भुसावळ काय, आणि जळगाव काय, मला चालेल इथेपण.

फातिमा म्हणाली, फिर हम पांच। महाभारत मे पांच पांडव है। उनकी भूमिका सत्य और न्याय की है। हम भी तो यह भूमिका निभाऐंगे

मी विचारले, आणि कौरव कोण गं?

फातिमा म्हणाली, वो केतन और उसके साथी।

आम्हां सगळ्यांची करमणूक झाली. माझे मनोबल परत मिळणार असे वाटले. इच्छादेवीची मी मनोमन प्रार्थना केली, ‘‘देवी माते, आमच्या हलक्याफुलक्या शब्दांच्या सेतूने संकटांच्या सागरावरून पापी रावणवृत्तीचा नाश करण्यास आम्हाला आशीर्वाद दे!

* * *

# १२

सकाळी फातिमा तिच्या घरी जायला निघाली तेव्हा बागेत तिला निरोप देण्यासाठी चौघी आल्या. तेव्हा आई म्हणाली, फातिमा, इथेच राहा. तुम्हां मैत्रिणींचे मनोमीलन बघून मला खात्री आहे योगिनीची मनःस्थिती सुधारली आहे. या तिघींचीपण परीक्षा संपली आहे. त्यांनापण घरी कळवता येईल. घर कसे भरलेले वाटते.

बाबा बाहेर निघाले होते. आई त्यांना म्हणाली, अहो, मी यांना म्हटले, सर्व जणी इथेच राहा ४-६ दिवस.

बाबा म्हणाले, का नाही? त्यांनी इथेच राहायचे.

फातिमा योगिनीला म्हणाली, तू तुझी Love story सांगायचं मला कबूल केलं होतं. आता आपण सर्वजणी आहोत. आज रात्री सांगायची. तरच आम्ही इथे राहू.

सायली म्हणाली, आपल्या गप्पांमधून आयुष्याची वीण स्पष्ट दिसते. मजा येते. दुःखाला लांब ठेवून त्याच्याकडे पाहून हसायचे. ए आभा, ते प्रसिद्ध वचन कुणाचं गं... Our sweetest songs are those that tell us of our saddest thoughts.

आभा म्हणाली, कवी शेलीचं.

सगळ्यांचे एकमत झाले. २५ मार्चच्या रात्री गच्चीवर योगिनी म्हणाली, जळगावच्या आदर्श नगरमधील १५-०७-२०१६ या दिवशी स्वतंत्र पार्टीच्या कार्यालयात मी गेले होते. केतन पाटील त्याच्या सहकाऱ्यांसोबत बसला होता. निमगोरा, सरळ नाकाचा, चंचल नजर असलेला. टी शर्ट व पॅन्ट घातलेला केतन मला पाहून उभा राहिला व म्हणाला, Welcome, welcome. बसा. आपण आलात त्याचा आनंद झाला. व्हीकी, चहा आण रे.

मी म्हटले, नको. चहा वगैरे काही नको. प्लीज नो. माझे काम तेवढे करा.

केतन म्हणाला, सांगा, तुमचे काम ना झालेच म्हणून समजा, बोला.

मी म्हणाले, स्वतंत्र पार्टीबद्दल आमच्या जॅसमीन बंगल्याच्या भिंतीवर जे काही लिहिले आहे ते पुसायला सांगा.

केतन म्हणाला, म्हणजे तुम्ही जनता पार्टीच्या वतीने आलात. ठीक आहे. काम होईल. काळजी नको.

मी म्हणाले, थँक्स. मी निघते. या बाजूला आले होते. म्हटलं स्वतःच तक्रार नोंदवावी.

केतन म्हणाला, अहो, आपण एका कॉलेजमध्ये. तुमचे काम म्हणजे माझे काम. चिंता नको.

त्या भेटीनंतर केतन कॉलेजात मला भेटायला उत्सुक असायचा. त्याची अस्थिर नजर मला आवडत नव्हती पण बोलण्याच्या गोडीने मी त्याच्याकडे आकर्षिले गेले. त्याचं व्यक्तिमत्त्व छानच आहे. खरं म्हणजे त्या दिवशी स्वतंत्र पार्टीच्या कार्यालयात तो असेल असे मला

अपेक्षित नव्हते. त्याचे वडील शामराव पाटील किंवा कुणीतरी नोकर असतील, असे मला वाटले होते.

मला ती माहिती कळायला उशीरच झाला. तोपर्यंत केतन व मी मित्र झालो होतो. तो अनोळखी तरुण म्हणाला, तुमच्यासारख्या साध्या स्वभावाच्या मुलीला धोका आहे असे मला सुचवायचे आहे. केवड्याच्या झुडपाला सापाचा विळखा. तुम्ही सावध राहा. माझे नाव कुणाला सांगू नका. मी पोलिसांचा खबऱ्या नाही. पैसे मिळवण्यासाठी मी हे काम करीत नाही.

मी म्हणाले, तुमचे नावच मला माहीत नाही आणि मी ते विचारत नाही. तुम्ही बिनधास्त राहा. थँक्स. आणि हे ५०० रुपये तुमच्या सहकार्याबद्दल. नाही म्हणू नका.

शामराव पाटलांची जळगावच्या मुख्य भाजी मार्केटमध्ये दोन अडत्याची दुकाने होती. धंद्यात भरभराट होती. केतन शेतकऱ्यांकडून भाज्या घाऊक पद्धतीने वाजवी दरात आणायचा. इतर अडते शेतकऱ्यांना फसवायचे, पण त्या बाबतीत केतन शेतकऱ्यांना न्याय द्यायचा. त्यामुळे तो त्यांना आवडायचा. त्यामुळे कॉलेजमध्ये त्याची हजेरी बेताचीच.

त्याचे वडील शामराव पाटील स्वतंत्र पार्टीच्या खासदारांचे विश्वासू सहकारी. खासदारांचे निवडणुकीचे काम करणाऱ्या तरुण मुलांबरोबर मैत्री झाल्यामुळे केतनला वाईट सवयी लागल्या होत्या. ड्रग्ज वितरण करून गुप्तपणे पैसे मिळविण्यात तो पटाईत झाला होता. ड्रग्जच्या नशेचीही कुसंगतीने त्याला सवय लागली. सत्ताधाऱ्यांचे संरक्षण, पैशांची घमेंड व सांगकामे मित्र यामुळे केतनचा आत्मविश्वास खूपच वाढला होता.

केतनबद्दलची ही माहिती देणाऱ्या खबऱ्याने उशीर केला. त्या आधी तो दुर्दैवी प्रसंग घडला. मी एकटीच शिरसोली रस्त्यावर जात असताना तो मागून मोटर बाईकवर आला. त्याने ‘चल, राइड देतो, लगेचच परत येऊ’’ असे म्हटले. मीसुद्धा होकार दिला. आमच्या

मळ्यात, केळीच्या बागेजवळ त्याने मोटरबाईक थांबवली व मला बागेत बसून गप्पा मारू असे म्हटले. माझ्या साध्याभोळ्या स्वभावामुळे मी त्याच्यावर विश्वास ठेवला व त्याने तो अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मी त्वेषाने त्याला लोटले, हलकट, फसवा, वगैरे शिव्या दिल्या. तेव्हा तो एकटाच मोटरबाईकवर बसून परत गेला.

त्या दिवशी मी रस्त्यावर उभी असताना शिरसोलीहून मोटरबाईकवर शबीर येताना दिसला. मी त्याला लिफ्ट देण्याची विनंती केली व त्याने मला घरी पोचविले. मी माझी अब्रू वाचवली होती त्यामुळे मला एक वेगळेच समाधान होते. त्याचबरोबर माझ्यात पुरुषी वासनेला प्रतिकार करण्यासाठी प्रचंड शक्तीची निर्मिती झाली त्याचा शोध लागला. असेच म्हणायला हवे.

केतनने केलेले ते विनयभंगाचे कृत्य मी गुप्तच ठेवले आहे. फक्त प्रेमभंग हाच शब्द माझ्या आजाराचे कारण असे माझ्या आईवडिलांना माहीत आहे. इतरांनी म्हणजे कॉलेजमध्ये त्याचा अंदाज केला.

स्वतंत्र पार्टीच्या कार्यालयातील तिघेजण बाबू चौधरी, भिवा गुजर आणि लहू मराठे केतन म्हणेल त्याप्रमाणे वागतात. बाबू कापडाच्या दुकानात विक्रेता आहे. घरची गरिबी. बायकोचा छळ, मुलगा व मुलगी यांची आबाळ. हे चित्र त्याच्या संसाराचे आहे. भिवा पहिलवान आहे. लग्न झालेले नाही. खाणेपिणे, करमणूक करणे, खासदारांचे दम देण्याचे, मारण्याचे, तोडफोड करण्याचे त्याचे काम. वडील काशीदास भगत रेल्वेत नोकर व आई टी.बी.ने आजारी. खासदारांचे पैसे उपयोगात येतात.

लहू श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा. त्याला राजकारणात यायची इच्छा म्हणून खासदारांच्या कामात तत्पर. शिवाय निधी जमा करण्यासाठी व्यापारी वर्गाशी संबंध, म्हणून खासदार सुभाष लोमटे त्याला जवळ करतात.

मला केतनबद्दल माहिती देणारा खबऱ्या सर्व ठिकाणी जळगावात संचार करणारा. पुढारी, व्यापारी, शाळा, कॉलेजेस, जुने जळगाव, नवे

जळगाव येथील माहिती व त्या माहितीद्वारे दुरितांचे तिमिर जावो अशा वृत्तीचा शुभ घटनांना चालना देणारा खबऱ्या. त्याचे नावही शुभम. माहितीच्या दलदलीत कमळ फुलवण्याचा त्याचा छंद होता.

* * *

# १३

जळगावातील जिल्हा रोडवरील काव्य रत्नावली चौक शहरवासीयांना, विशेषतः निवृत्त लोकांसाठी निवांत बसून गप्पा करण्याचे ठिकाण आहे. विस्तृत वर्तुळाकार जागेभोवती तीन थरांची बसायची व्यवस्था, मध्ये कारंजे व कडेला शुभ्र मार्बलच्या फलकावरील उदात्त विचारांच्या रसभरित काव्याच्या पंक्ती या चौकाचे काव्यरत्नावली हे नाव सार्थ तसेच संस्कारक्षम बनविते. इथे छोटे कार्यक्रमही होतात. साहित्यिकांची स्मृती ताजी करणारे हे कार्यक्रम ह्या चौकातील एक आकर्षण झाले आहे. उद्योगपती भवरलाल जैन यांच्या औदार्यामुळे फुलझाडे, प्रकाशव्यवस्था, हिरवळ काव्यरत्नावली चौकाला निसर्गसौंदर्यस्थळ करण्यासही शक्य झाले आहे.

एके दिवशी संध्याकाळी ह्या चौकात जनमानसाचा कानोसा घेण्यासाठी माझे वडील आपल्या सहकाऱ्यांसोबत आले. तेथे बसलेले लोक त्यांच्या भोवती जमले. माझ्या वडिलांनी त्यांना विचारले, आपल्या काही अडचणी, समस्या जाणून घ्यायची इच्छा आहे.

नारायण गाजरे म्हणाले, आमच्याशी इथे आमदार साहेबांनी येऊन संवाद साधण्याने आम्हांला आनंद झाला.

दिनकर राजपूत म्हणाले, निवृत्त लोकांची समस्या म्हणजे एकाकीपणा व आजारपणात मदतीची गरज. आम्ही सर्व इथे जमतो त्यामुळे एकाकीपणा त्या वेळेपुरता जातो. पण मुलेमुली लांब असले किंवा व्यग्र असले तर मदत मिळणे कठीण जाते.

रमेश कुलकर्णी म्हणाले, परवा आनंदीबाई देशमुख घरात चक्कर येऊन पडल्या. कुणी जवळ नव्हते. नंतर त्यांनी फोन करून शेजाऱ्याला कळवले.

वडील म्हणाले, अचानक उद्‌भवलेल्या आपत्तीच्या वेळी किंवा आजारात मदत मिळायला पाहिजे.

शंकर वायकोळे म्हणाले, मानसिक आजारही वाढले आहेत. अशा व्यक्तींची कुणी विचारपूस केली तर बरे वाटते.

बाबा म्हणाले, यावर काहीतरी उपाय शोधायला हवा. बघू या. मी प्रयत्न करीन.

माझ्या वडिलांनी त्या दिवशी जेवताना ह्या संवादाचा उल्लेख केला. त्यांची लोकांना मदत करण्याची तळमळ बघून मी म्हणाले, माझ्या तिघी मैत्रिणी त्यांच्या गावी गेल्या आहेत. त्या इथे परत येणार आहेतच. आम्ही यावर चर्चा करू.

आई म्हणाली, अगं त्या तरुण. त्यांना वयस्कर लोकांच्या अडचणींची काय कल्पना.

जयंत म्हणाला, आमच्या सरांनी आजच मानवसेवा संस्थेविषयी सांगितले. त्या संस्थेचे अनुकरण करा.

जयंतच्या सूचनेमुळे चक्रे फिरली. मी मानवसेवा ह्या मुंबईच्या संस्थेबद्दल माहिती मिळवली. ती संस्था सेवेसाठी माणसे पाठवत असली तरी त्यांचे एका दिवसाच्या पगाराचे प्रमाण ५०० ते १००० रुपये आहे. सर्वांना हे परवडणारे नाही. मी बाबांना म्हणाले, सेवामूल्य माफक किंवा फक्त सेवा, म्हणजे संस्थेने खर्च केला तर हे शक्य आहे. माझ्या बाबांनी प्रतिष्ठित लोकांची एक सभा घेतली. त्यांची मते भिन्न होती. मी शेवटी सुचविले, काही लोकांना मदत करावीशी वाटते पण त्यांना कुणाला, कशी व केव्हा सेवा देता येईल हे माहीत नसते. शिवाय ते लांब लांब असतात. अशा लोकांची माहिती संकलित करून त्यांना दिली तर काम होण्यासारखे आहे.

माझे बाबा म्हणाले, मी जे ठरविले आहे त्याची रूपरेषा तुम्हांला सांगतो. सुरुवातीचे अर्थसाहाय्य पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज म्हणून आमची जळगाव जनता सहकारी बँक देईल. कार्यालय आमच्या आदर्शनगर मधील घरात सुरू करा.

माझ्या बाबांच्या ह्या निर्णयामुळे मला हुरूप आला. मी आभा, सायली व लता यांना बोलावून घेतले. त्या तिघीजणी बोल्यावल्याप्रमाणे माझ्या घरी आल्या.

आदर्शनगर मधील आमच्या घराची स्वच्छता व रंगरंगोटी यासाठी बाबांच्या सहकाऱ्यांनी खूप श्रम घेतले. त्या घराला कार्यालयाचे स्वरूप आणले. माझ्या बाबांच्या सूचनांप्रमाणे ह्या कार्याची प्रसिद्धीही झाली. वर्तमानपत्रात त्याला प्रसिद्धी मिळाली. उद्घाटनाचा दिवस उजाडला. शबीरने सर्व व्यवस्था केली. आभा, सायली, लता, फातिमा व मी घरापुढील म्हणजे कार्यालयासमोर मंडप व सजावट केली. 'गंगोत्री' सेवेची' हे संस्थेचे नाव दोन्ही बाजूला स्वस्तिक काढून सुवर्णाक्षरात शोभत होते.

उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे जळगावचे कलेक्टर नीळकंठ जोशी होते. जळगावातील सर्व स्तरातील लोकांना आमंत्रित केले होते. जोशी साहेबांनी आमच्या कार्याबद्दल माझ्या बाबांना गौरविले. बाबांचे डोळे भरून आले. त्यांना सत्कार्यामुळे, स्वप्न पूर्तीमुळे आनंदाश्रू आवरेनात.

कार्यक्रमाच्या शेवटी केतन व त्याचे मित्र मला भेटायला आले. केतनबरोबर एक मुलगी होती. तिची ओळख करून देताना तो म्हणाला, ही लीना. आमचा साखरपुडा झाला आहे. मी तिला नमस्कार केला.

जाता जाता केतन म्हणाला, लीना तुझ्यापेक्षा सुंदर आहे.

शबीर माझ्या बाजूला उभा होता. त्याने केतनचे बोलणे ऐकले व अलेक्झांडर पोप ह्या कवीच्या प्रसिद्ध कवितेतील ओळ म्हटली Charms strike the eye but virtue wins the soul.

केतन रागावून म्हणाला, शट अप. चोमडेपणा करू नको.

शबीर म्हणाला, अरे, प्रसंग काय याची जाणीव ठेव. सेवाश्रम इधर शुरू हो राहा है और तुम इन्सल्ट कर रहे हो? Must say, from sublime to the ridiculous.

केतन म्हणाला, मैने बोला योगिनीको और जबाब तुम दे रहे हो। बाण कुठे लागला आणि जखम कुठे झाली. वा!

माझा हात धरून आभा मला आत घेऊन गेली.

* * *

# १४

आत्मानंद आश्रमात साजरा होणारा गुढीपाडव्याचा सण नवचैतन्य, आनंद व सुमारे दोन लाख भाविकांच्या सान्निध्यात गुरुबंधू-भगिनी भावनेचा उत्कट अनुभव यांची पर्वणीच असते. आभा, सायली, लता आणि मी ठरवलेच होते की त्या दिवशी आश्रमात जायचेच. शबीर आणि फातिमापण तो सोहळा अनुभवायला उत्सुक होते. ६ एप्रिलला सकाळी ८ वाजताच आम्ही सहा जण इनोव्हाने मार्गस्थ झालो. जयंत व आई येऊ शकले नाहीत. दुसरी गाडी बाबांसाठी ठेवली. कारण त्यांना गावोगावी गंगोत्रीसाठी देणग्या मागण्यास जायचे होते. जयंतलापण जळगाव जिल्ह्यातील खेडी बघायची होती म्हणून तो बाबांबरोबर जाणार होता.

एप्रिलचे ऊन अजून आले नव्हते. चैत्रातली सकाळ व त्यातून हिंदू नववर्षाने जादू केल्याप्रमाणे मनात निर्माण केलेली पावित्र्याची व उत्साहाची निर्मिती मला उल्हसित करायला पुरेशी होती. त्यातून जिवाभावाच्या मैत्रिणी व मित्र शबीर यांची साथ. सणांमुळे मने कशी गुलमोहराच्या फुलांप्रमाणे प्रफुल्लित होतात याचे नवल व कोडे नेहमीच मला अनुभवास येते. सामान्य दिवस व सणाचा दिवस, किती फरक जाणवतो. आज तर मुहूर्ताचाही दिवस. रस्त्याला नवीन लावलेल्या केळीच्या बागा व त्यांच्या शेजारच्या जुन्या केळीच्या बागा, मध्येच

काळ्याभोर जमिनी जणू धरणीने काळेभोर केस विंचरलेले. सातपुड्याच्या जवळ आल्यावर पूर्वपश्चिम वसलेला, जणू वाऱ्याने उडणारा धरणी मातेचा निळा-हिरवा पदर पाहणे आनंददायक होते.

सुगरणीचा वाऱ्याने हालणारा खोपा बघून सायली म्हणाली, ए शबीर, गाडी थांबव. तो बघ सुगरणीचा खोपा. कितीही बघितले तरी मन भरत नाही.

मग आम्ही सगळे त्या झाडाखाली गेलो. सुगरणीची ती अप्रतिम कलाकृती बघून आनंदित झालो.

फातिमा म्हणाली, बहिणाबाईची कविता कुणाला येते, म्हणा.

अरे खोप्यामधी खोपा, सर्व जण म्हणा, कोरस, योगिनी कर सुरुवात.

‘‘अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला
पिलं निजली खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला!
सुगरीन सुगरीन
अशी माझी रे चतुर
तिले जल्माचा संगाती
मिये गन्यागंप्या नर
खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा!
तिची उलूशीच चोच

तेच दात तेच ओठ
तुला दिले रे देवानं
दोन हात दहा बोटं!''

पुढे गेल्यावर फातिमा म्हणाली, ऐका. कोकिळा कुहू कुहू गातो आहे. कोण त्याची नक्कल करतो ते बघू. मी आधी, कुहू कुहू.

आता योगिनी

मी, आभा, सायली, लता व शबीर प्रत्येकाने कुहू कुहू स्वरासाठी प्रयत्न केला.

आभा म्हणाली, सायली प्रथम क्रमांक. कुठे शिकलीस गं? हो, कोकीळ कोकिळेला साद घालतो. तू पण कुणाला आठवून कुहू कुहू म्हणतेस, म्हणून चांगले गातेस.

सायली म्हणाली, तुला माझ्या मनाचा अंदाज घ्यायचं कारण? तू स्वतःच त्याचा अनुभव घेत असणार.

लता म्हणाली, हा चैत्र महिनाच उन्मादाने साद घालण्याचा महिना आहे. पक्षी घरटी बांधत आहेत. कारण मस्ती करून संसार थाटायचा आहे.

शबीर म्हणाला, लता, तुम्हे जलगावमें घर चाहिये क्या?

लता म्हणाली, प्यार की मस्ती नही है। घर अभी नही चाहिये, और वो देखेगा।

आभा म्हणाली, वो कौन?

लता म्हणाली, नही बताऊंगी. सीक्रेट है। तो बघ, पिंपळ कोवळ्या पानांनी लाजलेला दिसतो. कडुनिंबाची झाडे तर हिरवी वस्त्रे परिधान करून डुलत आहेत. वारा उत्साहाने त्यांना चिडवीत आहे.

सायली म्हणाली, मलाच म्हणता. लताला सगळीकडे नवनिर्मितीचा सोहळाच दिसतो आहे. काय सीक्रेट भानगड आहे कुणास ठाऊक.

फातिमा म्हणाली, लताला काय म्हणायचे ते कळले. ती मनात म्हणते, मै चली, मै चली, देखो प्यार की गली, मुझे रोको ना कोई

मी म्हणाले, पुरे. आपला वसंतऋतू अजून यायचा आहे. आपण आश्रमात पोहोचलो. आता भाविकांच्या गर्दीत फिरून त्यांचे बोलणे ऐका, चेहेऱ्यांवरील भाव टिपा, भक्तीचे व मांगल्याचे पीक आलेले बघा. गुरुदेवांच्या मुखाभोवतीची आभा बघा. आभा, तू पण बघ ती आभा.

लोकांचे बोलणे ऐकू येत होते.

''भाऊ कोणत्या गावचे?

मी चाळीसगावचा. तुम्ही?

मी अमळनेरचा.

आजचा नवीन वर्षाचा सोहळा किती आगळावेगळा.

अगदी खरं. नाहीतर अलीकडच्या पार्ट्या, नाच, गाणी.

आज सत्संग, भजन, कीर्तन, गुरुमाउलींच्या स्तुतीपर गाणी. मुलामुलींचा सांस्कृतिक कार्यक्रम. मला झाशीच्या राणीचा कार्यक्रम आवडला.

छानच झाला. आज दिवसभरात दोन लाख लोक येऊन गेले असावेत असं वाटतं. गुरुदेवांची कांती, त्यांचे मधुर हास्य, आत्मप्रेमाचा वर्षाव सर्व प्रेक्षागृहामध्ये जाणवला.

ध्यानाचा परिणाम. जे ध्यान करतात ते प्रेम करतात. निःस्वार्थी प्रेम.

बघा, लोक गटागटाने माणुसकीच्या ओलाव्याने भिजलेल्या शब्दांनी, हसऱ्या चेहेऱ्यांनी एकमेकांशी बोलत आहेत.

काव बहीन. तुले मी वयखलं. तुनं मले वयखलं का?

हा तू हंबळ्ळीची नं?

हावो. तुही लेक आमच्या गाजरे वाळ्यात देली आहे. ती मले म्हनली व्हती की माही माय तुले भेटीन.

कशी आहे माही लेक. गह्यर काम असतं माय तिच्या घरी. सालदार, सासूसासरे, पोऱ्हंसोरं जवायाले बी सारखं कामचं!

पन मंग कमाईबी जास्ती आहे. पसारा मोठा.

अढी आलं की बरं वाटतं. ध्यानाची सवय लावली. मन साफ राहतं.

पाहायनं कशे सगळे खेळीमेळीनं बोलता. कोन्हाले कोन्हाकळून काही नको पण गोड बोलणं चांगलं. येया जायाले बी बसची सोय आहे. खाणं पिणं त चांगलं. व माय तुनं पाहायलंन एव्हळं मोठं जेयाचं ठिकान. एक हजार लोक एकदाच जेवता. त्याच्यावर तीन बाजुले पोऱ्हीचं होस्टेल. या गुरुदेवची कमाल आहे. देव परसन्न आहे त्यांना.''

* * *

''भारती, झालं का जेवण? तुझा डान्स आवडला. खूप प्रॅक्टीस केली. चौधरी सरांची शिस्त. सगळ्या कलाकारांना नियमित प्रॅक्टीस.''

''अगं ते ठोंबरे सरपण मुलांचे आवडीचे आहेत. त्यांना भरपूर कविता आणि गाणी पाठ आहेत. आजचा भावगीताचा कार्यक्रम त्यांच्या पत्नीने, मॅडम ठोंबरेंनी बसवला होता.''

''आज नवीन वर्षाची सुरुवात. १ जानेवारीला असाच भव्य कार्यक्रम असतो.''

''मी जूनमध्येच आले त्यामुळे तो कार्यक्रम मी पाहिला नाही. ध्यानामुळे लोक एवढे बंधुभावाने वागतात. हा ध्यानाचा परिणाम मी पहिल्यांदाच बघते आहे.''

''सामूहिक ध्यानाचा विशेष परिणाम दिसतो. प्रेमाचे पीक येते. समाज स्नेहभावाने कसा आनंद उपभोगू शकतो हे दिसते.''

''धन्य झाले मी. इथे शिकायला आले.''

योगिनी, आभा, सायली, लता आणि शबीर आश्रमातील नववर्षाच्या सोहळ्यातील गर्दीत फिरत असताना वरील संभाषणे त्यांना ऐकू आली.

त्यांनी आणलेल्या प्रश्नावलीच्या प्रती ते वाटत होते व इच्छुक व्यक्तींना त्या प्रश्नावलीची उत्तरे लिहून देण्यास सांगत होते.

एका गृहस्थाने विचारले, कशाबद्दल आहे ही प्रश्नावली?

शबीर म्हणाला, मी जळगावच्या नॅशनल कॉलेजमध्ये शिकतो. सामूहिक ध्यानामुळे होणारे फायदे आहेत. त्याबद्दल अनुभव कसे आहेत याचे सर्वेक्षण करायचे आहे. कोणत्या गावांतून, थरांतून आणि भिन्न वयाच्या स्त्री-पुरुषांकडून आलेल्यांचे अनुभव आम्हांला जाणून घ्यायचे आहेत. एक अभ्यास म्हणून.

चांगले काम आहे. इथे दृश्य स्वरूपात तुम्हांला पाहायला मिळतेच आहे. आत्मप्रेमामुळे, आत्मचिंतनामुळे म्हणजेच ध्यानाने सर्वजण निरामय झाल्याचे त्यांच्याच चेहेऱ्यांवर, शब्दांमधून, वागण्यातून दिसत आहे.

६ एप्रिलच्या त्या रात्री १० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम संपला. गुरुदेव व संत मंडळी रंगमंचावर स्थानापन्न झाले. दर्शनासाठी रांग करण्यासाठी लोकांनी गर्दी केली. स्वयंसेवकांनी गर्दीचे नियंत्रण केले. भक्तिभावाचा सोहळा सुरू झाला. श्रद्धेचे दृश्य स्वरूप बघणाऱ्यांना आश्चर्य वाटले. रात्री, पहाटेपर्यंत दर्शन घेणे चालू होते. भक्त गुरुदेवांजवळ आल्यावर वाकून नमस्कार करीत. त्यांच्यापुढे फुले वाहत. गुरुदेव आशीर्वाद देत. त्यांच्याजवळील संत रोहिदास व वसंत फुले, हार, नारळ बाजूला ठेवीत. गुरुदेवांच्या हाती प्रसाद देत व गुरुदेव तो प्रसाद भक्तांना देत. दर्शन घेतल्यावर भक्तमंडळी सभागृहात येऊन बसत. नववर्षाच्या शुभेच्छा बोलून दाखवायची गरजच नव्हती. वातावरणच अदृश्य बोलांनी भारलेले होते. गुरुदेवांच्या चेहेऱ्यावरील सात्त्विक भाव, मध्येच हात जोडून नमस्कार करण्यातला नम्रपणा व अतिमहत्त्वाचे भाविक रंगमंचावर आल्यावर त्यांच्याशी बोलून त्यांना आशीर्वाद देणे, हे सर्वच शबीर व फातिमाला नवीन होते. योगिनीने त्याबद्दल ऐकले होते. पण तीसुद्धा उन्नत मनःस्थितीत उच्च स्तरावर अनुभव घेत होती. एप्रिलच्या गरमीत आत्मप्रेमाची सुखकारक हवा सर्वच प्रेक्षकांना जाणवत होती.

७ एप्रिल २०१७ उजाडला. सकाळी नाश्ता झाल्यावर आभा, सायली व लता आपापल्या मैत्रिणींना भेटायला जायला निघाल्या.

फातिमापण आभाबरोबर जायला निघाली. शबीर योगिनीला म्हणाला, मुझे बाहर घुमने जाने की इच्छा है। What about you?

मी म्हणाले, चलो I enjoy wandering in the forest.

दोघे मग सातपुड्याच्या पायथ्याशी हनुमान मंदिराकडे निघाले. वाटेत मंग्या भिल्ल भेटला. शबीरकडे बघून तो म्हणाला, वालेकुम सलाम

शबीरने म्हटले, वालेकुम सलाम

मी म्हणाले, मुस्लीमभाई एक दुसरेको सलाम करते है। हमे तो कोई सलाम, नमस्कार करताही नही।

शबीर म्हणाला, इतना सुहाना मौसम है। हम, आप साथ है और आपको मुस्लीम हिंदू फरक कैसे सुझता है? देखो ये थंड और सूरज की रोशनी एक दुसरे को गले मिल रहे है। ये शेक्सपिअरके As You Like It मे का Forest of Arden लगता है ऐसा कॉमेंट मैने सुना था। शुभ घटना इधर होती है। ये तजीले, उँचे ज्येष्ठ वृक्ष, आशीर्वाद दे रहे है ऐसा लगता है। Enjoy the beauty of this forest, so fresh, so energy-filled, manifestation of the divine.

मी म्हणाले, खरंच. मला आवडले तुझे बोलणे. ही जंगलातली झाडे तर जणू सामूहिक ध्यान करीत आहेत असे वाटते. येताना आपण मुले, मुली युनिफॉर्ममध्ये सामूहिक ध्यान करताना पाहिली. किती छान दृश्य होते ते. ह्या हिरव्या वृक्षांचाही युनिफॉर्मच वाटतो, नाही का?

शबीर म्हणाला, मैने नमाज पढा। लेकिन अकेलेमे नमाज पढना इतना इफेक्टिव्ह नही लगता।

मी विचारले, खरंच की काय? आणि कुराण काय सांगते?

शबीर म्हणाला, Listen. नमाज की वास्तविक श्रेष्ठता और बरकत प्राप्त होने के लिये सामूहिक रूपसे (जमाअत से) नमाज पढना आवश्यक है। सामूहिक रूपसे नमाज पढनेका प्रतिफल अकेले नमाज पढनेकी अपेक्षा सत्ताईस गुना अधिक होता है।

मी म्हटले, काही गोष्टी हिंदू मुसलमानांमध्ये सारख्याच आहेत असे स्पष्ट दिसते. पण थोडे कट्टरवादी शांतीचा भंग करतात. मला माझे बाबा नेहमी सांगतात की सर्वधर्म समभाव व जातीय सलोखा सर्वांच्याच हिताचा आहे.

शबीर म्हणाला, सो तो है। लेकिन हमारे individual level पे तो हम सलोखा अनुभव कर सकते है।

I hate terrorism and terrorists. I wish I could fight against terrorism मेरे लिये तो ''सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा''

मी म्हणाले, Of course, I like you for that. True friendship between us is a proof of that peace and joy.

शबीर म्हणाला, Look, they are coming to disturb our peace.

त्या चारही मुली जवळ आल्यावर फातिमा म्हणाली, जीनेवालो यही वक्त है, करले पुरी आरजू।

मी म्हटले, आरजू की बच्ची। तू जानती है क्या बोल रही है? We five are a team. शबीर टीममेट है।

फातिमा म्हणाली I am sorry. Truly sorry. मेरी जुबाँ फिसल गई। slip of tongue.

सायली म्हणाली, probability means an event that is likely to happen. It may not happen. Am I right?

मी उत्तर दिले, मी ठामपणे सांगते की तसे काही नाही. हिंदू मुलगी आणि मुस्लीम मुलगा यांच्या प्रेम प्रवाहाला नदीप्रमाणे दोन किनाऱ्यांमधून जावे लागते. तो त्या किनाऱ्यावर आणि ती इकडच्या किनाऱ्यावर. समाजाच्या समुद्रात हा प्रवाह मिसळतो तेव्हा पाणी खारटच होते. अपवाद आहेत. त्याबद्दल सांगू नका. आपण सामान्य माणसे.

आभा म्हणाली, पण त्या दोन किनाऱ्यांवर समजूतदारपणाचा किंवा शहाणपणाचा पूल असू शकतो.

मी म्हटले, हो तर. तीच मैत्री. प्रेमाचा प्रवाह सुकतो. हा मनुष्यजातीला शाप आहे. उःशाप आहे तो मैत्रीचा, निर्व्याज प्रेमभावनेचा. मुळात प्रेम आणि वासना विलग कशा करता येतील हे एक गूढ आहे. प्रेमाच्या देखाव्यामागील आलेल्या काटेरी सापळ्यातून मी सुटले आहे.

लता म्हणाली, काटे चुकवून गुलाब अलगद नाही का तोडता येत. It is possible.

मी म्हणाले, पण त्याचे रंग व सुगंध काळाच्या ओघात नाहीसे होतात.

आभा म्हणाली, तुला त्याचा काय अनुभव आहे गं? मैत्रीसुद्धा दिखाऊ असू शकते. असीर गडावरील शोकांतिका आठव. तूच नेहमी त्याबद्दल सांगतेस.

मी म्हणाले, हो. जीवनच दुधारी तलवार आहे. तीच तर समस्या मला भेडसावते. असुरक्षित करते.

शबीर म्हणाला, ध्यानामुळे दुधारी तलवार दूर ठेवता येते. योगिनीला हाही अनुभव आहे की सेवेतून, सत्कर्मातून आपण उच्च पातळीवर जीवन जगू शकतो. सही है या नही. इंशा अल्ला.

मी म्हणाले, सत्कर्माला अडथळा येऊ न देणे हे महत्त्वाचे. आपली टीम ते करेल.

फातिमा म्हणाली, हिंदू-मुस्लीमको सत्कर्म और सेवा सुख शांती दे सकते है। अरे, हां मै तो भूल गयी थी।

चव्हाण सरने पैगाम भेजा है। मैने जो कुछ कहा वो मेरे वैयक्तिक मत है। आश्रम के अच्छे काम के बारेमे कुछ विद्यार्थीओंने लिखे हुअे निबंध से जादा जानकारी मिलेगी। ये देखो कितने सारे निबंध है। सबका विषय एकही है- आश्रम स्कूल मे आनेपर मुझमे क्या बदल हुआ।

मी म्हणाले, ये निबंध और सर्वेक्षण के जबाब हम जाते समय गाडीमे पढेंगे।

ते पाचही जण परत आश्रमात जायला निघाले. मंग्याची गुरे रस्ता अडवून उभी  होती. त्यांच्याकडे स्नेहयुक्त नजरेने बघत मी म्हणाले, बघा किती छान रंगांच्या छटा ह्या गुरांच्या अंगावर. लाल, फिकट लाल, पांढरे, पांढरा-लाल, तोंडावर लाल-पांढरे ठिपके, पायांवर पांढरा रंग, डोळ्यांच्या कडेला काळसर. त्यांचा नूर बघा. उमदेपणा तर भारीच. रानातली मोकळी हवा आणि हिरवा चारा मनसोक्त खाल्ला आहे. शिवाय जंगलात भटकंती.

त्याच वेळी एक एस.यू.व्ही. आली. ड्रायव्हर मोठमोठ्याने हॉर्न वाजवू लागला. आतून केतन बाहेर आला. खसदार सुभाष लोमटेसुद्धा गाडीतून उतरले. ते रागाने मंग्याला म्हणाले, तुम क्या करते हो। ऐसे रास्ता बंद करना ठीक नही। जल्दी गुरांना बाजूला कर. बेवकूफ कहींका।

केतन मंग्याला शिव्या देत, मारण्याचे हातवारे करू लागला. ते बघून शबीर म्हणाला, दमाने घे. तो गुरांना वळवतो आहे. Patience.

केतन शबीरला रागावून म्हणाला, चूप. थोबाड फोडीन. मीपण त्यामुळे रागावले व म्हणाले, सहनशीलता कोण कोणाला शिकवेल. खासदार इथे आहेत म्हणून जोर आलाय का? बांडगुळासारखा दिसतो.

खासदार म्हणाले, सांभाळ पोरी. आमदार गल्लीतला आणि खासदार दिल्लीतला. फरक समजतो का?

मला चीड आली. मी म्हणाले, दिल्लीतला गल्लीत आणि गल्लीतला दिल्लीत जाऊ शकतो. लक्षात ठेवा.

केतन म्हणाला,  एस.वाय. फेल, औकात काय तुझी? कुणाशी बोलते आहेस?

मी म्हणाले, इथे आश्रम आहे. S.Y., T.Y. याला अर्थ नाही. इथे हृदयातील परमेश्वर पूजनीय आहे. सत्ता आणि संपत्ती कशी आली त्याचा विचार करा.

खासदार नरमले. त्यांच्या वर्मावर मी बोट ठेवले होते. माझ्यात तसे बोलायचे धैर्य कसे आले याचा मी विचार करीत होते. तेव्हाच सायली म्हणाली, योगिनी तू तर रणरागिणी व्हायला सिद्ध झाली होती. My god, काय तुझा अवतार होता.

आभा म्हणाली, म्हणजे तू प्रतिपक्षाला असुरक्षित करू शकतेस.

शबीर म्हणाला, योगिनीला तिच्या वडिलांचा अपमान असह्य झाला म्हणून तिला मनोबल आले. Keep it up- you are changing. Congratulations. त्या चौघांनी टाळ्या वाजविल्या.

* * *

# १५

दुसऱ्या दिवशी सकाळी ९च्या सुमारास 'गंगोत्री सेवेची'च्या कार्यालयात आभा, सायली, लता व मी स्वयंसेवकांच्या रजिस्टरमध्ये कालच्या कार्यक्रमानंतर आलेल्या नावांचे आद्याक्षरांप्रमाणे वर्गीकरण करून लिहीत होतो. स्वयंसेवकांचे स्त्रिया व पुरुष असे दोन विभाग केले होते. प्रत्येकाचे नाव, पत्ता, फोन, मोबाइल नंबर, व्यवसाय असा मजकूर लिहीत होतो. २५ स्त्री–पुरुषांची नावे आली होती.

त्यानंतर लोकमत वर्तमानपत्रात गंगोत्रीच्या उद्‍घाटनाची बातमी आली होती ती मी मोठ्याने वाचली. आम्हा सगळ्या जणींना कलेक्टर जोशी यांनी आमच्या योजनेची प्रशंसा केलेली व बाबांचे कौतुक केल्याचे वाचताना आनंद झाला. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. डोळे पुसून मी लोकमतचे मधले पान वाचायला घेतले. त्यात चौकटीत ठळक अक्षरातील मराठी म्हणीकडे माझे लक्ष गेले. **'उद्योगाचे घरी रिद्धी सिद्धी पाणी भरी'** त्याखाली सरकारी स्टार्टअप म्हणजे नवीन उद्योग करणाऱ्यांसाठी अर्थ साहाय्याची माहिती होती व अट होती. किमान कौशल्य असल्याची. बिनव्याजी कर्ज दोन

लाख रुपयांपर्यंत तारणाशिवाय मिळणार. शेवटी शब्द होते: तुमची इच्छाशक्ती व कार्यशक्ती हेच तुमचे भांडवल आणि सरकारचा तुमच्यावरील विश्वास हेच तारण.

मी म्हणाले, ऐका, मी ही जाहिरात वाचते. मला काय वाटते ते वाचल्यावर सांगेन.

सायली म्हणाली, आता सांग. पुन्हा काय योजना आखतेस. कोणते स्वप्न पाहतेस.

मी म्हणाले, सायली व आभा यांच्यासाठी एक सुचविते.

लताचे आईवडील मध्यम वर्गातले. थोडीफार पुंजी असलेले. त्यामुळे तिला एम.बी.ए.साठी पैसे मिळतील. सायलीची आई शालिनी मावशी व आभाची आई मालती मावशी या दोघींना ही योजना उपयोगी ठरेल.

आभा म्हणाली, कशी? माझी आई मामाकडे राहते. शेतात काम करते. सायलीची आईपण शेतमजूर.

मी म्हणाले, जळगावात बरेच विद्यार्थी वसतिगृहात किंवा भाड्याने खोल्या घेऊन राहतात. शिवाय कुटुंब नसलेले बाहेरून आलेले मजूर आहेत. त्यांच्या भोजनाची व्यवस्था झाली तर पैसे व त्यांचे आशीर्वादपण मिळतील. शेवटचे शब्द जाहिरातीत अधोरेखित केलेले आहेत.

सायली म्हणाली, ते कोणते?

मी वाचले, 'किमान कौशल्य, इच्छाशक्ती, कार्यशक्ती, विश्वास' तुझी आई व आभाची आई स्वयंपाक छान करतात हे तुम्हीच मला सांगितले आहे. त्यांनी खेड्यातील घरे विकायची. इथे घर घ्यायचे व ह्या योजनेचा लाभ घेऊन भोजनगृह सुरू करायचे किंवा डबे पाठवायचे.

तेवढ्यात फातिमा आणि शबीर आले. फातिमा म्हणाली, अरे यार भोजन बोले तो भूक लगी। जरा हमे भी बताओ किधर जाना है। खाना खाने के लिये?

शबीर म्हणाला, एक नई व्हेजिटेरिअन हॉटेल शुरू हुई है। आज हम उधर लंच करेंगे? I will be the host.

फातिमा म्हणाली, चलो. एक समय की तो व्यवस्था हो गयी।

मी त्या दोघांना आमच्या सरकारी योजनेच्या चर्चेबद्दल सांगितले.

फातिमा म्हणाली, ये तो अच्छी स्कीम है। मै तो हमेशा उधर खाना खाने जाऊंगी। लेकिन सिरिअसली. गेम चेंजिंग प्लॅन है। योगिनी, क्या दिमाग है तेरा। While feeling for others, you conceive good idea to help the needy. चाचाने गंगोत्री को जनम दिया और अब चाचाकी लडकी यमुनोत्री की बात कर रही है।

शबीर म्हणाला, और गंगायमुना का ये संगम जलगावमे होगा।

मी म्हटले, शबीर, इच्छाशक्ती, कार्यशक्ती, धन और हमारा सहकार्य इन सबका संगम होना चाहिये।

शबीर म्हणाला, मै तो हरतरह का सहकार्य देने को तैयार हूँ।

अशा प्रकारे संभाषण चालू असताना फोन आला. मी विचारले आपण कोण? मी योगिनी राणे गंगोत्री संस्थेतून बोलते आहे.

फोनवरून उत्तर आले, काय बोलू कळत नाही. मले एक जनाने आजच्या पेपरमंधी येयेल बातमी सांगली. हा नंबर देला म्हनून फोन केला. माफी करा. वयकदेख नही तरी.

मी विचारले, फोन केला पण नाव काय तुमचे? कुठे राहता? काम काय करता?

उत्तर आले, मी सोनी. असोद्याच्या दलित वस्तीतली. मी अन् डाल्यानं पलून लगन केलं. आमी अढी जयगावात रस्त्यावर राहते. डाल्या म्हनतो तो इसतरी करीन. पैसे मियतीत. मक जुना टेबल मियाला. जुनी इस्तरीबी घेतली. पन जम बस्याले येय लागीन, तढलोक काम पाहिजे. मियीन का काम?

मी विचारले, तुम्हांला पेपरमधली बातमी कुणी दिली, इथे फोन करायला कुणी सांगितले?

सोनी म्हणाली, कोन्हीतरी तरना पोरगा व्हता. रंगानं गोरा! स्कूटरवर फिरत व्हता. मी नाव इचारलं. तो म्हनला शुभम!

मी म्हणाले, ठीक आहे. तुम्ही आदर्शनगरमध्ये गंगोत्री संस्थेत या. साईबाबा रस्त्यावर.''

एक तासाने सोनी व डालू कार्यालयात आले. सोनीला गंगोत्रीच्या कार्यालयात साफसफाईसाठी महिना ३०० रुपये मजुरीवर काम दिले. शुभमने चिखलात कमळ फुलविले.

फातिमा म्हणाली, ज्योत से ज्योत जगाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो।

देखो हमारी सहेली, योगिनी जीवन ज्योत बन गयी है।

मी म्हणाले, नको, एवढी स्तुती करू नको. माझ्या व्यक्तिमत्त्वात काहीतरी कमी आहे. आपण सर्वजण मिळून काम करतो, म्हणून माझा तोल जात नाही.

त्याच वेळी फोन आला. मी विचारले, आपण कोण?

एका वृद्ध स्त्रीच्या आवाजात उत्तर आले, मी दीपा लेले, नेहरू पुतळ्याच्या पुढील लेले वाड्यात राहते. तुमचे अभिनंदन!

मी म्हणाले, आभारी आहे. आपलं काही काम आहे का?

दीपा लेले म्हणाल्या, माझी नात उद्या अमेरिकेत जायला निघणार आहे. तुमच्या गंगोत्री संस्थेबद्दल आज लोकमतमध्ये वाचले. माझ्या नातीला- धनश्रीला तुमच्या संस्थेस देणगी द्यायची आहे. आमच्या वाड्यातल्या शुभम बरोबर ती चेक पाठवत आहे.

मी म्हणाले, आभारी आहे. धनश्रीताईंना आमच्या शुमेच्छा! त्यांचा प्रवास सुखाचा होवो.

धनश्री फोनवर म्हणाली, तुमची संस्था करुणेचं प्रतीक आहे. मला संस्थेचा उपक्रम आवडला. अभिनंदन!

मी म्हणाले, Thanks, happy journey.

सायली म्हणाली, बरं त्या start up उद्योगाचं काय? Are you serious about it.

मी म्हटले, आभाची आई आणि तुझी आई इथे तुमच्याबरोबर राहतील. तुमचं बी.एड.चं शिक्षणही होईल व खानावळपण सुरू राहील. अर्थात, तुम्ही दोघी निर्णय घ्या. मला सुचले ते मी सांगितले.

फातिमा म्हणाली, तुला अशा गोष्टी कशा सुचतात? तू म्हणजे Problem Solving Person आहे, PSP.

मी म्हणाले, मी वाचले आहे, Life is a mystery to be lived. आपल्या निरीक्षणात, वाचनात, विचारात परागकण निसर्गात वेलींना भेटतात त्याप्रमाणे आपल्याला नकळत काही गोष्टी सुचतात. मी 'वनारसे आजी' हे पुस्तक वाचले हाते. त्याची आठवण मधूनच येते. त्या निराधार बाईने लंडनमध्ये हॉटेल चालू केले होते. रुचकर महाराष्ट्रीय जेवण तिथे मिळायचे. एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण तिथे जेवायला गेले होते व त्यांनी वनारसे आजीचे भरभरून कौतुक केले होते. त्या आजीची गोष्ट मी नंतर सांगेन. पण या बाबतीत तुम्ही दोघीजणी निर्णय घ्या. शक्य तेवढी मदत आम्ही करू.

आभा व सायली आपापल्या गावी गेल्या. आईबरोबर चर्चा केली. आभाच्या मामाचा विरोध होता, पण तिचा निर्णयात्मक पवित्रा बघून ते तयार झाले. आभाच्या आईच्या मालकीच्या जमिनीचा मोबदला २५,००० रुपये त्यांनी दिला. सायलीच्या आईनेपण तिच्या मालकीची २ एकर शेती विकून ३०,००० रुपये ह्या उपक्रमासाठी दिले. सरकारी योजनेप्रमाणे दोन लाख रुपये बिनव्याजी कर्ज मिळाले. भाड्याने भाजी मार्केटजवळ जागा घेतली. तिथेच मागच्या बाजूस राहायची सोय होती. अशा प्रकारे 'खान्देश भोजनालय' सुरू झाले. शबीर, फातिमा, माझे वडील व मी कर्ज मिळविण्यास, जागा शोधण्यास, फर्निचर घेण्यास मदत केली. आभा व सायली दोघींनी एम.जे. कॉलेज कँपसमधील शिक्षण महाविद्यालयात बी.एड.ला प्रवेश घेतला. लताने मुंबईच्या बजाज इन्स्टिट्यूटमध्ये एम.बी.ए.ला प्रवेश घेतला. मी नॅशनल कॉलेज बदलून एम.जे. कॉलेजला

एस.वाय.बी.ए.ला प्रवेश घेतला. नॅशनल कॉलेजची, केतनची, त्या प्रसंगांच्या आठवणी पुसट होत गेल्या. शबीर तिथेच नॅशनल कॉलेजमध्ये बी.ए.च्या तिसऱ्या वर्षात होता. त्याचा मुख्य विषय इंग्रजी व इतर तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र होते. त्याच्या चेहेऱ्यावरील निश्चयात्मक भाव व डोळ्यातील कारुण्य त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकर्षक करी. फातिमा नॅशनल कॉलेजमध्येच तिसऱ्या वर्षाला बी.कॉम.ला होती. माझे एक वर्ष वाया गेल्याने मी बी.ए.च्या दुसऱ्याच वर्षात पुनः प्रवेश घेतला.

* * *

# १६

१० मे २०१७ या दिवशी नॅशनल कॉलेजच्या वसंत व्याख्यानमालेत Values for co-existence (सहजीवनासाठी मूल्ये) यावर मुंबईहून आलेल्या वक्त्याने, जेम्स फर्गसनने आपल्या व्याख्यानात सांगितले I am doing research in certain aspects of Koran such as Treatment of parents by children, and relation between husband and wife, bringing up children, and value of friendship. I find dignity and sustaining power in this part of Koran. Comparing these values with those in other religious sacred books is interesting and revealing. It can help to build a better society.

प्राध्यापक फर्गसनला बोलताना काही श्रोत्यांनी No. no stop, stop अशा प्रकारे ओरडून भाषण बंद पाडले. त्या वेळी फर्गसन यांनी Listen to my entire speech. Then we will discuss. असे आवाहन केले. पण दोन श्रोते स्टेजजवळ आले व त्यांनी तावातावाने विचारले, What about Parda? Is it not undignified to women? Talk of Common Civil Code.

शबीर प्रश्नकर्त्या श्रोत्यांजवळ आला व त्याने शांततेने चर्चा करण्याची संधी त्यांना मिळेल असे सांगितले. फर्गसन सरांचे व्याख्यान त्यामुळे व्यवस्थित पार पडले. त्यांनी व्याख्यानाच्या शेवटी सूचना केली, You may not agree with my views. But I request you to read a book named 'Aadabe Jindagi'. It's simple and full of concern for a better society. I am not referring to Parda, Common Civil Code, fundamental rights of women etc. because I have not yet studied these subjects.

श्रोत्यांमधून काही जण सभागृहाबाहेर गेले व मोबाइलवर त्यांच्या सहकाऱ्यांना काय सांगितले कळले नाही पण मुस्लीम वस्तीशेजारच्या भागात दंगल सुरू झाली. जाळपोळ सुरू झाली. घोषणांनी हिंदूंना भडकावले.

नॅशनल कॉलेज मुर्दाबाद

कुराण वरचढ नही है

परदा हटावो

कॉमन सिव्हिल कोड हवे.

मुसलमानांनी त्यांची वाहने बंद केली. त्या वेळी Transport Business मधील त्यांची मक्तेदारी कळली. तसेच बेकरी, पानपट्टीची बहुतेक दुकाने, फळांची दुकाने बंद झाली. १०-१५ युवकांनी शबीरच्या वडिलांचे भाजी मार्केटमधील फळांचे दुकान उद्ध्वस्त केले. रस्त्यावर फळांचा थर साचला. पटापट सर्वच दुकाने बंद झाली.

पोलिसांच्या गाड्या गस्त घालू लागल्या. पोलीस घोषणा देत होते, शांतता राखा. हिंसा बंद करा. जाळपोळ बंद करा.

पोलिसांनी लाठ्यांनी दंगेखोरांना चोपले. मुसलमानांच्या संघटनांनी मोर्चे काढले. त्यांच्या संरक्षणासाठी पोलीस बंदोबस्त ठेवला गेला.

शबीर व फातिमा यांनी प्राध्यापक फर्गसन यांना योगिनीच्या स्वाधीन केले. योगिनीने त्यांना तिच्या गाडीतून घरी आणले. ते सुद्धा दुःखी झाले होते. करायला गेलो एक आणि झाले भलतेच अशा

मानसिक अवस्थेत त्यांचे नैराश्य स्पष्ट दिसत होते. रात्रीच्या गाडीने त्यांना मुंबईला परत पाठविले. ते सुरक्षित मुंबईला पोहोचले असा सकाळी फोन आला तेव्हा योगिनीचा जीव भांड्यात पडला.

फातिमा ह्या धक्क्याने अंतर्मुख झाली. योगिनीला तिच्या वडिलांचा अभिमान वाटला. कारण दंगलीमध्ये जाऊन त्यांनी व त्यांच्या मल्हार गँगने जाळपोळ बंद करण्यास व लोकक्षोभ कमी करण्यास मोलाचे कार्य केले होते. शबीर व त्याच्या मित्रांनीही दंगल थांबवण्यासाठी जीव धोक्यात घालून प्रयत्न केले. तो स्वतःशी म्हणाला, ह्या अनुभवातून मी बरेच काही शिकलो. सहजीवनाचे मंत्र न सोडता काळजीपूर्वक व प्रेमाने त्याचा स्वीकार झाला पाहिजे.

योगिनीचे बाबा तिला म्हणाले, मोठ्या संख्येने मुसलमान तत्काळ जमा झाले व आंदोलनाला उग्र स्वरूप आणले. हिंदू त्या मानाने फारच कमी आले. एकीचे बळ व कट्टरता धोकादायक होऊ शकते.

केतन त्याच्या शुभ-लाभ गँगला म्हणाला, साला शबीर जास्तच फुसफुस करतो, त्याची चांगली जिरली.

* * *

# १७

३ जुलै २०१७.

'गंगोत्री'च्या कार्यालयात व्यवस्थापक म्हणून मी अर्धवेळ काम करत होते. स्वयंसेवकांचा आकडा आता शंभरच्या वर गेला होता. देणग्या येत होत्या. मूलबाळ नसलेल्या व पतीचे निधन झाल्यावर एकाकी जीवन कंठणाऱ्या एका ८० वर्षांच्या म्हाताऱ्या आजीला, लक्ष्मीबाई जाधवला एका स्वयंसेवकाने खूप मदत केली. ती स्वयंसेवक होती मृदुला चिटणीस. लक्ष्मीबाईने तिची इस्टेट मृदुलाच्या नावे करून दिली. त्याआधी गंगोत्रीला पाच लाख रुपयांची देणगीपण दिली. मानलेली आजी व मानलेली नात, लक्ष्मीबाई व मृदुला, यांची

हृद्य कहाणी जळगावच्या वर्तमानपत्रात आली तेव्हा नात्याविषयी भावनांची पौर्णिमेला सागराला भरती यावी तशी जनमानसात भरती आली. स्वार्थ, हेवे-दावे, मीपणा यांचे दगड क्षणभर का होईना त्या लाटेखाली लोपले गेले.

दुसऱ्याच दिवशी मात्र एक धक्कादायक व माझे मानसिक स्वास्थ्य बिघडवणारी घटना वर्तमानपत्रात आली. गंगोत्रीमधील भ्रष्टाचार असा मथळा असलेली ती बातमी मला जिव्हारी लागली, व मी जवळजवळ कोसळलेच. फातिमा माझ्यासोबत होती. तिने मला घरी आणले. डॉक्टरांना बोलाविले. माझे आईवडील चिंताग्रस्त झाले. माझे वडील पोलीस स्टेशनला गेले व गंगोत्री कार्यालयातील हिरामण चौधरी याच्याविरुद्ध आर्थिक घोटाळा केल्याबद्दल तक्रार नोंदविली. हिरामणला पोलिसांनी पकडून आणले व त्याची जबानी नोंदवली.

इन्सपेक्टरांनी विचारले, तुम्ही हिरामण चौधरी, वय २५, राहणार चौधरी चाळ, रूम नं. ५, दादा वाडी, जळगाव. बरोबर.

हिरामण, हो साहेब.

इन्सपेक्टर, कधीपासून गंगोत्रीमध्ये कामावर?

हिरामण, ३ महिने.

गंगोत्रीच्या देणगीदारांनी तक्रार केली आहे, त्यांची नावे तिमाही अहवालात छापली गेली नाहीत, देणग्या नगद दिल्या होत्या. पावत्यांवर तुमच्या व योगिनी मॅनेजरच्या सह्या आहेत. काय प्रकार आहे.

हिरामण, नाही साहेब. मला माहीत नाही. कुणीतरी ते पावती पुस्तक माझ्या ड्रॉवरमध्ये ठेवले असेल.

इन्सपेक्टरने हिरामणला चांगलेच चोपले. मग विचारले, आता बोल. काय प्रकार आहे?

हिरामण, साहेब, मी खरं सांगितले तर माझ्या जिवाला धोका आहे. माफ करा.

इन्सपेक्टर, आणि खोटे पावती पुस्तक कुठे छापले? कुणी छापले.

हिरामण, मला ते दिले गेले. मी असहाय आहे. माझ्यावर खूप दबाव आहे.

इन्सपेक्टर, उद्यापर्यंत तुला वेळ देतो. सर्व काही कबूल कर. नाहीतर तुझी हाडं मोडीन.

त्याच दिवशी रात्री हिरामणचा मृतदेह नशिराबाद रस्त्यावर एका शेतात मिळाला.

पोलीस तपास सुरू झाला. हिरामणच्या प्रेताजवळ झोपेच्या गोळ्यांची रिकामी बाटली सापडली. पोस्टमॉर्टेमच्या रिपोर्टमध्ये त्याने झोपेच्या गोळ्या घेतल्याचे व म्हणून आत्महत्या केल्याचे नमूद केले होते. मला पोलीस स्टेशनवर जावे लागले.

मला इन्सपेक्टरने विचारले, ह्या पावतीपुस्तकावरील सह्या तुमच्या आहेत?

मी म्हटले नाही. मी त्या केलेल्या नाहीत. कुणीतरी माझ्या खोट्या सह्या केलेल्या आहेत.

इन्सपेक्टर रागावले व म्हणाले, तुम्ही मॅनेजर आहात. कॉलेजमध्येपण शिकत आहात. कार्यालय चालते कसे?

मी म्हणाले, साहेब सर्व व्यवहार चोख आहेत. अर्थात हे खोट्या पावती पुस्तकाचे प्रकरण सोडून.

इन्सपेक्टर म्हणाले, काल तुम्हांला कोण कोण भेटले. हिरामणसंबंधी कुणी काही विचारले का?

मी म्हणाले, नाही. मी घरीच होते. ह्या धक्क्यामुळे मी दुःखी आहे. तळमळीने, सचोटीने काम करून हे असे फळ? तुम्ही खऱ्या गुन्हेगाराचा तपास करा साहेब.

इन्सपेक्टर म्हणाले, ते तर आमचे कामच आहे.

पंचनामा झाला आहे. भिवा आणि बाबूच्या घराची झडती घेतली. त्यात अमली पदार्थ मिळाले. गुटका भरलेली पाकिटं मिळाली. त्याचा रिपोर्ट डी.आर.आय.कडे पाठविला आहे. ती चौकशी होईल. नथूभाऊंना काही गोष्टी विचारणे भाग आहे. पण ते

मुंबईला गेले आहेत. पंचनाम्यात एक महत्त्वाची वस्तू सापडली आहे. हिरामणच्या खिशातील पाकिटात तुमचा फोटो मिळाला आहे. याबद्दल काय सांगाल?

मी म्हणाले, माझा फोटो त्याच्याकडे असणे शक्यच नाही.

इन्सपेक्टर म्हणाले, फोटोवरील ठसे कुणाचे आहेत त्यासाठी तज्ज्ञांकडे पाठवले आहेत. तुम्हांला कुणाचा संशय?

मी म्हणाले, एक-दोनदा कार्यालयाबाहेर तो पहिलवान भिवा चव्हाण व बाबू चौधरी उभे होते. त्यांनी हिरामणला बाहेर बोलाविले. मला ते लोक आवडत नाहीत म्हणून मी त्यांना आत बोलाविले नाही. पण हिरामण त्यांच्याशी बोलल्यावर घाबरल्यासारखा दिसला.

इन्सपेक्टर म्हणाले, ठीक आहे. माहिती दिल्याबद्दल आभार. पण त्या फोटोविषयी काही कळल्यास सांगा.

मी म्हणाले, हो साहेब.

त्यानंतर हिरामणची पत्नी प्रमिला हिची जबानी झाली. तिने सांगितले, तो फोटो आमच्या घरात कुणीतरी टाकलेला होता. आम्ही बाहेरून आलो, दार उघडलं अन् पाहतो तर फोटो. त्या योगिनीचा की फातिमाचा. मीनं तं तो चोयामोया केला तव्हा त्याहीनं माह्या कळून घेतला. पाकिटात ठेवला अन् म्हनाले, उद्या मॅडमला ईचारतो हे काय परकरन आहे. त्याहिले मंगन फोन आला अन् ते निघाले. सांगलंबीनी कुढी चालले. गेले ते परत आले नाही.

प्रमिलाचे सांत्वन करून तिला घरी परत पाठविले.

त्यानंतर भिवा आणि बाबू यांच्यावर फसवणूक केल्याची व हिरामणचा खून केल्याची केस झाली. त्या दोघांनी खोटे पावती पुस्तक छापून घेतले होते व ते हिरामणला नगद देणग्या घेण्यासाठी वापरायला सांगितले होते. पण हिरामणच्या खिशातील माझ्या फोटोबद्दल व त्याच्या खुनाबद्दल त्यांना काहीच माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. त्याबद्दल काहीच पुरावा मिळाला नाही. ठसे

तपासणाऱ्या तज्ज्ञाने अहवाल दिला की, फोटोवर हिरामण व प्रमिलाचे ठसे आहेत. पुराव्या अभावी खुनाचा तपास अपुरा राहिला.

भिवा व बाबूकडून खोट्या पावतीतील देणग्यांची रक्कम वसूल केली गेली. त्यांना सहा महिने कैद आणि १०,००० रुपये प्रत्येकी दंड झाला.

माझे बाबा पोलीस स्टेशनवर गेले होते व हिरामणच्या खुनाच्या केसमध्ये हायकोर्टात त्यांनी अपील करण्याचे मत इन्सपेक्टरांना सांगितले.

इन्सपेक्टर म्हणाले, अपील करू शकता. जिल्हा कोर्टाच्या निर्णयानुसार पुराव्याअभावी अनिश्चित काळ ही केस लांबणीवर टाकली आहे. पुरावा मिळाला तर पुन्हा केस सुरू होईल. अपील करण्यापेक्षा पुरावा मिळविणे अधिक चांगले.

बाबा म्हणाले, तुमची गुप्तहेर यंत्रणा कामाला लावा.

इन्सपेक्टर म्हणाले, ते चालूच आहे. संशयाची सुई खासदार साहेबांच्या गँगमधील एक दोघांकडे स्थिरावताना दिसते. पापाचा घडा भरू द्या.

बाबांनी मला इन्सपेक्टरच्या तपासाबद्दल सांगितले तेव्हाच माझी खात्री झाली तो फोटो केतनने कॉलेजच्या लायब्ररीतून मिळविला होता. मला दाखवीत तो म्हणाला होता, बघ, तुझा फोटो माझ्याजवळच असतो.

मी विचारले, कसा मिळाला?

केतन म्हणाला, लायब्ररीतून.

मी माझ्या बाबांना सर्वकाही कथन केले. तेव्हा ते म्हणाले, झाकली मूठ सव्वा लाखाची. कायद्याचे हात लांब असतात. आपल्याला या प्रकरणात जास्त लक्ष घालणे धोक्याचे आहे. लोकप्रियता व प्रतिष्ठा यांना संशयाच्या जाळ्यात अडकवण्यात शहाणपण नाही. म्हणून मी त्याच्यावर सरळसरळ हल्ला करण्यास दगडू काळेला मनाई केली आहे. मला खासदारकीचे तिकीट मिळाल्यास

लोकसंग्रहाची व स्वच्छ प्रतिमेची फार गरज आहे. नाही म्हणायची हिंमत हिरामणला नव्हती. त्याची जबरदस्त किंमत त्याला द्यावी लागली.

दूरदृष्टीने विचार करण्याची बाबांची पद्धत मला पटली व मी गप्प बसले.

हिरामण तीन महिन्यांपूर्वी यावलजवळील साक्री गावाहून जळगावला आला होता. गंगोत्रीची जाहिरात वाचून तो मला भेटला. त्याचा खेडुतासारखा बुजरा स्वभाव व आत्मविश्वासाचा अभाव, त्याच्या बोलण्यातून व बाकावर टोकाला भीत भीत बसण्याची त्याची पद्धत पाहून मला त्याची दया आली. तू इतक्या लहान वयात लग्न केले. मोठी जबाबदारी पत्करली, असे मी विचारल्यावर तो लाजला. नजर खाली करून म्हणाला, आजी ऐकेना. मले हिरामनचं लगन पाहायचं आहे. मंग मी सुखानं मरीन असं म्हने.

मी विचारले, मग शेतीत मजुरीचे काम करायचे. मजुरी चांगली मिळते.

तो म्हणाला, बायको नाही म्हने. तिले जळगावले राहायचं होतं.

त्या मुलाखतीनंतर त्याला मी गंगोत्री कार्यालयात कारकून म्हणून नेमलं. कोकराला वाघाच्या तोंडी द्यावं तसं पुढे घडलं. माणसांच्या रूपाने वावरणाऱ्या दुष्ट शक्तीने कपटाने त्याला घेरलं.

त्या दिवशी रात्री मला भयानक स्वप्न पडले. मी स्वप्नात पाहिले: नसीर खानाने डोल्यांमधून असीरगडावर पाठविलेले सशस्त्र शिपाई धडाधड उड्या मारीत आहेत. गुणी अहीर राजा आसा व त्याची उदार बायको आणि इतर कुटुंबीयांची सैनिकांनी हत्या केली. त्या कुटुंबीयांमध्ये मला हिरामण दिसला. भीतीने अर्धमेला झालेल्या हिरामणवर सैनिकाने तलवारीने वार केला. इ.स. १४०५ ते १४१० दरम्यान झालेल्या असीरगडच्या हत्याकांडात परवाचा हिरामण कसा दिसला याचे कोडे मला उलगडेना. मी घामाघूम होऊन उठले. गोंधळले. दुरान्वयाने का होईना माझ्या कर्माचा परिणाम हिरामणच्या

मृत्यूत झाला असे वाटून मला अपराध्यासारखे वाटले. त्या शोकांतिकेमुळे जीवनातील ह्या घटनांच्या मालिकेने मी सुन्न झाले होते.

* * *

# १८

१५ सप्टेंबर २०१७ या दिवशी गोलानी मार्केटच्या पाचव्या मजल्यावरील माझ्या वडिलांचे कार्यालय सकाळी १० वाजताच उघडले होते. समोरच्या भिंतीवर मध्यभागी शिवाजी महाराजांचा फोटो, त्यांच्या एका बाजूला महात्मा गांधींचा व डॉ. भीमराव आंबेडकर यांचे फोटो आणि दुसऱ्या बाजूला ज्योतीराव फुले आणि लोकमान्य टिळक यांचे फोटो उदात्त व पूजनीय भावना निर्माण करतात. बाजूच्या भिंतीवर पंतप्रधान, जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे फोटो कार्यालयाला त्या महापुरुषांच्या वारसाचे प्रतिनिधित्व करीत असल्याचे वाटते.

लाल सतरंजीची शोभा आकर्षक होती. समोरच्या फोटोखाली मध्यभागी टेबल व खुर्च्या आणि दोन्ही बाजूला भिंतीशी लागून १०-१० खुर्च्या यामुळे कार्यालयाचे येणारे स्वरूप योगिनी व तिच्या मैत्रिणी आल्यावर त्यांच्या मनावर छाप न टाकल्यास नवलच. शिपाई धनसिंगने टेबलावर व प्रत्येक खुर्चीजवळ बिसलेरीच्या बाटल्या ठेवल्या. नोटपॅड व पेनही ठेवले. लताने आणलेली फुले टेबलावरील फुलदाणीत अलगद ठेवली.

नथूभाऊ, त्यांचे सहकारी दगडू काळे, रामजी सोनार, महंमद जाफरी, सखाराम तायडे, तुकाराम वाणी, सोनाली आठल्ये, सीताराम जोशी, जगन्नाथ भिरूड आणि सूर्यकान्त माळी यांच्यासोबत कार्यालयात आले. सर्वजण स्थानापन्न झाल्यावर नथूभाऊंनी त्यांचे विचार मांडले-

आजची बैठक एका विशेष कामासाठी आयोजित केली आहे. तुमच्या नेहमीच्या सहकार्यामुळे आजपर्यंत आपल्या मतदार संघात आपल्या जनता पक्षाची प्रतिमा चांगली झाली आहे. ती अधिक प्रभावी होण्यासाठी एक प्रस्ताव मी आपल्या चर्चेसाठी ठेवीत आहे.

प्रस्ताव : जळगावात एक जनता महाविद्यालय स्थापन करणे.

सूर्यकान्त माळी म्हणाले, ''अगोदर ५/६ कॉलेजे आहेत. सीटा खाली जातात.

सीताराम जोशी म्हणाले, सुरुवातीला नेहमीची कॉलेजे व जनता महाविद्यालय यातला फरक आपण समजून घ्यायला हवा. तो असा की, जनता महाविद्यालय ही कल्पना अमेरिकेतल्या कम्युनिटी कॉलेज यातून आली आहे. ती अशी : या जनता महाविद्यालयात कौशल्यविकास करण्याची संधी कमी फीमध्ये तरुणांपासून वयस्कर लोकांना मिळेल. सर्व प्रकारच्या शाखा असतील. त्या त्या शाखेतील नवीन तंत्र शिकता येईल. नोकरी करून हे शिक्षण घेता येईल. स्त्रियांसाठी टेलरिंग, फॅशन डिझाइनिंग, कुकिंग इत्यादी प्रकार असतील.

महंमद जाफरी म्हणाले, लेकिन मुसलमानोंको कुछ खास सुविधा है क्या?

सीतारामने उत्तर दिले, आहे. सर्वेक्षण घेऊन त्यांना काय हवे ते उपलब्ध करता येईल. कालच मी गाद्या करायच्या एका दुकानात गेलो. तिथे आतल्या खोलीत मुसलमान भगिनी कापूस पिंजणे, गाद्यांसाठी कापड शिवणे ही कामे करीत होत्या. तिथल्या सदोष वातावरणात काही स्त्रियांना दम्याचा विकार झाला. अशा स्त्रियांना आधुनिक तंत्र शिकवता येईल आणि तेही चांगल्या वातावरणात.

जगन्नाथ भिरूड म्हणाले, पण शिक्षक आणि त्यांचा पगार? आर्थिक बाजूचा विचार केला का?

नथूभाऊ म्हणाले, चांगला प्रश्न. जगू, मी जळगावातल्या ज्येष्ठ नागरिक संघांना भेटलो. त्यांच्याशी चर्चा केल्यावर मला कळले की

पुष्कळ लोक निवृत्त झाल्यावर इथे स्थायिक व्हायला आले आहेत. इथे राहून ते गावच्या शेतीकडे लक्ष देऊ शकतात. त्यांना वेळ घालवायला शेतीकडे लक्ष देणे पुरेसे नाही. ते वेगवेगळ्या क्षेत्रात अनुभवी आहेत. असे लोक आपल्याला स्टाफ म्हणून मिळतील. त्यांची पगाराची अपेक्षाही विशेष नसेल. फीमधून व देणग्या मिळवून आर्थिक व्यवहार कसाबसा जमेल. नवीनच प्रयत्न आहे. खात्री देता येत नाही. पण एक चांगले कार्यक्षेत्र आपल्याला मिळेल असे वाटते.

मी म्हणाले, जनता महाविद्यालयाचे चित्र माझ्या मनात मी रंगविले आहे. उन्हाळ्यात दोन महिन्यांच्या सुटीत मुलेमुली कंटाळतात. त्यांना म्युझिक, डान्स, चित्रकला, संगणक ज्ञान, योग, ध्यान इत्यादीसाठी उपक्रम घेता येतील.

सूर्यकान्त माळी म्हणाले, नाटक, फिल्म यात ॲक्टिंगचापण कोर्स काढा. जय मल्हार मालिकेमध्ये काम करणारी जळगावातील नटी प्रसिद्ध आहे. ती नक्की मार्गदर्शन करेल. प्राजक्ता माळी ही तर माझ्या मित्राच्या ओळखीची. तीही येईल.

दगडू काळे म्हणाला, नट्या आल्या की गर्दी झालीच समजा. पण काळजी नको. मी कंट्रोल करायला समर्थ आहे. माझी मल्हार गँग सदैव तयार ठेवीन. गंभीर चर्चेत हसण्याचा शिरकाव झाला.

सुखराम तावडे म्हणाला, दलित वस्तीजवळ ही संस्था पाहिजे. आमच्या लोकांना रिक्षानं जानं परवडायचं नाही.

सोनाली आठल्ये म्हणाली, जागा कुठे मिळेल त्यावर आपला निर्णय अवलंबून राहील. बोला. जागेचं काय?

तुकाराम वाणी म्हणाले, सरकारी हॉस्टेलजवळच्या म्युनिसिपालटीची शाळा रिकामीच असते. वरचे दोन मजले भाड्याने घ्या.

बाबा म्हणाले, अगदी बरोबर. मी तसा अर्ज लिहूनच आणला आहे. दुसरी जागा परवडणारी नाही. स्वतःची बिल्डिंग बांधायचे पुढे बघू.

रामजी सोनार म्हणाले, भाऊ, तो अर्ज आताच पाठवा. भिंतीला कान असतात. तुम्हांला शामराव पाटीलच नेहमी आड येतात. मांजर आड येते तशी. तो खासदार आणि त्याचं गुटुरगू मध्येमध्ये चालूच असतं. मुलांकडून तो सगळं वाईट करून घेतो. स्वतः नामानिराळा राहतो.

मी म्हणाले, बाबा, द्या तो अर्ज. आम्ही आताच जातो व नगरपालिका कार्यालयात देऊन येतो. हे कॉलेज होणं माझं स्वप्न आहे.

मी बाबांकडून अर्ज घेतला व आम्ही पाच जणी निघालो. त्याच दिवशी चार वाजता केतन पाटीलने नगरपालिकेची शाळा भाड्याने देण्यास हरकतीचा अर्ज दिला. खासदार सुभाष लोमटे यांच्या सांगण्यावरून शामराव पाटीलने हे आडकाठी घालण्याचे काम केले होते. खासदारच स्वतंत्र पार्टीच्या नगरसेवकांतर्फे आमचे काम बिघडवणार म्हटल्यावर मला राग आला व माझे मन जखमी झाले.

फातिमा म्हणाली, शबीर संभाल लेगा। उसकी पहचान है। तिने शबीरला फोन केला. कार्यालय बंद होण्याच्या आतच शबीरचा फोन आला. काम हो गया है। दो साल पहलेके रिझॉल्यूशनकी कॉपी मिल गयी। वो स्कूल भाडेपे देनेका तय हुआ था। Now no problem.

शबीरचे तातडीचे सहकार्य माझ्या विद्ध मनाला संजीवनीसारखे वाटले. संकट आले होते ते टळले. जळगावात आमदार नथूभाऊ यांची लोकप्रियता वाढणार होती. समाजसेवेच्या माझ्या स्वप्नातून गंगोत्रीप्रमाणे ही यमुनोत्रीही उगम पावणार. माझ्या बाबांच्या राजकीय जीवनात मला योगदान देता येत होते याचा मला आनंद झाला.

दिवाळीच्या सुटीत आही पाच मैत्रिणींनी ही नवीन संस्था स्थापण्यासाठी भरपूर काम केलं. जनता महाविद्यालय समितीचे अध्यक्ष म्हणजेच माझे बाबा, सीताराम जोशी उपाध्यक्ष आणि जगन्नाथ भिरूड सदस्य यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आम्ही स्टाफ मिळविणे, जाहिरात करणे, नियमावली तयार करणे, बँक खाते उघडणे, देणग्यांसाठी प्रयत्न

करणे, शाळेची इमारत स्वच्छ करून घेऊन फळे, बाकडे, कार्यालयाची व्यवस्था, एक ना दोन अनेक प्रकारच्या कामांमध्ये गर्क होतो. संस्थेसाठी किती लहानमोठी कामे असतात ते पुन्हा एकदा पण अधिक तीव्रतेने मला जाणवले.

* * *

# १९

१५ नोव्हेंबर २०१७ या दिवशीचा प्रसंग आठवतो.

जनता महाविद्यालयाच्या उद्घाटन समारंभाचे निमंत्रण खासदार सुभाष लोमटे यांना स्वतः माझ्या बाबांनी दिलेले होते. पण बाबांच्या इच्छेप्रमाणे आम्ही पाच जणी खासदारांना आदल्या दिवशी भेटायला गेलो. त्यांना आमच्या नवीन उपक्रमाची माहिती सविस्तर देणे बाबांना आवश्यक वाटले. आम्ही खासदारांच्या कोल्हेनगरमधील बंगल्याजवळ आल्यावर फातिमा म्हणाली, कोल्हेनगर हा जळगावातील अतिशय स्वच्छ व टापटीप भाग आहे हे आपल्याला माहीत नव्हते. किती सुंदर रस्ते, कडेला लहान वृक्ष, अत्याधुनिक बंगले.

मी म्हणाले, श्रीमंत लोकांची वस्ती आहे.

सायली म्हणाली, आमच्या गावच्या घराची केविलवाणी दशा आठवल्याने आमच्यावरील दुर्दैवाचा आघात अशा वेळी जाणवतो.

लता म्हणाली, दोन मिनिटे थांबा. रावसाहेब लोमटे स्वभावाने कसे आहेत, आपण काय बोलायचे? याचा विचार करू या.

मी म्हणाले, अगं, माझ्या बाबांचे ते वर्गमित्र होते, खेळांमध्ये पुढाकार घ्यायचे. मुलांना आपल्या धाकात ठेवायचे. आपुलकी मात्र नसे.

आभा म्हणाली, आणि अभ्यासात?

मी म्हणाले, मागे. जेमतेम पास व्हायचे. आपणच त्यांना त्यांच्या प्रगतीबद्दल विचारू.

रावसाहेबांच्या दिवाणखान्यात आम्ही बसलो तेव्हा ते तिथे नव्हते. नोकर म्हणाला, बसा. मी साहेबांना तुम्ही आल्याचे सांगतो.

दिवाणखान्यात काही फोटो होते, जसे, खासदार सुभाष लोमटे यांचा संसद सभागृहात त्यांनी शपथ घेत असतानाचा फोटो, पंतप्रधानांबरोबरचा फोटो तसेच जळगावला नागरी सत्कार प्रसंगीचा फोटो आम्ही या फोटोंचे निरीक्षण करीत बसलो.

सुभाष लोमटे साहेब आले तेव्हा आम्ही उभे राहून त्यांना नमस्कार केला.

ते म्हणाले, बसा. पाच मुली आम्हांला भेटायला? आणि ही योगिता आमच्या मित्राची मुलगी. सध्या खूप लोकप्रिय झाली आहे. बाळ, बोल, काय काम आहे?

मी म्हणाले, काम म्हणजे उद्याच्या कार्यक्रमास आपण नक्की यावे हे सांगायला आम्ही आलो आहोत.

लोमटे साहेब म्हणाले, ते तर ठरलेले आहेच. पण तुम्ही आणखी काहीतरी कामासाठी आल्या असणार. सांगा. संकोच करू नका.

मी म्हणाले, ह्या माझ्या मैत्रिणी– आभा, सायली, लता, आणि ही फातिमा. यांना आपल्या राजकीय प्रगतीच्या चढत्या आलेखाबद्दल जाणून घ्यायचे आहे.

खासदार म्हणाले, छान.

आभा म्हणाली, साहेब, तुमचे विद्यार्थीजीवन कसे होते?

खासदार म्हणाले, विशेष काही नाही. कसातरी पास होत गेलो. बी.कॉम. झालो. नोकरी नव्हती. मी मुंबईला गेलो आणि एल.आय.सी. एजंट झालो. माझी पत्नी शाळेत शिक्षिका, म्हणून एक पगार निश्चित. माझं कामात लक्ष लागत नव्हतं. पण ठीक चाललं होतं.

सायलीने विचारले, मग तुम्हाला ब्रेक कुठे आणि कसा मिळाला?

ते म्हणाले, ती एक गमतीशीर गोष्ट आहे. एजंट असताना माझी मंत्रालयातील एका अधिकाऱ्याशी ओळख झाली. त्यांनी तेथील इतरांची ओळख करून दिली. मी निरीक्षण केले की तिथे जळगावचे

काही व्यापारी त्यांच्या कामासाठी येत असत. एकदा त्यांच्याशी बोलताना एक व्यापारी म्हणाला, आम्हाला इथे जळगावहून येणे त्रासदायक असते. एका फेरीत काम होत नाही. तुम्ही इथे नेहमी येत असता. आमची कामे करीत जा. आम्ही तुम्हाला मोबदला देऊ. बस. तिथे मला ब्रेक मिळाला. दिवसभर मी मंत्रालयात जळगावच्या व्यापाऱ्यांच्या कामाचा पाठपुरावा करीत असे.

वरिष्ठ अधिकारी व मंत्री यांच्या ओळखी झाल्या. कायद्याच्या चौकटीतच काम व्हायचे. फक्त कमी वेळात होत असे. जळगावच्या व्यापाऱ्यांचा मी म्होरक्याच बनलो. त्यांची स्वतंत्र पार्टी. मी त्यांच्या पार्टीचीपण कामे मुंबईत केली. मग एल.आय.सी. एजंटचे काम सोडले. बऱ्यापैकी श्रीमंत झालो.

लताने विचारले, पण राजकारणात का शिरलात?

खासदार म्हणाले, तुझ्या प्रश्नाने मला माझ्या मानसिक प्रक्रियेची आठवण झाली. विद्यार्थी, एल.आय.सी. एजंट, आईवडिलांची माझ्याबद्दल चांगल्या उत्पन्नाची निराशा या सर्व बाबतीत मी अपयशी होतो. निराश होतो. Failure became my way of life. त्यामुळे मी स्वतःवरच रागावलो. माझ्यातील गुणांची कुणाला कदर नाही. जीवनात मला संधी मिळत नाही. त्यामुळे माझे मन बंड करून उठले.

मी म्हणाले, म्हणजे तुम्ही बदललात.

ते म्हणाले, त्या मानसिक क्लेशांमुळे, बंडामुळे मी ठरवले की मुसंडी मारून यश मिळवायचेच. आणि एके दिवशी जळगावच्या व्यापारी संघाने मला स्वतंत्र पार्टीची आमदारकी आणि नंतर खासदारकी मिळवून दिली. मीसुद्धा मुंबईला व दिल्लीला त्यांच्यासाठी काम केले. त्यांची मर्जी माझ्यावर बसली.

आभाने विचारले, पण एवढे मोठे पद मिळविण्यासाठी एखादा व्यापारीच का पुढे आला नाही?

ते म्हणाले, तसा दोघा तिघांनी प्रयत्न केला. पण मी वरिष्ठ पातळीवर बळकट केलेले नाते, संबंध माझ्या कामी आले.

मी म्हणाले, काका, तुमचं खरंच अभिनंदन! उद्योगाचे स्वरूप कसे असू शकते ते तुमच्या उदाहरणावरून समजले. बरं, काका, आमच्या जनता महाविद्यालयाच्या उद्योगाबद्दल तुमचे काय मत आहे.

ते म्हणाले, फारच छान कल्पना आहे. तू तुझ्या वडिलांचे पंख बळकट करीत आहेस.

मी म्हणाले, जनसेवा, विशेषतः गरजू लोकांना मदत होईल असे वाटते.

ते म्हणाले, मी व्यापारी वर्गाची सेवा केली. त्यांच्या गरजा वेगळ्या होत्या. तुमचा ज्ञानदानाचा मार्ग आहे. तुम्हांला शुभेच्छा!

आम्ही खासदारांच्या बंगल्यातून बाहेर पडलो ते त्यांच्या भूतकाळातील जीवन प्रवासामुळे भारावूनच. अर्थात, त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत इतरही आहेत, ह्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूमुळे मी गोंधळले होते.

* * *

# २०

१६ नोव्हेंबर २०१७ माझ्या स्वप्नपूर्तीचा दिवस. सकाळी १० वाजता जनता महाविद्यालयाचा उद्घाटन समारंभ होता. मी माझ्या आवडीची मोरपिशी सिल्क साडी व मॅचिंग ब्लाऊज घालून, मोगऱ्याच्या फुलांचा गजरा केसांत माळून तयार झाले. आभा तिच्या गुलाबी साडीत सुंदर दिसत होती. तिच्या गोऱ्या रंगावर साडी, ब्लाऊजच्या गुलाबी रंगाची छटा आकर्षक दिसत होती. सायलीने तिच्या बॉबकटला शोभेल असा पोशाख निळे जिन्स, पांढरा टॉप व जॅकेट घातला होता. लताला मी माझी हिरवी साडी व ब्लाऊज दिले होते. फातिमा सलवार कुर्ता व दुपट्टा यात मादक दिसत होती. आम्हां पाचही जणींना सजलेल्या पाहून बाबा आईला म्हणाले, यांची दृष्ट काढा.

आई त्यांना म्हणाली, ह्या नवीन ऑफव्हाइट सुटात तुम्हीपण देखणे दिसत आहात.

आभा म्हणाली, आणि आई? वा छान. मला तुमची पैठणी आवडली.

बाबा म्हणाले, अहो रूपम, अहो ध्वनी. एकमेकांची तारीफ आपण करीत आहोत. फातिमा, बेटा हा स्प्रे घे. हो, आणि रात्रीच्या करमणुकीच्या कार्यक्रमासाठी उत्साह शिल्लक ठेवा.

नगरपालिका शाळेच्या आवारातील फुलांनी शोभिवंत रंगमंच, जनता पार्टीचे राज्य अध्यक्ष नितीन जाधव, त्यांच्या एका बाजूस बाबा व दुसऱ्या बाजूस गुरुदेव आत्मानंद महाराज, त्यांच्याजवळ खासदार सुभाष लोमटे, त्यांच्या मागे खुर्च्यांवर बाबांचे सहकारी, सूत्रधार फातिमा आणि चार पाचशे श्रोते यांना बघून मी धन्य झाले.

फातिमाने सुरुवात केली, आज मंचावर मागे बसलेले भाऊंचे सहकारी आणि आम्ही पाच मैत्रिणी यांची सभा दोन महिन्यांपूर्वी नथूभाऊंच्या अध्यक्षतेखाली गोलानी मार्केटमधील भाऊसाहेबांच्या कार्यालयात झाली होती. त्या वेळी जनता महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. आज ते स्वप्न साकारले आहे. जनता महाविद्यालय म्हणजेच अमेरिकेत असते तसे कम्युनिटी कॉलेज जळगावात सुरू होत आहे.

स्टाफ नेमण्याच्या वेळचा एक प्रसंग सांगते व भाऊसाहेबांना स्वागतपर भाषण करायची विनंती करते.

कॉलेज समिती मुलाखती घेत होती. मी मध्येच काही कामासाठी आत गेले व मुलाखतीसाठी आलेले मोतीचंद सुराणा भावुक झालेले बघून मी थांबले. भाऊंनी मला इशारा करून थांबायला सांगितले म्हणून मी ऐकले. सुराणा म्हणाले, माझी बायको गेल्या वर्षी देवाघरी गेली. मुलगा मुंबईला राहतो. वांद्र्याच्या हील रोडवर त्याचा फ्लॅट आहे. मला त्या वातावरणात करमत नाही. म्हणून मी जळगावलाच राहतो. बायकोची आठवण, तिच्या पुस्तकांच्या आवडीमुळे असलेली

पुस्तके व एकाकीपण यामुळे खिन्न झालो. वेडापिसा झालो. वेळ जात नाही. पुस्तके वाचण्यात मला रस नाही. अशा वेळी जनता महाविद्यालयासाठी शिक्षक पाहिजे असल्याची जाहिरात मी वाचली. वयाची अट नव्हती. इलेक्ट्रिशिअनचा अनुभव गाठीशी होता. म्हणून इलेक्ट्रिशिअन इन्स्ट्रक्टर या पदासाठी माझी नेमणूक होत आहे. माझे ज्ञान मी बेरोजगारांना देऊन त्यांना सबळ करीन. असे म्हणून सुराणा रडले.

श्रोतेहो, जनता महाविद्यालयाच्या सुरुवातीलाच सुराणासरांचे आसू म्हणजे एक अभिषेकच आहे. ते आसू पुसायला आम्ही सज्ज आहोत.

आता मी माननीय नथूभाऊंना स्वागतपर भाषण करायची विनंती करते.

बाबांनी भाषणात जनता महाविद्यालय म्हणजे जीवनातील बेकारी, अडचणी, अगतिकता, अडाणीपणा, तंत्रज्ञानाचा गरिबांना अभाव यांच्यामुळे आलेल्या उमाळ्याची यमुनोत्री असे वर्णन केले. आपत्कालीन सेवेची गंगोत्री कार्यरत आहेच. आता व्यावसायिक प्रशिक्षण, कलाव्यासंगाची पूर्ती, योग आणि ध्यान यांचे शिक्षण या सर्वांची यमुनोत्री आली आहे. गंगा यमुनेच्या ह्या संगमात आपले मन, बुद्धी यांना पवित्र करण्याचा योग आला आहे. म्हणून साधनशुचिता आम्ही जपली आहे. इतर सर्व वक्त्यांनी जनता महाविद्यालयामागील प्रेरणा, त्यासाठी घेण्यात आलेले परिश्रम व जनतेला त्याद्वारे मिळालेले वरदान यावर भाषणे केली.

केतन पाटील पुढच्या रांगेत बसला होता. त्याचा चेहरा निराशा, मत्सर, आमच्या यशाच्या प्रचंड ओझ्याखाली दबलेली असहायता यांनी काळानिळा झाला होता.

त्याचे ते सैतानी रूप पाहून मला धडकी भरली. तो नक्की कटकारस्थान करणार असे मला वाटले. रंगमंचावर बसलेले खासदार सुभाष लोमटे आणि केतन यांनी एकमेकांकडे पाहिले तेही मी टिपले. खासदारांच्या मनातील असूया त्यांच्या नजरेतून केतनला खुणावत

होती. यश मिळूनसुद्धा मी हरले होते. कपटाने असीरगड बळकावणाऱ्या नसीर खानाची मूर्ती खासदाराच्या जागी मला दिसली.

* * *

# २१

जळगावच्या भव्य सागर पार्क मैदानावर लांबरुंद रंगमंच फुलांच्या माळांनी शोभिवंत दिसत होता. कृष्णपक्षातील चतुर्थीचा चंद्र व शुक्रतारा आकाशाच्या रंगमंचावर पुढे आणि तारका मागे असे दृश्य नजरेस पडून अप्रतिम सौंदर्याचे सुखावह दर्शन सागर पार्कवर बसलेल्या प्रेक्षकांच्या उत्साहात भर घालीत होते. गुलाबी थंडी वातावरणातील सौंदर्याची जाणीव करून देत होती. प्रेक्षकांनी ऋतुमानाप्रमाणे निरनिराळ्या रंगांचे लोकरीचे स्वेटर, शाली, टोप्या घातल्यामुळे रोषणाईची मजा वाढली होती. दिवसभर रस्तोरस्ती लोकरीचे कपडे विकणाऱ्या नेपाळी लोकांची कमाई चांगली झाली असल्याचे त्यावरून स्पष्ट होत होते.

योगिनी रंगमंचावर येताच टाळ्यांचा गजर झाला. तिने स्वागतपर बोलण्यास सुरुवात केली. गुरुदेव आत्मानंद महाराज, खासदार सुभाष लोमटे, माझे बाबा नथूभाऊ राणे, जळगावचे महापौर आणि इतर मान्यवर या सर्वांना नमस्कार. प्रेक्षक बंधू-भगिनींना, मातांना नमस्कार. आजचा हा प्रबोधन व करमणुकीचा कार्यक्रम सादर करताना आम्हा आयोजकांना आनंद होत आहे. गुरुदेव स्वतः आज ह्या कार्यक्रमाला आशीर्वाद देण्यासाठी आले आहेत. आत्मानंद आश्रम आणि जनता महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आम्ही सादर करीत आहोत. गणेशवंदना करून कार्यक्रम सुरू होत आहे. माझ्या मैत्रिणी आभा, सायली आणि लता गणेशवंदना गातील.

गणेशवंदना झाल्यावर सागर पार्कमधील सुमारे दोन हजार प्रेक्षकांनी टाळ्या वाजविल्या. मग मी पुढच्या कार्यक्रमाची घोषणा केली.

आता आत्मानंद आश्रमात शिकून जीवनात यशस्वी झालेली मुलेमुली अर्थात आत्ताची तरुण मंडळी त्यांचे आश्रमातील शाळांचे अनुभव सांगतील. त्यांनी कृपया मंचावर यावे. लक्ष द्या, ही मुलेमुली लहानशा खेड्यांमधील आदिवासी कुटुंबातील आहेत. ठाकूर विवेक, दळवी गायत्री, खाडे माधवी, भोये भावेश, धनगर चेतन, गांगोडे शारदा यांपैकी प्रथम बोलतील ठाकूर विवेक.

विवेक बोलायला उभे राहिले पण भावनावश झाल्याने ते स्तब्ध राहिले. त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. प्रेक्षकांना तो धक्कादायक प्रसंग बघून सहानुभूती वाटली. अश्रू पुसून विवेक म्हणाले, ''माफ करा, आत्मानंद आश्रम शाळेची बस मला घेण्याकरिता आमच्या हिरापूर खेड्यावर आली तेव्हाचा प्रसंग आठवला आणि अश्रू अनावर झाले. मी सरकारी शिष्यवृत्तीची परीक्षा पास झाल्यावर मला ह्या शाळेत तिसरीत प्रवेश मिळाला. आईवडील मला बसजवळ घेऊन आले, पण मी आईला मिठी मारली व म्हटले, 'नाय, मी नाय जात. तुह्या जोय राहातो. काम करीन. बाबासंग डोंगरातबी जाईन!! टाहो फोडून रडलो. पण मला घ्यायला आलेल्या सरांनी मला कडेवर घेतले. माझे अश्रू पुसले व म्हणाले, ''तुला आईबाबांचे प्रेम मिळेल, चांगले शिक्षण मिळेल. मी वचन देतो. शांत हो.'' आईबाबांनीपण माझे सांत्वन केले व मी बसमध्ये बसलो. अश्रूंच्या शाईने तो प्रसंग मी मनाच्या पाटीवर कायमचा लिहिला.

शाळेत हॉस्टेलमध्ये सरांनी मला माझ्या खोलीत नेले. मला आठवते चव्हाण सरांनीच माझी बॅग खोलीत नेली. झोपडीतून मी हॉस्टेलमध्ये आलो होतो. मला स्वतःचे बेड, बॅग ठेवायला फळी, टेबल खुर्ची हे सर्व बघून आश्चर्य वाटले. चव्हाण सरांनी बाहेर जाऊन दुसऱ्या एका मुलाला आणले. तो माझा रूम मेट, पार्टनर. आम्हा दोघांना आवश्यक त्या सूचना दिल्या व ७ वाजता भोजनगृहात जेवायला यायला सांगितले.

चव्हाण सरांनी इंग्रजीची मुळाक्षरे शिकवली. मालती मॅडमनी गणित शिकविले. चौधरी सरांनी इतर विषय शिकविले.

खेळायला मोठे मैदान होते. घरची आठवण यायची. जेवताना कसे बसायचे, कसे जेवायचे ते तिथले गुरुजी सांगत. स्वच्छता कशी ठेवायची ते चव्हाण सर सांगत.

दुसऱ्याच दिवशी गुरुदेवांसमोर आम्ही बसलो असतानाचा प्रसंग अविस्मरणीय आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने मनाची पकड घेतली. त्यांच्या बोलण्यातील मार्दव आईच्या ममतेची आठवण करून देत होते. त्यांनी ध्यान करण्याविषयी सल्ला दिला. ध्यानामुळे अभ्यासाला व मनःशांतीला होणारे फायदे सांगितले.

एक टर्म संपली. दिवाळीची सुटी लागली. माझे आईबाबा मला घरी न्यायला आले. मी बाबांना म्हणालो, तुम्ही मटण खाता, दारू पिता. आधी ते सोडा नाहीतर मी घरी येत नाही. इथेच राहतो.

माझ्यावरील झालेले संस्कार व माझ्यातील बदल पाहून आईने मला कवटाळले. ती म्हणाली, माझं लेकरू शहानं झालं. तुम्हाले एवढंबी त्याच्यासाठी करता येत नी का?

माझे बाबा म्हणाले, ठीक आहे, मास खानं सोळीन, दारूबी सोळीन, चाल घरी.

वर्षामागून वर्ष गेली, शिष्यवृत्ती मिळाली. बक्षिसं मिळाली. १०वी, १२वी, बी.एस्सी. झालो. महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेत पास झालो. आणि आता डेप्युटी कलेक्टर म्हणून नोकरी मिळाली. आश्रमात लागलेली ध्यानाची सवय माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे माझ्याकडून लोकसेवा घडणार व त्यासाठी आत्मानंद आश्रमाचे संस्कार कारणीभूत आहेत. शाळेतील, जीवनातील अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. शिक्षकांचे प्रेम, शिस्त व अभ्यासास उत्तेजन विशेष होते. धन्यवाद!

मग मी गायत्रीस बोलण्यास सांगितले.

गायत्री म्हणाली, मी रावेर तालुक्यातील भोकरी गावची. पण माझे आईवडील ऊसतोड करणारे कामगार. मला फैजपूर साखर कारखान्याजवळच्या कामगार वस्तीत बस घ्यायला आली होती तेव्हा माझे कपडे फाटलेले होते. माझे पूर्ण जीवन खराब होते. अर्थात बसमध्ये आईने मला बसवले तेव्हा मी खूप रडले. माझ्याच वयाची १५–२० मुलेमुली तिसरीसाठी शाळेत येणार म्हणून बसली होती. सगळेजण रडत होते. मला वाचता येत नव्हते. भिती वाटत होती. पण टीचर सुधा जोशींनी मला समजावले. प्रेमळ वागणूक दिली. चांगले शिकविले. ऊसतोड कामगाराच्या झोपडीतून मी इंटरनॅशनल स्कूलच्या हॉस्टेलमध्ये आले. युनिफॉर्ममधील शिस्तीने वागणाऱ्या मुलामुलींमध्ये वावरताना झालेल्या बदलाने देवाचे, गुरुदेवांचे व सुधा टीचरचे मी आभार मानते. ध्यान करायची सवय लागली. हृदयातील परमेश्वराची जाणीव घेण्याचा प्रयत्न करू लागले. मी १०वीत असताना हॉस्टेलमध्ये माझे बाबा व तीन पाहुणे आले होते. बाबा म्हणाले हा मुलगा व त्याचे आईवडील तुले पाहायले आले आहेत. तुह्य लग्न कऱ्याचं आहे.

मी म्हणाले, मला नाही करायचे लग्नं. मला खूप शिकायचे आहे.

माझे शुद्ध बोलणे, आधुनिक कपडे व आत्मविश्वास बघून तो मुलगाच आईच्या मागे लपला व म्हणाला, आईबाबा चला, हे स्थळ आपल्याला भारी पडेल. सुधा टीचरने त्या वेळी मला मिठीत घेतले. त्या म्हणाल्या, 'गायत्रीच्या लग्नाचा विषय बंद करा. ती शिकणार आहे, डॉक्टर होणार आहे.'

आणि खरोखरच मी डॉक्टर झाले. आयुर्वेदिक. आत्मानंद आश्रमाच्या हॉस्पिटलमध्ये मी डॉक्टर आहे. सरकारी योजना, आश्रमशाळा, शिक्षक व गुरुदेव यांच्या मदतीने व माझ्या प्रयत्नांनी मी डॉक्टर झाले. मुलामुलींनो, तुम्हीपण स्वतःचे भविष्य घडवू शकता.

माधवी खाडे म्हणाली, माझी कहाणी अशीच आहे. रडण्याकडून हसण्यापर्यंतचा प्रवास आहे.

भावेश भोयेने तो कसा रडला होता. बसमधून उतरून आईला घरी चल म्हणत होता याचा अभिनयच केला. चेतन धनगरने शेळ्यामेंढ्या रानात हाकायची, हूर, हूर, च्य,च्य, हिकडे हिकडे असे म्हणत काठीचा आवाज करीत सुरुवात केली व I am now lecturer in English असे म्हणून शेवट केला.

शारदा गांगोडेने टीचर सुधा जोशींची शिकवतात कशा त्याची नक्कल केली व मी आता बी.एड. कॉलेजमध्ये प्राध्यापिका असल्याचे दिमाखाने सांगितले. पण लगेच नम्रपणे रंगमंचावरून खाली उतरून टीचर सुधा जोशी व गुरुदेव यांच्या पायावर डोके ठेवले.

मी निवेदन केले : आता ऐका अर्जुन आणि गंगूच्या लग्नाची गोष्ट.

अर्जुन : माह्या बापा गरीब आहे. माहे लगन कऱ्याले त्याच्याजोय पैसे नाही होते. मी शेतमजूर. पन आम्हांले कयलं की आत्मानंद आसरमात फुकट लगन करी देता. म्हनून आम्हुनं तढी लगन केलं.

गंगू म्हणाली, मले आठोयत. आसरमात शंभरच्यावर जोळपे व्हते. त्याहिच्यात आम्हु. याहिचे व माहे जोयचे नातेमानसं व्हते. केव्हळा समारंभ! माय, माय! सर्व्या जोळप्यांची लगनं एकाचवेळी. वाजा, जेवनं आणि खूप मोठा मांडोय. सगळं अचंब्याचं.

मीन लानपनापासून लगन पाहेलं आहे. लालगंद म्हनजे साखरपुडा, हुंडा, बैठका, मानपान, न्हायाचं, वरमायचं, खळख्यांब्य म्हनजे फगत चहा-पानी जेवन नाही. असे परकार. अन आसरमातला तो सामायिक लगनाइचा मोठा सोहळा. खर्चाबीना लगन. गुरूदेवांची किरपा.

प्रत्येक वक्त्याच्या बोलण्यानंतर टाळ्यांचा कडकडाट होत होता. त्यानंतर आदिवासी नृत्य व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे योगाचे प्रात्यक्षिक झाले.

नंतर मी निवेदन केले, मला खात्री आहे आजचा कार्यक्रम बघून आपण प्रेरित व्हाल व आपल्या मुलामुलींना गुरुदेवांच्या आश्रम शाळेत पाठवाल. आता आजचा शेवटचा कार्यक्रम जनता

महाविद्यालयातर्फे सादर करीत आहोत. जळगावात व्यवसाय-शिक्षण, कौशल्य, आयुष्याची रुळांवरून घसरलेली गाडी पुन्हा रुळांवर आणण्यास मदत करणारी संस्था म्हणजे जनता महाविद्यालय. आपल्याला दिलेल्या पत्रकात सर्व माहिती दिली आहे. नीट वाचा. जनता महाविद्यालयात शिक्षण घ्या. अमेरिकेत कम्युनिटी कॉलेज असते त्याची प्रतिकृती म्हणजे जळगावातले जनता महाविद्यालय. तुमच्यासाठी, तुमच्या जीवनाची बाग फुलाफळांनी बहरावी यासाठी.

मी निवेदन केले, आपणापैकी बऱ्याच लोकांना प्रश्न पडतो की स्वयंरोजगारासाठी भांडवल मिळवायचे कसे. सध्या बँका भांडवल पुरवतातच. पण महाराष्ट्र व्यवसाय मार्गदर्शन केंद्र या संस्थेचे संस्थापक व त्यांसंबंधीची अनेक उच्चपदे भूषविणारे बाळ सडवेलकर यांनी त्यांचे पुस्तक 'युग नव्या व्यवसायांचे, घडवा शिल्प जीवनाचे' यात एक लोककथा लिहिली आहे. त्या लोककथेचे नाट्यरूपांतर सादर करीत आहे-

आकाशातून शंकरदेव आणि पार्वती भ्रमण करीत आहेत.

पार्वतीमाई म्हणाल्या, तो बघा एक धट्टाकट्टा तरुण भरदिवसा झाडाखाली आराम करीत आहे. त्याची काय समस्या आहे ते आपण जाणून घेऊ व त्याला काही मदत करता आल्यास बघू.

शंकरदेव आणि पार्वतीमाई वेषांतर करून त्या तरुणासमोर अवतीर्ण होतात. शंकरदेवांनी त्याला विचारलं, धडधाकट शरीरसंपदा असताना आराम करून वेळ का दवडतो आहेस? तो तरुण म्हणाला, काय करणार. मला स्वयंरोजगार करायची इच्छा आहे, परंतु माझ्याकडे अजिबात भांडवल नसल्यामुळे मी काहीच करू शकत नाही. शंकरदेव म्हणाले, तुला किती पैशांची गरज आहे? तो तरुण म्हणाला, किमान पन्नास हजार रुपये. देवांनी सांगितलं, तू तुझा डावा पाय कापून मला दे, मी तुला याच ठिकाणी पन्नास हजार रुपये देतो. तो तरुण म्हणाला, हे कसं शक्य आहे? उद्योगधंद्यासाठी धावपळ करायला मला माझे दोन्ही पाय शाबूत हवेतच ना?

देव, ठीक आहे, तुझा डावा कान दे. तुला पन्नास हजार रुपये देतो.

तरुण, नाही.

देव, उजवा कान दे आणि पन्नास हजार घे.

देव, कान नाही देत तर एक डोळा दे व पन्नास हजार घे.

तरुण, नाही.

देव, मग तो दुसरा डोळा दे. पन्नास हजार देतो.

तरुण, नाही मी डोळे देऊ शकत नाही.

देव, हात देतोस, दोन्ही हातांचे दोन लाख देतो.

तरुण, मग मी काय कामे करू? नाही देणार हात.

देव, तीन दात देतोस, प्रत्येकी ५० हजार घे.

तरुण, नाही.

पार्वतीमाई म्हणाल्या, अरे वेड्या आता या घटकेला बघ किती लाख रुपये आहेत.

देव, बेरीज केली तर साडेपाच लाख होतील. आणि तू म्हणतोस तुझ्याजवळ भांडवल नाही. माणसाचं डोकं आणि दोन हात हेच भांडवल.

तरुण, देवा खरंच. मी विसरलोच होतो. बुद्धिमत्ता आणि परिश्रम हेच खरं भांडवल. मला आता स्वयंरोजगारासाठी स्फूर्ती आली आहे.

प्रेक्षकांच्या टाळ्यांनी सागर पार्क दणाणला. मी निवेदन चालू ठेवले, प्रेक्षकहो ह्या नाट्यातील पात्रांचा परिचय असा आहे, बेरोजगार तरुण– शबीर, शंकर देव– शुभम लेले आणि पार्वतीमाई– आभा.

मी कार्यक्रम संपल्याचे जाहीर करणार तेवढ्यात मला एक चिठ्ठी कुणीतरी आणून दिली, त्यात लिहिले होते, खासदार सुभाष लोमटे यांना बोलायचे आहे. मी प्रेक्षकांना उद्देशून म्हणाले, आपले आवडते खासदार श्री. सुभाष लोमटे यांना काही सांगायचे आहे. मी त्यांना रंगमंचावर यायची विनंती करते.

खासदार साहेबांनी भाषण केले,

जळगावकर मंडळी, नमस्कार. आपण एवढ्या मोठ्या संख्येने हजर आहात मग माझ्यातला पुढारी भाषण करण्यावाचून कसा राहील? तर ऐका. आपल्या जळगाव शहराचा चेहरामोहरा बदलवण्यास, अनेक सुखसुविधा उपलब्ध करून देण्यास कोण कारणीभूत आहे? अर्थात इथला व्यापारी वर्ग. मी खात्रीने सांगतो की इथले व्यापारी सेवाभावी तर आहेतच, पण पदरमोड करण्यास नेहमी तयार असतात. जीवनावश्यक तसेच संपन्न राहणीसाठी हव्या त्या वस्तू या शहरात व्यापाऱ्यांनी आणल्या. रस्ते, शाळा, कॉलेजे, ग्रंथालय, रोटरी, लायन्स क्लब यांनी दिलेली मदत यामुळे समाजातल्या सर्वच थरांचा फायदा झाला आहे. सेवेची गंगोत्री व जनता महाविद्यालयाची सुविधा म्हणजे अलीकडे प्रसिद्धीसाठीचे उपक्रम. त्यांचे यश, अपयश अजून कळायचे आहे. मी पुन्हा खासदारपदाची निवडणूक लढवणार आहे. व्यापारीवर्गाचा खास पाठिंबा मला आहे. आपणा सर्वांची सेवा करण्याची संधी मला द्यावी ही विनंती. नमस्कार.

खासदार साहेबांचे भाषण आणि त्या प्रसंगी त्यांनी आमच्या उपक्रमांवर केलेली टीका यामुळे मी बेभान झाले. मी आवाज चढवून भाषण केले,

प्रेक्षकहो, थांबा. ऐका. आत्मानंद आश्रमाचे कार्य व आमचे गंगोत्री सेवेची आणि जनता महाविद्यालयाचे काम निःस्वार्थी व समाजहिताचे आहे. फसवणूक, भामटेगिरी, प्रतिष्ठा आणि सत्ता या वृत्तींनी समाजाला कीड लागली आहे. जुगार, दारू, भांडणे, धमकावणे यामुळे जळगावातील वातावरण दूषित झाले आहे. म्हणून गंगोत्री सेवेची, हे वातावरण शुद्धीसाठी. ह्या दुर्गुणांपासून सुटका अध्यात्माचा अंगीकार केल्याने होऊ शकते. ध्यानाद्वारे आत्मचिंतन हा त्यासाठी सुलभ मार्ग. आत्मानंद आश्रमाच्या आमच्या जळगाव शाखेत आता उपलब्ध आहे. मी राज्यशास्त्राची विद्यार्थिनी आहे. अलीकडेच माझ्या प्राध्यापकांनी सांगितले की राजकारणात असूनसुद्धा करुणामय,

काळजीपूर्वक विचार करून खूप सावधगिरीने व जबाबदारीने वागणारा, नवीन कल्पनांचा विचार करणारा, न्यायप्रिय व सहेतुक असू शकतो. त्यांनी अमेरिकेचे यादवी युद्धकाळातील अध्यक्ष ॲब्रॅहम लिंकन यांचे उदाहरण दिले. लिंकनसारखे पुढारी आपल्याला मिळावे अशी माझी इच्छा आहे. यासाठी आमचा हा खटाटोप आहे. नोकऱ्या गेल्याने, शिक्षणाकडे तरुण पिढीचे लक्ष नसल्याने बेरोजगारी, वाईट सवयींमुळे संसार उद्ध्वस्त होत आहेत. आज सत्ता हे संसार उभे करण्यासाठी साधन म्हणून वापरायची गरज आहे. स्वतःचे बंगले, इमारती, चैन यासाठी सत्ता वापरली जात आहे. आपण या परिस्थितीचा अभ्यास करा. मग स्वतः ठरवा मत कुणाला द्यायचे. शहरातल्या सोयीसुविधा तुमच्या आमच्या टॅक्समधून होतात. व्यापार समाजाच्या गरजा भागवतो. त्यासाठी योग्य मोबदला त्यांना मिळावा पण श्रमिक जनता नसल्यास माल विकणार कुणाला? श्रमाशिवाय समाजाचा रथ कोण ओढणार? व्यापारी रथात बसून काम करायचे मनसुबे रचतात. प्रबोधनाची गरज आहे. जैन उद्योग समूहाने याबाबतीत मोलाचे कार्य केले आहे. गांधी स्मारक, गोशाळा, अनुभूती शाळा आणि जैन हिल्स हे त्यांचे प्रकल्प भूषणावह आहेत. जळगावची सुवर्णनगरी म्हणून कीर्ती असण्यामागे धडाडी, कौशल्य आणि निष्ठा वाखाणण्यासारखे गुण आहेत. त्या सर्वांना धन्यवाद व त्यांचे अभिनंदन. ही जमेची बाजू आहे, पण काही व्यापारी सत्तेसाठी संपत्तीचा वापर करून अप्रत्यक्षपणे समाजस्वास्थ्य बिघडवीत आहेत त्याचाही विचार व्हायला पाहिजे.

मत तुमचे आहे. तुम्ही विचार करा. समाजाच्या व्यथा जाणून सहानुभूतीपूर्वक सेवा देणे महत्त्वाचे आहे. माणुसकी व आपुलकी, यांनी ओतप्रोत अशी आमची सेवासंस्था बघून २०० पर्यंत आमचे स्वयंसेवक आहेत. तरुण मुलंमुली व प्रौढ यांच्यासाठी अमेरिकन कम्युनिटी कॉलेजची कल्पना आम्ही राबवीत आहोत. या कार्यात क्रियाशील व निःस्वार्थी आमदार नथूभाऊ राणे मग्न आहेत. तेसुद्धा खासदार म्हणून निवडणूक लढवणार आहेतच. आपण ठरवा मत

कुणाला द्यायचे. आजच्या सांस्कृतिक कार्यक्रमास खासदार लोमटे यांनी वेगळेच वळण लावले म्हणून मला हे बोलावे लागले; आमच्या कार्यक्रमास आपण हजर राहिलात याबद्दल आपले आभार.

शबीर आभार प्रदर्शन करेल. मग पसायदान होईल.

* * *

# २२

कार्यक्रमानंतर मी रंगमंचावरून पाहिले की दगडू काळे माझ्या बाबांशी तावातावाने बोलत होते व बाबा त्यांना समजावीत होते. मी तिथे आले व विचारले, काय चालले आहे? दगडू काळे म्हणाले, ती बघा सुभाष लोमटेची गुंडगिरी करणारी गँग. आपली मल्हारी गँग त्यांना जशास तसे उत्तर देईल. त्यांच्याशी मला बोलू द्या. नथूभाऊ मला शांत राहायला सांगत आहेत. मी म्हणाले, मी त्यांना माझ्या भाषणात उत्तर दिले आहे. आपला मार्गच मुळी शांतताप्रिय आहे. त्यांनी मारामारीचा प्रसंग आणला तर बघू.

बाबा म्हणाले, दगडू, त्यांनी हल्ला केलाच तर आपण स्वसंरक्षणासाठी प्रतिहल्ला करू शकतो. एरव्ही नाही. गुरुदेवांना मी आधी बंगल्यावर घेऊन जातो. तुम्ही सर्वजण आवराआवर करा. योगिनी बेटा, आपली भूमिका तू समर्थपणे मांडलीस. छान.

१७ नोव्हेंबर सकाळी १० वाजता जनता महाविद्यालयाच्या सभागृहाच्या रंगमंचावर गुरुदेव ध्यानस्थ बसले होते. त्यांच्या शेजारी संत कबिरानंद व संत योगानंद बसले होते आणि मागे १५ संतमंडळी ध्यानस्थ बसली होती. सुमारे २०० श्रोते आसनस्थ होते.

मी बोलायला सुरुवात केली, गुरुदेव आत्मानंद महाराज व इतर संत मंडळींना माझा नमस्कार. ध्यानाची आस्था असणारे श्रोते इथे आमच्या विनंतीला मान देऊन आले आहेत. आपणा सर्वांना नमस्कार. गुरुदेवांच्या आशीर्वादाने जळगावात हे ध्यानमंदिर सुरू होत

आहे याचा आपणा सर्वांना आनंद आहे. मी कबीरानंद महाराजांना त्यांचे विचार मांडण्याची विनंती करते.

कबीरानंद महाराजांनी भाषण केले. ॐ गुरुदेव. आज गुरुदेवांच्या रूपाने अनंतकोटी ब्रह्मांडनायक सच्चिदानंद श्री सद्गुरू विश्वात्मक गुरुदेव म्हणजेच विश्वव्यापी शक्ती जो आत्मा आपल्या समोर आहे. जनता महाविद्यालयात ध्यानमंदिराचे उद्घाटन ही आध्यात्मिक जाणिवेला प्रगतिपथावर नेण्याची खूण आहे. आमदार नथूभाऊ, त्यांची सुकन्या योगिनी, तिचे सहकारी मित्र फातिमा, आभा, सायली, लता आणि शबीर यांच्या प्रयत्नाने हे शक्य झाले आहे. जंगली महाराज आश्रम, कोकमठाण हेच आमचे प्रेरणा स्थान आहे. त्यांच्या आश्रमाचे आत्मबोध निवेदन म्हणजेच अमृतवाणी मी वाचून दाखवतो,

*सबका मालिक आत्मा*

*// अमृतवाणी //*

*या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील. सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंत काळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्व आत्मा स्थित होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पूजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.*

*ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरूपात प्रत्येकाच्या हृदयात वसलेला आहे. नुसतं*

*रूपाला न पाहता 'स्व-रूपाला' पहा आणि ईश्वरप्राप्ती करून घ्या.*

*आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रूपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरूचे आत्मरूपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लीम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशूख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतमबुद्ध या सगळ्यांनी आत्मारामाची ओळख करून घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररूप झाले.*

*|| आत्मा मालिक ||*

त्यानंतर सत्संग झाला. संत तुकाराम यांच्या अभंगावर प्रवचन झाले. कार्यक्रम संपला.

* * *

# २३

एम.जे. कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे पडघम दिवाळीच्या सुटीनंतर कॉलेज सुरू झाल्यावर वाजू लागले. योगिनीच्या आवडीच्या नाटक समितीची ती अध्यक्ष झाली. तिचा आधीचा अभिनयाचा अनुभव या वेळी उपयोगी पडला. नाटक समितीच्या पहिल्याच बैठकीत तिने प्रस्ताव मांडला की आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत एकांकिका सादर करायची. समितीच्या सदस्यांनी म्हणजे सुहास केळकर, संदीप पाटील आणि सतीश गंधे यांनी योगिनीच्या प्रस्तावाचे कौतुक केले व brain storming session मध्ये कल्पना, सूचना, अडचणी इत्यादींवर मनोरंजक चर्चा झाली. शेवटी असे ठरले की,

सद्यस्थितीतील राजकारणी, पुढाऱ्यांच्या समाजविघातक वर्तनावर टीकात्मक व त्यातून विधायक चिंतन निर्माण होईल अशी एकांकिका हवी. योगिनीने एकांकिका लिहिण्याची, पात्र निवडण्याची व रिहर्सल घेण्याची जबाबदारी स्वीकारली.

सूचनेद्वारे अभिनय पारखून विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी समितीने विद्यार्थी विद्यार्थिनींना पाचारण केले. त्यातील तीन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींची निवड झाली. योगिनीने रचलेल्या एकांकिकेत ह्या कॉलेज तरुण तरुणींना पैसे देऊन त्यांना वाईट सवयी लावणाऱ्या पुढाऱ्यावर टीकेचा प्रहार केला गेल्याचे नाट्य होते. ह्या बिघडलेल्या तरुण तरुणींना सिगरेट ओढणे, दारू पिणे, राजकीय विरोध असणाऱ्या X पुढाऱ्याच्या कार्यकर्त्यांशी भांडणे उकरून हमरीतुमरीवर येणे यासाठी पुढारी पैसे द्यायचा व निवडणूक प्रचाराला ह्या व अशा चमूंना कामाला लावायचा.

माझं पात्र होते ह्या चमूला धडा शिकविणाऱ्या संस्कृतिसंपन्न युवतीचे. एकांकिकेत माझं नाव सुलक्षणा. सुलक्षणाची छेडछाड ह्या चमूने केल्यावर ती पोलिसांकडे मोबाइलवर तक्रार करून त्यांना लगेच खान्देश मॉलच्या हिरवळीवर हा प्रकार चालत होता तिथे बोलाविले. पोलिसांनी त्वरित कारवाई केली. ह्या सहा तरुण तरुणींना पोलीस स्टेशनवर नेले. त्यांच्याजवळ असलेल्या सिगरेटी, गुटखा, अत्तराच्या कुप्या व रोख रक्कम हस्तगत केली. त्यांच्या वडिलांना पोलीस स्टेशनवर बोलाविले व त्यांच्या समक्ष विचारले, त्या वडीलमंडळींनी त्यांच्या पाल्यांना ह्या सर्व शोकांसाठी पैसे दिले होते का. त्यातून कळले ह्या सहा जणांपैकी चार जणांचे वडील गरीब होते म्हणून ते पैसे देऊ शकत नव्हते. दोघांचे वडील मध्यमवर्गातील होते पण त्यांनी मुलांना पैसे दिले नसल्याचे सांगितले. वडीलमंडळी नाराज झाली. त्यांचे चेहरे काळजीने केविलवाणे दिसले. मग पोलिसांनी दंडुक्याचा मार देण्याची धमकी दिल्यावर त्या सर्वांनी X पुढाऱ्याने पैसे पुरवत असल्याचे कबूल केले व त्या बदल्यात पुढारी सांगेल ती मतांसाठी

प्रचाराची व प्रतिपक्षाला नामोहरम करण्याची कामे ते करीत असल्याचे सांगितले.

पोलिसांनी माझ्या म्हणजे सुलक्षणाच्या विनंतीनुसार त्यांना समज दिली. गुन्हा नोंदवला नाही.

तीन वर्षांचा काळ लोटला. सुलक्षणा खान्देश मॉलमध्ये असताना त्या सहा जणांपैकी दोन जण तिला भेटले. त्यांनी त्यांच्या आयुष्यात झालेला बदल सांगितला. लहानलहान कोर्सेस केलेत. कामाला लागले. लग्न झाले. दोघांच्या पत्नीजवळ तान्ही बाळं होती. त्यांपैकी एकजण त्याच्या पत्नीला म्हणाला, ह्या सुलक्षणाताई. ह्यांच्यामुळेच आम्ही सहा जण सन्मार्गाला लागलो. त्यांनी आमच्याविरुद्ध पोलिसांना तक्रार केली होती व आम्हांला सुधारायची संधी द्या अशी विनंती केली होती. त्याआधी ह्याच हिरवळीवर आम्ही हिची छेडछाड केली होती तेव्हाचे तिचे शब्दांचे फटकारे आम्हांला तिने मारले व भारताच्या भविष्याचे काय होणार याची चिंता व्यक्त करून पोलिसांना फोन करून बोलाविले होते.

दुसऱ्यानेपण त्याच्या पत्नीला सांगितले, अग, या सुलक्षणाबाईंचे आम्ही आभारी आहोत. आज ताईंची भेट झाली. Let us celebrate. त्यांनी त्यांच्या मित्रमैत्रिणींना बोलाविले. आम्ही सर्व जण कॅन्टीनमध्ये गेलो. नाश्ता केला.

बिल वर झेंड्यासारखे धरून त्यांचा त्या वेळचा म्होरक्या प्रवीण म्हणाला, स्वकष्टार्जित आमदनीतून आनंदाने व अभिमानाने जगणे सुलक्षणाताईने आम्हांला शिकविले.

असा होता त्या एकांकिकेचा शेवट. आम्ही सर्वांनी प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात त्यांना रंगमंचावरून नमस्कार केला. शबीर, फातिमा, आभा व सायली यांच्या बाजूने शब्द प्रेक्षागृहात निनादले, ''जय हो, योगिनी, जय हो.''

मला उत्कृष्ट अभिनयासाठी प्रथम पारितोषिक मिळाले. वर्तमानपत्रात एकांकिकेची कलाकृती म्हणून सविस्तर बातमी आली.

जळगावात पुष्कळ लोकांना माझ्या एकांकिकेतील टीकेचे लक्ष्य कोणते होते त्याची कल्पना आली व नाटकातील X = who? याची कुजबुज झाली. वर्मी घाव बसला तो खासदार सुभाष लोमटे यांना. केतन व त्याच्या गँगच्या मुलांना लोमटे साहेबांनी संयम ठेवायला सांगितले. त्यांना आपलाच हात दगडाखाली असल्याची जाणीव होती. प्रतिपक्षावर हल्ला बूमरँग होईल याची खात्री असल्याने त्यांनी केतनला गनिमी कावा करायचा सल्ला दिला. दोघांमध्ये कारस्थानाची चर्चा झाली. शुभम लेलेने ही माहिती मला दिली की शबीर आणि माझ्या प्रेमासंबंधी लोकांमध्ये चर्चा केतन गँगने पसरवली.

* * *

सायली मला म्हणाली, एक निवृत्त नागरिक म्हणताना मी ऐकले, का हो झोपे साहेब, आजकाल काव्यरत्नावली चौकात वरिष्ठ नागरिक बसलेले दिसत नाहीत. तुम्ही तर तिथे गप्पांत रंगून जायचे.

झोपे साहेब म्हणाले, जनता महाविद्यालयातील ध्यानमंदिरात बरेच लोक असतात. गप्पांपेक्षा ध्यानाचा मानसिक आरोग्याला फायदा अधिक म्हणून तिथे वरिष्ठ नागरिक जातात.

त्या वेळी शबीर म्हणाला, मॅडम योगिनी, I mean sister योगिनी यांचा प्रभाव न्यूजपेपरमें भी दिखता है। सायली म्हणाली, तू एकदा योगिनीला मॅडम तर एकदा सिस्टर म्हणतो. तुला नक्की काय म्हणायचे आहे? त्यावर शबीर गप्प राहिला.

फातिमा जवळ उभी होती. तिला बोलल्याशिवाय कसे राहवेल. तिने हिंदी गाण्याच्या ओळी म्हटल्याच,

आजकल तेरे मेरे प्यार की चर्चा हर जबान पे
सबको मालुम है और सबको खबर हो गयी।

मी विषय बदलला व म्हटले, पोस्टमन आला आहे. आणा ती पत्रे. त्या पत्रांमधील जनता पक्षाच्या मुंबई कार्यालयातून आलेले पत्र घेऊन मी आत गेले. बाबांना ते पत्र दिले. त्यांनी मजकूर वाचून

उसासा दिला. खुर्चीत हाताला डोके टेकवून ते म्हणाले, सर्व चांगले करूनही असे कसे झाले?

मी विचारले, बाबा निराश का होता? काय झाले?

मी पत्र वाचले,

श्री नथूभाऊ राणे, आमदार,

निवडणूक समितीने पार्टीच्या हाय कमांडच्या आदेशानुसार ठरविले आहे की तुम्हांला पार्टीचे खासदारकीसाठी तिकीट मिळणार नाही. या बाबतीत चर्चा करायची असल्यास आपण दिल्लीला जाऊन हाय कमांडशी बोलावे.

अध्यक्ष

जनता पक्ष, महाराष्ट्र

ते पत्र वाचून माझ्या ह्रदयाचा ठोका चुकला. माझ्या तोंडून शब्द निघेना. बाबांना खचलेले, पराजित झालेले मला बघवत नव्हते. थरथरत्या हातांनी ते पत्र मी टेबलावर फेकले व निःशब्द होऊन खुर्चीत बसले. माझ्या क्रोधाग्नीची आच त्यांना जाणवली. माझे स्वप्न उद्ध्वस्त झालेले त्यांना असह्य झाले असणार. मला शांत करण्यासाठी ते म्हणाले, बेटा, आपण सत्तेसाठीच कामं करतो असे थोडेच आहे. सत्ता मिळाल्यास आपल्या कार्याला व्याप्ती व वेग वाढला असता एवढेच. आपण समाजासाठी, देशासाठी कार्य करीत राहावे. तिकीट नाही मिळाले पण कार्य करायला तिकीट लागत नाही.

मी म्हणाले, पण कुकर्म करणाऱ्यांचा, सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्यांचा त्यामुळे स्वार्थी अजेंडा फलद्रूप होतो. हे मला नको आहे. बाबा, आजच आपण दिल्लीला जाऊ. मी त्यांना विचारते तिकीट नाकारण्याचे कारण काय आहे.

दिल्ली येथील जनता पार्टीच्या हाय कमांड समोर बाबा व मी बसलो असताना संध्याकाळच्या तांबूस सूर्याचे दर्शन खिडकीतून बघत माझा क्रोध मी काबूत ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. पार्टीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव बाबांचे सांत्वन करीत होते.

अध्यक्ष म्हणाले, नथूभाऊ, धीर धरा. तुमच्या कीर्तीबद्दल आम्हांला कल्पना आहे. तुमचे सत्कार्य खासदारकीपेक्षा मोठे आहे. दुसरे एखादे पद तुम्हांला देण्याचा विचार होईल.

बाबा म्हणाले, पण तिकीट नाकारण्याचे कारण मला कळेल का? स्वतंत्र पार्टीच्या गुंडांनी जळगाव व जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. जनता पार्टीतील चांगल्या नेत्यांना निरुत्तर व्हावे लागत आहे. हा धर्म व अधर्म यांचा संघर्ष आहे. आपली धर्माधिष्ठित बाजू आहे.

उपाध्यक्ष म्हणाले, नथूभाऊ, आम्ही तुमचा, तुमच्या कार्याचा आदर करतो. पण तुम्ही धर्माधिष्ठित हा शब्द वापरला त्याचा एक अर्थ तुम्ही सर्वांनी एकांगी घेतला आहे. आमच्याकडे आलेला अहवाल आहे तो धर्मासंबंधात आपल्या मुलीबद्दल आहे. हिंदू समाजात तुमच्या मुलीच्या प्रेमप्रकरणावरून मानसिक उद्रेक केवळ तुमच्या सत्कार्यामुळे आवरला गेला आहे. प्रतिपक्षाच्या निवडणूक प्रचारात हा बांध फुटेल व जनता पक्ष हरायला तेवढे कारण पुरे होईल. अध्यक्ष म्हणाले, सत्कार्य, कीर्ती, सात्त्विक व्यक्तिमत्त्व या सर्वांसाठी तुमच्या योगिनीच्या शबीरवरील प्रेमाच्या बाणांचे सुरुंग होतील.

बाबा म्हणाले, अहो साहेब, मैत्री म्हणजे प्रकरण नव्हे. आपली पार्टी सर्वधर्मसमभाव मानणारी आहे. शबीरसारख्या मुस्लीम तरुणांमुळे आपल्या पार्टीची प्रतिमा अधिक उजळेल. मुसलमानांच्या देशविरोधी दुष्कृत्यांना त्याच्यासारखे लोक औषधासारखे आहेत. आपल्या पक्षात मुसलमान आहेतच. देशविरोधी काम करणाऱ्या, द्वेष पसरविणाऱ्या मुसलमानांविरुद्ध देशप्रेमी मुसलमान कार्यरत राहायला हवे.

सचिव म्हणाले, माफ करा नथूभाऊ, तुमचे म्हणणे आम्हांला पटते पण निवडणुकीत असा प्रचार टिकणार नाही. आमच्याकडील माहिती हिंदूंच्या भावनांना दुखावणारी आहे. मैत्रीसंबंध आणि प्रेमसंबंध तेही तरुणांमधले यांचे अर्थ लोक वेगळे घेतात. पार्टीने तुमच्या चांगल्या कार्याची दखल घेतली आहे. योग्य वेळी तुम्हांला त्याचा फायदा होईल. आत्ता मात्र आमचा निर्णय पक्का आहे.

मी म्हणाले, बाबा, तुम्ही बाहेर थांबा. मी आलेच.

बाबा बाहेर गेल्यावर मी हाय कमांडला म्हणाले, आपण सर्वांनी मुसलमान समाजातील तरुणाशी माझे प्रेमसंबंध व त्याचा हिंदूंच्या मनःस्थितीवरील परिणाम यांचे सामान्य माणसांच्या दृष्टीने केलेले विश्लेषण मला पटले. त्याच कारणासाठी शबीरने व मी लग्नाचा विषय टाळला. निवडणूक झाल्यावर लग्न करण्याचे आम्ही ठरवले होते. पण हाय कमांडचा निर्णय व त्यामागील कारण कळल्यामुळे मी, योगिनी नथूभाऊ राणे, आपल्याला प्रतिज्ञापूर्वक वचन देते की माझा आणि शबीरचा संबंध आत्तापासून संपला. निवडणुकीला काही महिने वेळ आहे. उद्याच तो भारत सोडून जाईल याची खात्री मी देते. मी गुरुदेव आत्मानंद महाराज यांच्या आध्यात्मिक कार्याला व समाजसेवेला वाहून घेतलेलेच आहे. त्यामुळे दुष्ट प्रवृत्तींना आळा बसेल अशी माझी श्रद्धा आहे. मला मुस्लीम समाजातही मानाचे स्थान आहे. त्यामुळे माझा हा निर्णय व मुसलमानांच्या माझ्याविषयीच्या भावना यामुळे दोन्ही समाजाची मते बाबांना मिळतील व जनता पार्टी विजयी होईल. आपण पुन्हा विचार करा. अन्यथा नथूभाऊ राणे अपक्ष निवडणूक लढवतील व १०० टक्के निवडणूक जिंकतील याची मी ग्वाही देते; पण जनता पार्टीचे पुढारी म्हणून मला ते दिल्लीत हवे आहेत. मी बाहेर थांबते. आपला निर्णय झाला की मला बोलवा.

माझ्या प्रतिज्ञेच्या असामान्य शक्तीमुळे ते हादरले असावेत. त्यांनी आपसात चर्चा केली व मला बोलाविले.

अध्यक्ष म्हणाले, ‘‘तुझ्या प्रतिज्ञापूर्वक निवेदनाने आम्ही प्रभावित झालो आहोत. आमची अपेक्षा या क्षणी एवढीच आहे की शबीरला आमच्या उपस्थितीत तू मोबाइलवर तुझ्या निश्चयाबद्दल सांगावे.’’

मी शबीरला फोन केला. मी म्हणाले, ‘‘शबीर, मी दिल्लीच्या हायकमांडच्या कार्यालयातून बोलते आहे. तू दोन दिवसात भारत सोडून तुझ्या नातेवाइकाकडे दुबईला जा. कायम तिथेच राहा. आपल्या प्रेमाचा हा शेवट आहे. मी प्रतिज्ञा करते की माझ्या

बाबांच्या राजकीय उज्ज्वल भविष्यासाठी मी तुझ्याशी लग्न करणार नाही. मी लग्नच करणार नाही. अध्यात्म व समाजसेवा यासाठीच माझे आयुष्य मी समर्पित करीन.''

अध्यक्ष म्हणाले, योगिनी, आम्ही निर्णय बदलला. नथूभाऊ जनता पार्टीचे लोकसभेचे उमेदवार असतील. कार्यालयातून तसे पत्र घेऊन जा. आज माझ्या कार्यालयात विद्युल्लता चमकली. अभिनंदन! सचिव म्हणाले, हजारो वर्षांपूर्वी भीष्माने घेतलेल्या प्रतिज्ञेची आठवण आली. योगिनी त्यागमूर्ती झाली.

बाबा नंतर मला म्हणाले, असा काय चमत्कार झाला, की त्यांनी निर्णय बदलला.

मी म्हणाले, लवकरच कळेल तुम्हांला.

विमानतळावर व प्रवासात बाबा व मी आपापल्या विचारात मग्न होतो. जळगावला पोचल्यावरसुद्धा शांत होतो. समाधानाच्या लाटेवर मी आरूढ झाले होते. त्यागात सुख असते याची अनुभूती मला होत होती.

* * *

# २४

निवडणुकीच्या धूमधडाक्यात जळगावचे वातावरण बदलले. स्वतंत्र पार्टीचे लोकसभेचे उमेदवार सुभाष लोमटे व जनता पक्षाचे लोकसभेचे उमेदवार नथूभाऊ राणे यांचे फोटो सगळीकडे लावलेल्या पोस्टर्सवर झळकले. वाद्यांनी मिरवणुकींना साज चढला. कार्यकर्ते प्रचारात नाच, गाणे, घोषणा यामुळे निर्माण झालेल्या उसळत्या मनोवृत्तीत दंग झाले. शबीरने दुबईहून वर्तमानपत्रांना पाठवलेल्या फोटोंमुळे वाद झाले, शिवीगाळ झाली. सातपुड्यातील अवैध लाकूडतोडीत शबीर मजूर म्हणून सामील झाल्याचे फोटो वर्तमानपत्रांत आले त्या दिवशी वातावरण तंग होते. दगडू काळेची मल्हार गँग व सुभाष लोमटेची

शुभ-लाभ गँग यांच्यात वाद विकोपाला गेले तेव्हा मी मध्यस्थी केली व सुभाष लोमटेच्या गँगला 'तुम्ही कोर्टात अब्रूनुकसानीची फिर्याद करा' असे आव्हान दिले. माझी रिपोर्टर्सनी मुलाखत घेतली तेव्हा माझे बाबा माझ्यासमवेत होते पण त्यांनी मलाच कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

एका रिपोर्टरने विचारले, ''योगिनीताई, तुम्ही जळगावातील गुटकाविक्री, गटागटातील भांडणे, तरुणांना पैसे देऊन अवैध कामे करून घेणे इत्यादी आरोप कुणावर करीत आहात?'' मी उत्तर दिले, ''लोकांना त्याची कल्पना आहे. नाव सांगण्याची गरज नाही. तुम्ही पत्रकारांनी ती माहिती काढून प्रसिद्ध केली पाहिजे.''

दुसऱ्या एका पत्रकाराने बाबांना विचारले, तुमचा जाहीरनामा, शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देणे यावर भर देतो. त्यासाठी तुमचा action plan काय आहे?

बाबा म्हणाले, फक्त शेतीसाठीच नाहीत तर खेड्यावर पिण्याच्या पाण्याचा अभाव आहे, ग्रामपंचायतींची चौकशी त्यासाठी करणे, शेतीसाठी लहान बंधारे व धरणे बांधण्यासाठी सरकारी स्तरावर योजनांचा पाठपुरावा करणे हे आमचे ध्येय आहे.

एका रिपोर्टरने मला विचारले, माफ करा, वैयक्तिक प्रश्न विचारतो, शबीर शेख आपल्या मित्रपरिवारात आहे मग तो प्रचारात कसा नाही?

मी म्हटले, आहे नाही, होता. तो दुबईला नोकरीसाठी गेला आहे. शांततामय सहजीवन Peaceful Co-existence हे त्याचे ब्रीद आहे, निष्ठा आहे. हिंदू-मुस्लीम ऐक्य व देशप्रेम हे त्याचे कार्यपद्धतीचे मार्ग आहेत. पण आता तो दुबईतच राहिला तर ते कार्य आमचा इथला मित्रपरिवार करणार आहे.

एका रिपोर्टरने विचारले, तुमचे समाजकार्य, शिक्षण आणि अध्यात्म यासाठी सरकारी यंत्रणेचा उपयोग करण्याचा उद्देश आहे का? जीवनात तुमचे ध्येय काय?

मी उत्तर दिले, मी नावानेच योगिनी नाही तर खरोखर योगिनी होणार आहे. लग्न न करता सेवा व आत्मानंद आश्रमाचे अध्यात्मकार्य याला मी वाहून घेणार आहे.

सत्तेचा उपयोग निःस्वार्थीपणे समाजासाठी झाला तर त्यात गैर काही नाही.

एका रिपोर्टरने आश्चर्य व्यक्त करीत विचारले, लग्नच करणार नाही हा तुमचा निर्णय धक्कादायक आहे. त्याबद्दल आणखी काय सांगता येईल? असे का?

मी म्हणाले, माझ्या सेवा कार्याला वाहून घेणे व आध्यात्मिक प्रगती यात वैवाहिक जीवनाची सामान्य स्तरावरील बंधने मला नको आहेत. तो माझा वैयक्तिक निर्णय आहे. त्यावर मला जास्त बोलायचे नाही. अधिक महत्त्वाचे जनता पार्टीची उद्दिष्ट्ये म्हणजे पर्यावरण वृद्धी, समता, बंधुभाव, कायद्याचे राज्य, सेवेसाठी सत्ता ही आहेत. त्याचसाठी हा अट्टहास. त्याचसाठी आम्हांला मते हवी आहेत.

माझी रिपोर्टर्सना दिलेली उत्तरे दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली.

निवडणुकीचा निकाल लागला. माझे बाबा खासदार झाले.

पहिलवान भिवा लांडगे आणि बाबू चौधरी यांनी हिरामणच्या आत्महत्येला केतन कारणीभूत असल्याचे पोलिसांना स्वतःच्या बचावासाठी सांगितले. केतनला खुनाच्या आरोपाखाली अटक झाली. त्या तिघांवर गुटका विकण्याचाही आरोप ठेवला गेला. कारण पोलिसांना तसा पुरावा मिळाला. शबीरने वर्तमानपत्रात दिलेली माहिती व फोटो यांच्या आधारे सुभाष लोमटे यांच्यावर अवैध सावकारी व सागवान वृक्षांची अवैध तोड या आरोपांविषयी First Information Report पोलीस इन्सपेक्टरांनी नोंदविला.

* * * **समाप्त** * * *

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगाव रोड, ता. कोपरगाव येथील आध्यात्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामुळे लेखक प्रभावित झाले आणि 'मी वाकविले दैवाते' ह्या कादंबरीचा उगम झाला.

तेथील आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारा हा लेख.

# विश्वात्मक ध्यानमिशन

**प्रत्येक जिवाला या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनातून मुक्त होण्यासाठी आणि आनंदमय जीवन जगण्यासाठी ध्यानसाधना ही शाश्वत अभ्यासपद्धती दिली आहेत. ही ध्यानसाधना आणखी प्रभावीपणे कार्यरत करण्यासाठी कोकमठाण आश्रमामध्ये अखंड ध्यानयोग शिबिरे सुरू आहेत. आत्मदेवतेच्या आदेशानुसार अखंड सुरू असणाऱ्या या विश्वात्मक कार्यात ध्यानरूपी महायज्ञ अविरत सुरू राहणार आहे.**

**- संत परमानंद महाराज**

विश्वव्यवस्थेची विस्कटलेली घडी पुन्हा पुन्हा सुसूत्रात बसविण्यासाठी निर्गुण निराकार आत्म्याने आजपर्यंत अनेक अवतार घेतलेले आहेत. येथून पुढेही अनंत अवतार होत राहतील. वर्तमानकाळात हीच विश्वव्यवस्थेची घडी पुनर्रचित करण्यासाठी याच विश्वाच्या मूळ निर्गुण अधिष्ठानाने सगुण रूपात अवतार घेतलेला आहे आणि तो म्हणजे सद्गुरू आत्मा मालिक माउली. आपल्या पूर्वनियोजित अवतार कार्यानुसार प.पू. गुरुदेवांनी गेल्या अनेक तपांपासून ध्यानाचा संदेश दिलेला आहे. आज विस्कळीत झालेल्या विश्वव्यवस्थेचे एकमेव कारण म्हणजे विश्वनिर्मात्याचे आपणास झालेले विस्मरण होय. काही आस्तिक व सात्त्विक जीव ईश्वरप्राप्तीचा आपापल्या परीने प्रयत्न करतात. परंतु कलियुगामध्ये बदललेल्या परमार्थाच्या परिभाषेमुळे ते जीव मूळ देवापर्यंत, विश्व निर्मात्यापर्यंत

म्हणजेच निर्गुण आत्म्यापर्यंत पोहोचत नाहीत. आजपर्यंत झालेल्या अनेक अवतारांनी मूळ देवाचा म्हणजे आत्म्याचा संदेश दिला. परंतु सर्वसामान्य बद्ध जीव त्या मूळ निर्गुण निराकार देवापर्यंत न पोहोचता त्या-त्या काळात अवतरीत झालेल्या सगुण साकार रूपापर्यंतच पोहोचले. परंतु, अनादी काळापासून ते अनंत काळापर्यंत अशा कोट्यान्कोटी देवीदेवतांना आणि अवतारांना निर्माण करणाऱ्या मूळ निराकाराला, मूळ देवाला म्हणजेच आत्मदेवाला फार कमी साधकांनी ओळखले. ज्या भाग्यवंतांनी या आत्म्याला ओळखले, त्यांनी आपले जीवन यथार्थ व पूजनीय बनविले आहे. आज रोजी कोणत्याही व्यासपीठावरून या मुख्य देवाचे (आत्म्याचे) गुह्य ज्ञान तितक्याच स्पष्टपणे किंवा प्रभावीपणे सांगितले जात नाही. सांगितले गेले तर ते ज्ञान अवगत करण्याची, अभ्यास पद्धती शिकवली जात नाही. परंतु आत्मा मालिक व्यासपीठ हे अतिशय सुस्पष्टपणे या आत्म्याचे ज्ञान, संदेश व त्याला अवगत करण्याची अभ्यासपद्धती म्हणजेच ध्यानाचा संदेश देत आहे. ध्यानअभ्यास ही प्रत्येक मनुष्याला माणूस म्हणून जगण्याची आणि सर्व धर्मांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या स्वधर्माचे ज्ञान करून देणारी मूळ जीवनपद्धती आहे. यामध्ये वंशभेद, वर्णभेद व लिंगभेदही नाहीत. प्रत्येक मनुष्याला आनंदी जीवन जगण्यासाठी सुविचार, सुआचार, सुविहार, योग्य नीतिमत्ता आणि स्वज्ञान (आत्मज्ञान) या गोष्टींची आणि गुणांची नितांत गरज असते. हे सर्व गुण आपल्यामध्ये पूर्णतः उतरविण्यासाठीच गरज असते ती ध्यान अभ्यासाची. दैनंदिन ध्यान अभ्यासातून आत्मपरीक्षण करीत राहिल्यास वरील सर्व गुण हे साधकाच्या अंगी बाणले जातात. ध्यानाशिवाय आज विश्वव्यवस्थेमध्ये असणारा भेदभाव, द्वैत, अराजकता, भ्रष्टाचार संपुष्टात येणार नाही. विश्वाच्या या संरचनेसाठी बाह्य अनुशासनाबरोबर गरज आहे ती ध्यानसाधनेची, भेदातून समांतरतेकडे, अशांततेतून शांतीकडे व पारतंत्र्यातून खऱ्या स्वातंत्र्याकडे जाण्यासाठी ध्यान हाच एकमेव राजमार्ग आहे.

आज निर्माण झालेल्या परिस्थितीचे अतिशय सूक्ष्म असे अवलोकन करून प.पू. गुरुदेवांनी सकल विश्वाच्या शांतीमय पुनर्व्यवस्थेसाठी आणखी एक प्रभावी पाऊल पुढे टाकलेले आहे. तीर्थक्षेत्र कोकमठाण, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या आत्मा मालिक ध्यानपीठातून वेळोवेळी अनेक शाश्वत अशी वैश्विक परिवर्तने घडवून आणलेली आहेत. त्याच अनुषंगाने प्रत्येक जिवाला या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनातून मुक्त होण्यासाठी आणि आनंदमय जीवन जगण्यासाठी ध्यानसाधना ही शाश्वत अभ्यासपद्धती दिली आहे. ही ध्यानसाधना आणखी प्रभावीपणे कार्यरत करण्यासाठी कोकमठाण आश्रमामध्ये अखंड ध्यानयोग शिबिरे वर्षभरापासून सुरू करण्यात आली आहेत. आत्मदेवतेच्या आदेशानुसार अखंड सुरू असणाऱ्या या विश्वात्मक कार्यात ध्यानरूपी महायज्ञ येथून पुढे अखंड अविरत सुरू राहणार आहे. विश्वात वैश्विक आत्मपरिवर्तनाला सुकारण ठरणारे हे जणू एक विश्वात्मक ध्यान मिशनच आहे.

युद्ध, शत्रुत्व, दहशतवाद, भ्रष्टाचार ही एक रानटी जीवनपद्धती आहे. तिला संपवूनच नव्या युगाच्या आत्मोन्नत संस्कृतीची पायाभरणी करणे व त्यातूनच आत्मसाक्षी, आत्मप्रेमी समाज निर्माण करणे हेच गुरुदेवांचे मुख्य ध्येय व उद्देश आहे. आत्मरूपाच्या अखंड समाधीमध्ये विद्यमान असणाऱ्या ध्यानमूर्ती प.पू. गुरुदेव माउलींचे हे ध्यानमिशन उद्याच्या शांतीमय ध्यानविश्वाचे कारण ठरणार आहे. या ध्यानविश्वकार्याची सुरुवात जवळजवळ गेल्या सहा तपांपूर्वीच झालेली आहे. तिला अधिक उन्नत आणि विश्वव्यापक करण्यासाठी प.पू. गुरुदेवांनी हे विश्वात्मक ध्यानमिशन हाती घेतलेले आहे. या ध्यानमिशनच्या माध्यमातून कोकमठाण या तीर्थक्षेत्री अखंड ध्यानयोग शिबिरे सुरू होत आहेत. कोकमठाण या तीर्थक्षेत्राची भूमी ही ब्रह्मलिखित नियोजनानुसार केवळ आणि केवळ या ध्यनामिशनसाठीच निवडण्यात आलेली आहे. गोदातटी असणाऱ्या या भूमीचे माहात्म्य फक्त पुरातन काळातील चतुरांनाच, देवीदेवतांना आणि प.पू. गुरुदेवांना

माहिती आहे. जगाच्या पाठीवर विखुरलेल्या, पूर्वसंचित बलवत्तर असणाऱ्या आणि आत्मप्राप्तीचा पावन योग ज्यांच्या जीवनामध्ये आहे अशा अनंत भाविकांना या भूमीत एकत्रित करून त्यांच्याकडून ध्यान करून घेतले जाणार आहे. आत्मतत्त्वाच्या ठिकाणी असणाऱ्या पावन ऊर्जेला प्राप्त करून प्रत्येकाचे जीवन तेजोमय बनविण्याचा हा एक महान योग या ध्यानमिशनच्या माध्यमातून आपणाला प्राप्त झालेला आहे. प.पू. माउलींच्या या ध्यानअवतार कार्यामध्ये अखंड सुरू असणाऱ्या या विश्वात्मक ध्यान यज्ञाला आता फक्त आणि फक्त आत्मप्रेमाचीच आहुती दिली जाणार आहे. आपल्या प्रत्येकाच्या जीवनातील शाश्वत नाते कोणते असेल तर ते आत्म्याचे नाते. जीवनातील खरे शाश्वत प्रेम कोणते असेल तर ते आत्मप्रेम. खरे शाश्वत सान्निध्य कोणते असेल तर ते आत्म्याचे सान्निध्य. म्हणून हे सान्निध्य मिळविण्यासाठी आणि हे शाश्वत नाते दृढ करण्यासाठी गरज आहे ती ध्यान अभ्यासाची. ध्यान म्हणजे हृदयस्थ विराजित आत्म्यावर प्रेम करण्याचा अभ्यास, आत्म्याच्या सान्निध्यात बसण्याचा अभ्यास होय. जगामध्ये आणि जीवनामध्ये आत्मचिंतनासारखे (ध्यानासारखे) दुसरे कोणतेही महान कार्य किंवा कर्म नाही. कारण केवळ हेच आत्मप्रेम नराला नारायण करू शकते. 'परिवर्तन' हा विश्वाचा नियम आहे. विश्वात आणि आपल्या जीवनात आज शाश्वत असे आत्म परिवर्तन घडवून आणण्यासाठी सुरू होणाऱ्या या ध्यानमिशनमध्ये आपण सहभागी होऊन आपले हित साधून घ्यावे. विश्वात्मक ध्यानमिशनअंतर्गत सुरू होणाऱ्या ध्यानशिबिरांमध्ये राज्या-परराज्यातील, देशाविदेशातील सत्संग मंडळातील असंख्य भाविक आपल्याला नियोजित करून दिलेल्या तारखेला कोकमठाण आश्रमात उपस्थित राहत आहेत.

आत्तापर्यंत मानवाने विश्वाच्या बाह्य संशोधनासाठी जीवतोड मेहनत घेतली, त्यात त्याला यशही मिळाले. मात्र याच वेळेला त्याला आंतरिक विश्वाची जाण उरली नाही. परिणामी आज त्याला अनेक

समस्यांना कळत नकळत सामोरे जावे लागत आहे. संशोधनाचे सर्व प्रयत्न हे जगणे सुसह्य करण्यासाठी केले होते, मात्र तंत्रज्ञान पुढे जाऊनही हे जीवन असह्य झालेले आहे. अशा या भयाण वास्तवात अज्ञानापोटी सैरभैर झालेल्या माणसाचा हात गुरुदेवांनी धरलाय आणि त्याच्या आंतरिक प्रवासाचा मार्ग प्रशस्त केलाय तो या ध्यानमिशनच्या माध्यमातून, जीवनात आत्मदर्शी सद्गुरूंचे अधिष्ठान असल्याशिवाय जीवन कधीही सुसह्य व शांतीमय होऊ शकत नाही.

प.पू. गुरुदेवांच्या स्वानुभवातून विश्वशांतीसाठी दिलेला 'सबका मालिक आत्मा' हा सिद्धांत प्रत्येक सर्वसामान्य जिवाला आपल्या स्वतःच्या अनुभूतीत उतरविण्याचा राजमार्ग म्हणजेच ही ध्यान शिबिरे आहेत. देह हे देवाचे मंदिर असून, आत्मप्राप्तीसाठी मिळालेले ईश्वरनिर्मित एक साधन आहे. जगाच्या पाठीवर प.पू. गुरुदेव माउली हे एकमेव असे आत्मदर्शी महात्मा आहेत की, ज्यांचे श्वास हे ध्यान आहे, ज्यांची वाचा ही ध्यानच आहे, ज्यांची निद्रा हीदेखील ध्यान आहे, ज्यांचा प्रसाद हापण ध्यानच आहे, ज्यांची तहान हीपण ध्यानच आहे, ज्यांचे जीवन हेपण ध्यानच आहे, ज्यांच्या रुधिरांमधून रक्ताभिसरण नव्हे तर ध्यानाभिसरण वाहते. अशा महात्यागी, महावैरागी, तेजोमय ध्यानमूर्तीच्या म्हणजेच प.पू. गुरुदेवांच्या सान्निध्यात ध्यान करण्याचा हा योग साधून घ्या. प्रत्येक जिवाला ध्यानाच्या माध्यमातून आत्मसंदेश देण्यासाठी प.पू. गुरुदेवांनी जीवनभर खडतर तपश्चर्या केलेली आहे. प.पू. गुरुदेवांच्या सगुण सान्निध्यात जीवनाचे सार्थक करून घ्या.

**ध्यान करा, ध्यानी बना.**

**।। आत्मा मालिक ।।**

**– संत परमानंद महाराज**

**आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण**

# लेखक परिचय

लेखकाचे नाव :
प्राचार्य लक्ष्मण भोळे
एम.ए; एलएलएम; एम.फिल.
M.A; LLM; M. Phil



पारले टिळक विद्यालय असोसिएशन संचलित मुलुंड वाणिज्य महाविद्यालयात इंग्रजी व व्यापारी कायदा (Business Law) या विषयात व्याख्याता. त्याच महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून निवृत्त झाल्यावर पर्यावरण संवर्धन, शिक्षण व सामाजिक क्षेत्रांत कार्यरत. हरियाली, ठाणे, एस.बी. फिरके विद्यालय, ठाणे, विकास मंडळ, मुलुंड या संस्थांमध्ये विश्वस्त/कार्यकारी मंडळ सदस्य.

निवृत्तीनंतर प्रकाशित केलेली पुस्तके :

१) अंतराचे अंतरंग, अभिनुजा प्रकाशन, पुणे

२) Life of a Gandhian - Self-published
(A Biographical Novel in English)

३) आमची जागतिक मुसाफिरी–भाग २

संयुक्तपणे : प्रा. अच्युत ओक, प्रा. पुनम सिंगवी व लक्ष्मण भोळे
प्रकाशक इसाहित्य.कॉम

**ही कादंबरी संपूर्णपणे काल्पनिक आहे. यातील नावे, पात्रं, स्थळे व घटना, ज्यांची विशिष्ट प्रकारे नोंद आहे त्या सोडून, लेखकाच्या कल्पनेचे फलित आहे. वास्तवातील लोक, स्थळे व घटना यांचे इतर काही किंवा कुठलेही साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा. कादंबरीतील काल्पनिक पात्रांचा आणि घटनांचा जीवंत वा मृत व्यक्तिंशी काहीही सबंध नाही.**